पुणे, मंगळवार, २५ मार्च २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 117 • वर्ष ४ थे, अंक ११७ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



राष्ट्रसंचार EXCLUSIVE

पुणेकरांना दूषित पाण्याचा 'डोस'..!

P३



नेमबाजीत महाराष्ट्राला सुवर्णासह रौप्य

१२

## At a Glance

### अपर जिल्हाधिकारी स्नेहल बर्गे यांचे निधन

**पुणे :** पीएमआरडीच्या अपर जिल्हाधिकारी स्नेहल बर्गे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात्य बहीण आणि आई असा परिवार आहे. कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळख असलेल्या स्नेहल बर्गे यांनी हवेली तालुक्याच्या प्रांतधिकारी म्हणून देखील काम पाहिले होते. ती त्यांची कारकिर्द चांगलीच गाजली होती. अवैध गौणखनिज उत्खनन, वाहतूक यावर त्यांनी कठोर कारवाई केली होती. स्नेहल यांच्या बहीण पल्लवी बर्गे या » पान ७ वर

### २२ नक्षल्यांचे आत्मसमर्पण

**छत्तीसगड :** छत्तीसगड नक्षलमुक्त करण्यासाठी सरकार आणि सुरक्षा दल सतत प्रयत्न करत आहेत. राज्याच्या विविध भागात नक्षलवाद्यांशी सतत चकमकी सुरू आहेत आणि त्यांचा खात्मा केला जात आहे. त्याचवेळी, नक्षलवादी आता मोठ्या संख्येने आत्मसमर्पण करत आहेत. छत्तीसगडच्या विजापूर जिल्ह्यात २२ नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. आत्मसमर्पण करणाऱ्यांमध्ये दोन महिलांचाही समावेश आहे. जिल्ह्याचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक उलांडन यॉर्क यांनी दिलेल्या » पान ७ वर

# बुलडोझर चालला

नागपूर

## फहीम खानच्या घरावर कारवाई, न्यायालयाकडून स्थगिती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नागपूर :** औरंगजेबाची कबर हटवल्याबद्दल नागपूरमध्ये झालेल्या निदर्शनांना अचानक हिंसक वळण लागले. दरम्यान, देवेंद्र फडणवीस यांनी हिंसाचारातील मुख्य आरोपी फहीम खानवर कारवाई केली आहे. आज फहीम खानच्या घरावर बुलडोझर कारवाई करण्यात आली आहे. फहीम खानवर नागपूर हिंसाचाराचा मास्टरमाइंड असल्याचा आरोप आहे. सध्या तो पोलिस कोठडीत आहे.

दरम्यान, नागपूरच्या टेकानाका परिसरातील घर बांधताना फहीम खानने काही भागात अतिक्रमण केले आहे. यासंदर्भात नागपूर महानगर पालिकेने त्याच्या कुटुंबाला या संदर्भात नोटीस बजावल्यानंतर आता प्रत्यक्ष कारवाईला सुरुवात केली होती. मात्र, नागपूर पालिकेच्या कारवाई विरोधात फहीम खानच्या आईने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यावर, तत्काळ सुनावणी करताना न्यायालयाने महापालिकेकडून सुरू असलेल्या पाडकाम कारवाईला स्थगिती दिली आहे. तसेच, अतिक्रमण कारवाई विषयी सुप्रीम कोर्टाच्या नव्या गाईडलाईनचे उल्लंघन महापालिकेकडून होत असल्याचा दावा हायकोर्टात दाखल याचिकेतून करण्यात आला होता.

नागपूर शहरात १७ मार्च रोजी झालेल्या हिंसाचारप्रकरणी अटक करण्यात आलेल्या १०० हून अधिक लोकांमध्ये मायनॉरिटी डेमोक्रॅटिक पार्टी (एमडीपी) नेते फहीम खान यांचा समावेश आहे. सूत्रांनी सांगितले की, काही दिवसांपूर्वी नागपूर महानगरपालिकेने खान यांना नोटीस बजावली होती.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, यशोधरा नगर परिसरातील संजय बाग कॉलनीतील हे घर फहीम खान यांच्या पत्नीच्या नावावर नोंदणीकृत आहे. एमडीपी शहर » पान ७ वर





### फहीम खानचा जामीनासाठी अर्ज

● फहीम खानने जामिनासाठी नागपूरच्या सत्र न्यायालयात अर्ज केला आहे. फहीम खानच्या जामीन अर्जाच्या सुनावणीला आजच सुरुवात होणार आहे. नागपूरच्या प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी न्यायालयाने फहीम खानला न्यायालयीन कोठडी सुनावली होती.

### नागपूर खंडपीठाकडून स्थगिती

नागपूर येथील दोन गटात झालेल्या दंगलीची गंभीर दखल घेत गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरोपींकडूनच नुकसानीचा खर्च वसुल केला जाईल, असे म्हटले होते. तसेच, या दंगलीतील कथित मास्टर माईंड फहीम खान यांच्या घरावरही महापालिकेकडून आज बुलडोझर कारवाई करण्यात आली आहे. फहीम खानच्या घरावरील बुलडोझर कारवाईला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडून स्थगिती देण्यात आली आहे. अतिक्रमण कारवाई विषयी सुप्रीम कोर्टाच्या नव्या गाईडसाईनचे उल्लंघन केल्याचा दावा याचिकेत करण्यात आला होता. त्यानुसार, उच्च न्यायालयाने जेसीबीने सुरू असलेल्या पाडकामाला स्थगिती दिली असून एक आठवड्यात महापालिकेला आपली बाजू मांडण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे, फहीम खानसह कुटुंबीयांना न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाल्याचे दिसून येते.

# कुणाल कामराच्या अडचणीत वाढ


## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील टीका महागात पडली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याच्या अडचणीत वाढ होण्याची चिन्हे शक्यता आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर स्टँडअपमध्ये कवितेच्या माध्यमातून टीका केली होती. आता राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी कामरा याचे सीडीआर व बँक अकाऊंट तपशील तपासणार असल्याचे म्हटले आहे. कामराच्या विरोधात सध्या वॉरंट निघाले असून पोलिस त्याचा तपास करत आहे.

### संसदेत पडसाद

● स्टँड अप कॉमेडियन कुणाल कामराने उपमुख्यमंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे मुख्य नेते एकनाथ शिंदेंबद्दल यांच्याबद्दल एक गाणं गायलं. त्याचे पडसाद राजधानी दिल्लीत आणि संसदेच्या अधिवेशनातही उमटले. या प्रकरणावरून विरोधी पक्षाच्या खासदारांनी राज्य सरकारवर टीका केली तर सत्ताधारी पक्षाच्या खासदारांनी या वक्तव्याला चुकीचे असल्याचे म्हटले. स्वातंत्र्य आहे म्हणून काहीही बोलू नये, असे सत्ताधारी खासदार म्हणाले.



दरम्यान, कुणाल कामराच्या ऑफिस तोडफोड प्रकरणी ताब्यात घेतलेल्या शिवसेना कार्यकर्त्यांना जामिन मिळाला आहे. खार पोलिस ठाण्यात त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला होता. प्रत्येकी १५ हजारांच्या जातमुचलक्यावर हा जामीन न्यायालयाने मंजूर केला आहे. कामरा याने केलेल्या टीकेनंतर शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी कामरा याच्या खार येथील ऑफिसची तोडफोड केली होती. त्यांना न्यायालयाने जामीन दिला आहे.

कामरा याने २०२२ मध्ये जे महाराष्ट्राच्या राजकारणात सत्ताकारण घडले होते त्याच्यावर कवितेच्या » पान ७ वर



> उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा अपमान करणे हे चुकीचे असून, हा अपमान सहन केला जाणार नाही अशा लोकांना त्यांची जागा दाखवण्यात येईल. ते पुढे म्हणाले की हास्यविनोद करणे यात काही गैर नाही पण मोठ्या नेत्यांना बदनाम करुन त्यांचा अपमान होईल असे वक्तव्य करणे पुर्णत चुकीचे आहे. कामरा याने माफी मागितली पाहिजे"
>
> **— देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

# प्रशांत कोरटकरला अखेर अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना धमकी तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या विषयी अवमानकारक वक्तव्य केल्याप्रकरणी अखेर प्रशांत कोरटकर याला अटक करण्यात आली. अनेक दिवसांपासून तो फरार होता. तेलंगणातून कोल्हापूर पोलिसांनी त्याला सोमवारी (दि. २४) ताब्यात घेतले.

कोरटकर याने इंद्रजीत सावंत यांना फोनवरून जीवे मारण्याची धमकी दिली होती. त्यानंतर त्याच्याविरोधात कोल्हापूरसह नागपूरमध्येही गुन्हा दाखल झाला होता. तसेच महाराष्ट्रभरातून कोरटकर विरोधात संताप व्यक्त होत होता. अनेक व्यक्ती, संघटना, लोकप्रतिनिधींनी कोरटकरच्या वक्तव्याचा निषेध करत त्याच्यावर तत्काळ कडक कारवाईची मागणी केली होती.



दरम्यान, कोरटकरने कोल्हापूर न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. त्याचा जामीन अर्ज मंजूर झाल्याने ११ मार्चपर्यंत त्याला दिलासा मिळाला होता. पण, कोल्हापुरातील सामाजिक संघटनांच्या दबावानंतर पोलिसांनी कोरटकर याचा अटकपूर्व जामीन रद्द करण्याची मागणी केली होती. त्यानुसार न्यायालयाने त्याचा अटकपूर्व जामीन रद्द केला होता. त्यानंतर आणि त्यापुर्वीही कोल्हापूर पोलिसांनी नागपूरला धाव घेत कोरटकर याचा शोध सुरू केला होता. तथापि, त्याने सुरुवातीला मध्य प्रदेशात पळ काढल्याची चर्चा होती.

दरम्यान, काही दिवसांपूर्वीच कोरटकर याने सुरुवातीला पश्चिम बंगाल आणि त्यानंतर दुबईत पळ काढल्याची चर्चा होती.

### खासदारांच्या वेतनात घवघवीत वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने खासदारांना मोठं गिफ्ट दिलं आहे. खासदारांच्या पगारात मोठी वाढ केली आहे. त्याचबरोबर दैनंदिन भत्ता आणि निवृत्ती वेतनात देखील वाढ केली आहे. याबाबतची अधिसूचना जारी केली आहे. संसदीय कामकाज मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, ही सुधारित वेतनश्रेणी १ एप्रिल २०२३ पासून लागू होणार आहे. पूर्वीच्या पगारापेक्षा आता खासदारांच्या पगारात मोठी वाढ झाली आहे. खासदारांचे मासिक वेतन पूर्वी १ लाख रुपये होते. आता ते वाढवून १ लाख २४ हजार रुपये प्रति महिना करण्यात आले आहे. त्याच वेळी, दैनिक भत्ता २ हजार रुपयांवरुन २ हजार ५०० रुपये इतका करण्यात आला आहे. माजी खासदारांचे मासिक पेन्शन २५ हजार रुपयांवरुन ३१ हजार रुपये » पान ७ वर

आवक वाढल्याने शेतकऱ्यांना फटका

# कांद्याच्या दरात मोठी घसरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मागील सप्ताहात राज्यातील प्रमुख कांदा बाजार आवारात लेट खरीप कांद्याची आवक घटल्यानं कांदा दरात सुधारणा होती. तर चालू सप्ताहात पुन्हा आवक वाढल्याने दर पुन्हा घसरले आहेत. मागील सप्ताहात सरासरी ३,००० रुपय क्विंटल होते. हेच दर टप्प्याटप्प्याने कमी होऊन, प्रति क्विंटल २,३२५ रुपये दर मिळाले. राज्यातील प्रमुख बाजार समित्यांमध्ये लेट खरीप कांद्याला किमान २०० रुपयांपासून, कमाल ३,४०० रुपयांपर्यंत, तर सरासरी २,१०० ते २,२०० रुपये दर मिळत आहेत.



राज्यात विविध भागात कांदा काढणी सुरू आहे. येत्या काळात उन्हाळी कांदा बाजारात येणार आहे. परंतु उन्हाळी कांदा बाजारात येत असतानाच दरामध्ये मोठी घसरण सुरू झाली. यामुळं शेतकरी पुरते हैराण झाले आहेत. आधीच लागवड आणि संगोपन खर्च वाढला असताना त्यात आता दर घसरत असल्यानं शेतकरी बेजार झाले आहेत. उन्हाळी कांद्याची बाजारात आवक वाढल्यानं दरात मोठा उतार आला आहे. दीड हजार रुपये क्विंटलपर्यंत दर घसरला आहे. धुळे जिल्ह्यात कांद्याचे क्षेत्र विस्तारत असून अनेक शेतकरी हे वर्षभर कांदा पीक घेतात. जिल्ह्यातील कांदा इंदौर, नाशिक, मुंबई, गुजराथच्या बाजार समितीत जातो. यंदाही उन्हाळी कांद्याचे क्षेत्र मोठे असून त्यातच मागील १५ दिवसांपासून उन्हाळी कांदा बाजारात येऊ लागला आहे. आवक अधिक असल्यानं दरात उतार आला आहे. महिन्यापूर्वी कांद्याला क्विंटलला चार हजारांपर्यंत भाव मिळत होता. मागील १० दिवसांपूर्वी अडीच हजार रुपये क्विंटलने कांदा विकला. पण, सध्या तर १ हजार ६०० रुपये प्रति क्विंटल दराने कांदा विकला जात आहे. » पान ७ वर

### चौथीच्या विद्यार्थिनीवर अत्याचार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली :** राज्यात महिला अत्याचाराच्या घटना सुरुच असल्याचे समोर येत आहे. पुण्यात शाळेत निघालेल्या मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना घडली आहे. नराधमाने खाऊचे आमिष देऊन चौथीच्या विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पुण्यातील वाघोलीत सोमवारी आठ वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला आहे. या प्रकरणी २७ वर्षीय नराधम तरुणाला अटक करण्यात आली आहे. पुण्यात पुन्हा एकदा अत्याचाराची घटना घडल्याने महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पुण्यातील या प्रकारानंतर स्थानिकांकडून एकच संताप व्यक्त केला जात आहे. आरोपीवर कठोर कारवाईची मागणी केली जात आहे.

# बेरोजगारीविरोधात काँग्रेसची निदर्शने

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** देशभरातील बेरोजगारीच्या मुद्यावर काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली, इंडिया अलायन्सच्या विद्यार्थी संघटनांनी सोमवारी दिल्लीतील जंतरमंतरवर निदर्शने केली. विद्यार्थी संघटना राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी), नियुक्त्यांबाबत यूजीसीच्या प्रस्तावित मार्गदर्शक तत्त्वे मागे घेण्याची आणि विद्यार्थी संघटनांची पुनर्स्थापना करण्याची मागणी केली आहे.

राहुल गांधी म्हणाले की, देशातील सर्वात मोठा मुद्दा रोजगाराचा आहे आणि सरकार या मुद्यावर गप्प आहे. राहुल म्हणाले की आम्ही विद्यार्थ्यांच्या हिताशी तडजोड करणार नाही. » पान ७ वर



> विद्यार्थ्यांना हे सांगण्याची जबाबदारी तुमची आहे की विद्यापीठाचे कुलगुरू हे आरएसएसचे आहेत. येणा-या काळात, सर्व विद्यापीठांचे कुलगुरू आरएसएसच्या नामांकनातून नियुक्त केले जातील. हे देशासाठी धोकादायक आहे. आपल्याला हे थांबवावे लागेल. काही दिवसांपूर्वी पंतप्रधानांनी कुंभमेळ्यावर भाषण दिले. यावर बोलणे चांगले आहे, परंतु तुम्ही भविष्याबद्दलही बोलले पाहिजे. तुम्ही बेरोजगारीबद्दल बोलले पाहिजे, देशातील तरुणांना बेरोजगार बनवल्याबद्दल बोलले पाहिजे."
>
> **— राहुल गांधी,** लोकसभा विरोधी पक्षनेते

# सेन्सेक्स १,०७८ अंकांनी वाढून बंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

अर्थवृत्त

**मुंबई :** जगातिक सकारात्मक संकेत, मजबूत झालेला रुपया आणि परकीय गुंतवणुकीचा ओघ वाढल्याने भारतीय शेअर बाजाराने सोमवारी तेजीचा 'षटकार' मारला. सलग सहाव्या सत्रांत सेन्सेक्स आणि निफ्टी वाढून बंद झाले. आजच्या सत्रात सेन्सेक्सने जवळपास १,२०० अंकांची वाढ नोंदवून ७८ हजारांचा टप्पा ओलांडला. ७ फेब्रुवारीनंतर पहिल्यांदाच बीएसई सेन्सेक्सने ७८ हजारांचा टप्पा ओलांडण्याची ही पहिलीच वेळ आहे. त्यानंतर सेन्सेक्स १,०७८ अंकांच्या वाढीसह ७७,९८४ वर बंद झाला, तर निफ्टी ३०७ अंकांनी वाढून २३,६५८ वर स्थिरावला. निफ्टीने चालू वर्षातील संपूर्ण तोटा भरून काढण्याच्या दिशेने वाटचाल केली आहे.

बीएसई सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल २४ मार्च रोजी ५.१९ लाख कोटींनी वाढून ४१८.४९ लाख कोटींवर पोहोचले. गेल्या शुक्रवारी २१ मार्च रोजी बाजार भांडवल ४१३.३० लाख कोटी रुपये होते. याचाच अर्थ आज गुंतवणूकदारांना ५.१९ लाख कोटींचा फायदा झाला. विशेष म्हणजे बँकिंग आणि आयटी शेअर्समधील वाढीमुळे बाजारातील तेजीला चालना मिळाली. सर्व बँकिंग आणि आयटी शेअर्सचे निफ्टीच्या दिवसातील वाढीत » पान ७ वर

# मल्लखांबांचे प्रात्यक्षिक : करमरकर भगिनींची वाटचाल



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** क्रीडा प्रशिक्षक आणि मल्लखांबाचे प्रचारक असलेल्या वडिलांच्या मार्गदर्शनातून एक-दोन नव्हे तर चक्क नऊ मुलींनी शिस्त अंगी बाणवत क्रीडा क्षेत्रात नावलौकिक कमावला. स्वातंत्र्यपूर्व काळात लोकप्रिय क्रीडाप्रकार असलेल्या वेताचा आणि दोरीवरचा मल्लखांब याचे प्रात्यक्षिक सादर करणाऱ्या सात करमरकर भगिनींची वाटचाल त्यांच्याशी झालेल्या दिलखुलास संवादातून उलगडली. आई-वडिलांनी दिलेल्या संस्कारांच्या शिदोरीवर आयुष्याला आकार देत असताना त्यांनी लहानपणापासून लावलेली व्यायामाची गोडी, समाजकार्याची निर्माण केलेली आवड यामुळेच आयुष्यात यशस्वी झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.



हिंदू महिला सभेतर्फे 'आमचे नवरंगी कर्तृत्व' या कार्यक्रमामध्ये या सर्व करमरकर भगिनींच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेणारा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. आशा करमरकर (सध्याच्या मीना आपटे), सरला करमरकर (सुप्रिया बर्वे), शीला करमरकर (सुनीला देवधर), शिरीष करमरकर (वैशाली भट), रेखा करमरकर (रुक्मिणी साठे), कांचन करमरकर (शिल्पा पटवर्धन), वर्षा करमरकर (सोनिया पटवर्धन) या भगिनींशी लेखिका माधुरी ताम्हणे यांनी संवाद साधला. हिंदू महिला सभेच्या अध्यक्षा सुप्रिया दामले आणि उपाध्यक्षा मधुरा जोगळेकर या वेळी उपस्थित होत्या.

आमचे वडील आप्पा म्हणजे मिरजेतील प्रसिद्ध वैद्य म. द. करमरकर यांनी आमच्यामध्ये लहानपणापासूनच खेळाची गोडी निर्माण केली. त्यामुळे आयुष्याला आकार येत गेला. त्यांच्या शिस्तीपुढे आमचे काहीच चालायचे नाही. पहाटे पाच वाजता आमचा » पान ७ वर



## ‘स्वर गंधार’ कार्यक्रमाचे शनिवारी आयोजन

**पुणे :** पुण्यातील प्रसिद्ध संवादिनीवादक आणि तालयोगी पं सुरेश तळवलकर व तन्मय देवचके यांचे शिष्य असलेल्या अमेय बिच्चु यांच्या गंधार क्रिएटिव्हज् या संस्थेच्या वतीने येत्या शनिवार दि. २९ मार्च रोजी ‘स्वर गंधार’ या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कोथरूड मयूर कॉलनी येथील एमईएस बालशिक्षण सभागृहात सकाळी ९.३० वाजल्यापासून सदर कार्यक्रम संपन्न होईल. कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून त्यास प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर प्रवेश देण्यात येईल.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ज्येष्ठ गायक पं उल्हास कशाळकर आणि तालयोगी पं सुरेश तळवलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत गंधार क्रिएटिव्हज् चे औपचारिक उद्‌घाटन होईल. यानंतर पं शिवकुमार शर्मा यांचे शिष्य डॉ. शंतनू गोखले यांचे संतूरवादन होईल. यावेळी आशय कुलकर्णी हे तबलासाथ करतील. कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात पं उल्हास कशाळकर यांचे गायन रंगेल. त्यांना पं सुरेश तळवलकर हे तबला तर अमेय बिच्चु हे संवादिनीवर साथसंगत करतील.

## शिक्षक चाचणी मे-जून मध्ये

**पुणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरतीसाठी शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (टेट) मे - जून २०२५ मध्ये होणार आहे.

पात्र उमेदवारांनी परीक्षेबाबत आवश्यक पूर्वतयारी करावी. परीक्षेबाबतची अधिसूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर यथावकाश प्रसिद्ध केल्यानंतर उमेदवारांनी संकेतस्थळावर भेट द्यावी, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे आयुक्त अनुराधा ओक यांनी स्पष्ट केले आहे.

## सुरक्षा विषयक कार्यशाळा

**पुणे :** राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहानिमित्त डीईएस टेक्निकल इन्स्टिट्यूट आणि स्पेक्ट्रम सुरक्षा कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने सुरक्षा विषयक चर्चासत्र आणि कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यात औद्योगिक सुरक्षेविषयी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले.

डीईएस टेक्निकल इन्स्टिट्यूटच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष खेमराज रणपिसे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. यावेळी टाटा टेक्नॉलॉजीच्या जागतिक विभागाचे माजी प्रमुख कर्नल रवींद्र टोलेटी, इंडियन रेयॉनचे माजी वरिष्ठ अधिकारी दीपक डोरिक, प्राचार्य डॉ. आर. एच. डोंगरे आणि सुरक्षा परिषदचे संयोजक पंकज शहा, सतीश चव्हाण, प्रदीप कुलकर्णी उपस्थित होते.

भारती हॉस्पिटलचे सुरक्षा अधिकारी चैतन्य दादास यांनी अग्निशमन परिभाषेचे स्पष्टीकरण, आगीचे प्रकार आणि अग्निशामक यंत्राचे प्रकार व वापर याविषयी माहिती दिली. ऋतुजा यमकनमर्डी यांनी सूत्रसंचालन केले. स्पेक्ट्रम सेफ्टी कौन्सिलच्या बी. एस. संगवार यांनी आभार मानले.

## काँग्रेसतर्फे इफ्तार पार्टी

**पुणे :** पुणे शहर जिल्हा काँग्रेसतर्फे पवित्र रमजान सणानिमित्त ‘दावत ए इफ्तार’चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, पुणे शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अरविंद शिंदे, उल्हास पवार, मोहन जोशी, अभय छाजेड, दीप्ती चौधरी, लता राजगुरू, सुजाता शेट्टी, संजय बालगुडे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन रफिक शेख व रशीद शेख यांनी केले.

## ‘जागृती’ परिवाराचा भूतान दौरा उत्साहात

**पुणे :** सिंहगड रस्त्यावरील पु. ल. देशपांडे उद्यानात सकाळी फिरायला येणाऱ्या जागृती मित्रपरिवाराच्या ज्येष्ठ नागरिकांचा भूतान दौरा नुकताच उत्साहात झाला. या दौऱ्यात भूतानमधील विविध पर्यटनस्थळांची पाहणी झाली. त्यात फॉन्ट शिलिंग, थिंपू पुनाखा, पारो, डोचुला पास, चेलेला पास आदी निसर्गरम्य ठिकाणे पाहण्यात आली. त्यात बर्फात खेळण्याचाही आनंद पर्यटकांनी लुटला. दौऱ्यात भूतानचे पर्यटनमंत्री लोकनाथ शर्मा यांची भेट झाली. पर्यटकांतर्फे त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच त्यांनी भूतान पर्यटनाची सविस्तर माहिती देत आवश्यक सहकार्य देण्याचे आश्वासन दिले.

जागृती मित्रपरिवाराचे प्रमुख सतीश पुराणिक, मुकुंद जोशी, सुनील देशपांडे, विहार ट्रॅव्हल्सचे संचालक दीपक पुजारी, ‘आई, कुठे काय करते’मधील अप्पा ऊर्फ किशोर महाबोले व संगीता महाबोले, चंद्रकांत देशमुख यांनी त्यांचा सन्मान केला. या प्रसंगी पु. ल. देशपांडे जागृती परिवाराचे ५५ सदस्य उपस्थित होते.


# उन्हाचा ‘कडाका’ अन् आजारांचा ‘तडाखा’..!

### राज्यात उष्माघाताचे २१ रूग्ण; रूग्णालयांना ‘अलर्ट’चे शासनाचे आदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



राष्ट्रसंचार EXCLUSIVE



**पुणे :** राज्यात उन्हाची तीव्रता वाढू लागल्याने उष्णतेशी निगडित आजारांचा धोका वाढू लागला आहे. राज्यात उष्माघाताच्या रुग्णसंख्येत वाढ सुरूच असून, आतापर्यंत २१ रुग्णांची नोंद झाली आहे. सर्वाधिक रुग्ण गडचिरोलीत आहेत. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य विभागाने नागरिकांना खबरदारीचा इशारा दिला आहे.

राज्यात २१ मार्चपर्यंत उष्माघाताचे २१ रुग्ण आढळून आले असून, त्यात गडचिरोलीत सर्वाधिक ४ रुग्ण असून त्याखालोखाल बुलढाणा, नागपूर प्रत्येकी ३ रुग्ण, पालघर, लातूर प्रत्येकी २ रुग्ण, नांदेड, नाशिक, धाराशिव, रायगड, सांगली, वर्धा आणि ठाणे प्रत्येकी १ अशी रुग्णसंख्या आहे. राज्यात उन्हाचा पारा वाढला आहे. उन्हाळ्यामुळे तापमान वाढल्याने आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. उष्णता जास्त वाढल्याने उष्माघातासह आरोग्यविषयक इतर समस्या निर्माण होत आहेत.

उष्णतेच्या लाटेचा सर्वाधिक परिणाम लहान मुले, वृद्ध नागरिक, गर्भवती, स्तनदा माता, शारीरिक श्रम करणाऱ्या व्यक्ती, सहव्याधीग्रस्त अशांना होतो. त्यामुळे त्यांनी उन्हाळ्यात विशेष काळजी घ्यावी. लहान मुले आणि वृद्धांना पुरेसे पाणी पिण्यास द्या. गर्भवतींनी उन्हात जाणे टाळावे आणि हलका आहार घ्यावा. उन्हात काम करणाऱ्यांनी अधूनमधून विश्रांती घ्यावी. जास्त घाम येत असेल तरी ओआरएस, साखर-मीठ पाणी किंवा ताक प्यावे. आजारी व्यक्तींना या काळात अधिक त्रास होण्याची शक्यता असल्याने काळजी घ्यावी आणि गरज भासल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आरोग्य विभागाने म्हटले आहे.

आरोग्य विभागाच्या उपाययोजना

आरोग्य विभागाने सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये उष्णतेशी संबंधित समस्यांवर उपचार करण्यासाठी विशेष कक्ष सुरू केले आहेत. सर्व जिल्हा आणि महापालिका स्तरांवरील साथरोग वैद्यकीय अधिकाऱ्यांचे उष्माघात विषयक प्रशिक्षण घेण्यात आले आहे. त्यांच्या मार्फत आरोग्य संस्थांमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रशिक्षणही झाले आहे. सर्व आरोग्य संस्थांना उष्णतेशी संबंधित आपत्कालीन समस्यांवर उपचाराच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असेही आरोग्य विभागाने स्पष्ट केले.

### काळजी काय घ्यावी?

- गडद रंगाचे आणि जाड कपडे घालू नका.
- दुपारच्या वेळी उन्हात जाणे टाळावे.
- उन्हात शारीरिक कामे करणे टाळावे.
- शीतपेये, सोडा अथवा अल्कोहोलयुक्त पेये टाळावीत.
- हलका आहार घ्यावा.

### उष्माघाताचा तडाखा

| वर्ष | एकूण रुग्ण | मृत्यू |
|---|---|---|
| २०२३ | ३,१९१ | १४ |
| २०२४ | ३४७ | १ |
| २०२५ (२१ मार्चपर्यंत) | २१ | ० |

## ६४ रेल्वेच्या अतिरिक्त वेळेत घट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे रेल्वे प्रशासनाने पुण्याहून धावणाऱ्या ६४ रेल्वेच्या ‘लूज मार्जिन’मध्ये (अतिरिक्त वेळ) घट केली आहे. त्यामुळे ६४ रेल्वेच्या वेळेत बचत झाली. पुणे-मनमाड ‘सेक्शन’मध्ये धावणाऱ्या सर्वाधिक गाड्यांचा यात समावेश आहे. गाड्यांच्या धावण्याच्या वेळेत घट झाल्याने प्रवाशांच्या वेळेत किमान १० ते १५ मिनिटांची बचत झाली आहे. रेल्वेगाड्या वेळेवर धावाव्यात, यासाठी देखील परिचालन विभाग प्रयत्न करीत आहे.

पुणे स्थानकावरून दररोज सुमारे १५० रेल्वे धावतात. यातील काही गाड्या पुणे स्थानकावरून प्रवास सुरू करतात, तर काही गाड्या पुणे स्थानकावरून पुढच्या प्रवासाच्या दिशेने जातात. यातील ६४ रेल्वे गाड्यांना पुणे विभागातील विविध सेक्शनमध्ये देण्यात आलेली अतिरिक्त वेळ घालविण्यात आली आहे. विविध कारणासाठी रेल्वे प्रशासनाच्या वेळापत्रकात प्रत्येक गाडीसाठी अतिरिक्त वेळेची तरतूद केली असते. मात्र, यामुळे प्रवासाचा वेळ वाढतो. परिणामी प्रवाशांना गंतव्यस्थानी पोहोचण्यासाठी उशीर होतो.

# विद्यापीठात होणार मध्यवर्ती स्वयंपाकघर

### सिनेट सदस्यांचा अधिसभेत ठराव; विद्यार्थ्यांना मिळणार उच्च दर्जाचे भोजन

गेल्या काही महिन्यांच्या कालावधीत विद्यापीठात सर्व काही आलबेल नसल्याचे स्पष्ट झाले आहे. विद्यापीठाच्या वसतीगृहात उंदीर आणि ढेकणांचा झालेला सुळसुळाट आणि त्यातून विद्यार्थ्यांना सहन करावा लागणारा त्रास यामुळे विद्यापीठ प्रशासनावर टीकेची झोड उठत आहे. त्यातच विद्यापीठात चक्क गांजा आणि दारूच्या बाटल्या सापडल्याने विद्येच्या माहेरघराची अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली आहेत, त्याच पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या अधिसभेत सदस्यांनी यासंदर्भात टीकेची झोड उठवत प्रशासनाला धारेवर धरले. तसेच विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे अन्न मिळावे यासाठी स्वतंत्र स्वयपांकघर सुरू करण्याची मागणीही करण्यात आली, त्यामुळे विद्यार्थ्यांना उत्तम अन्न मिळण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

> विद्यापीठाच्या वसतिगृहात गांजा सापडल्याची प्रकरणे उघडकीस आली होती. त्यामुळे अमली पदार्थ सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची जागृती विद्यार्थ्यांमध्ये करण्यासाठी, असे प्रकार विद्यापीठात घडू नयेत यासाठी विद्यापीठात कार्यशाळा आयोजित करावी.
>
> **-डॉ. अपर्णा लळिंगकर,** अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा नुकतीच झाली. या अधिसभेची कार्यक्रमपत्रिका अंतिम करण्यात आली आहे. त्यात अधिसभा सदस्यांनी विविध विषयांवर ठराव मांडले आहेत. गेल्या काही काळात विद्यापीठातील वसतिगृहांत उंदीर, ढेकणांच्या प्रादुर्भावाचा विषय गाजला होता. तसेच, भोजनात अळी, झुरळे सापडण्याचेही प्रकार समोर आले आहेत. अशाच एका प्रकारानंतर विद्यार्थी संघटनेने एक भोजनगृह बंद पाडले होते. या पार्श्वभूमीवर विद्यापीठात आता मध्यवर्ती स्वयंपाकघर सुरू करण्याचा ठराव अधिसभा सदस्य प्रसेनजित फडणवीस यांनी मांडला आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व भोजनगृहांत एकाच दर्जाचे भोजन उपलब्ध होण्यासाठी मध्यवर्ती स्वयंपाकघर सुरू करण्याची मागणी विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांनी केली आहे. तसा ठराव मांडण्यात आला आहे. त्याचबरोबर विद्यापीठातील वसतिगृहात गांजा सापडल्याच्या प्रकरणानंतर अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्याचीही मागणी अधिसभा सदस्यांनी केली आहे.

विद्यापीठातील प्लेसमेंट सेल आणि करिअर समुपदेशन कक्षासाठी पूर्ण वेळ अधिकारी देण्याच्या मागणीचा ठराव अधिसभा सदस्य राहुल पाखरे यांनी मांडला आहे. विद्यापीठातील अध्यासनांच्या कामकाजाचा आढावा प्रत्येक अधिसभेपुढे नियमितपणे ठेवण्याचा ठराव जयंत काकतकर यांनी मांडला आहे. विद्यापीठाने जगातील गरजू देशांमध्ये ऑफशोअर कॅम्पस सुरू करावेत, त्यासाठी विद्यापीठात स्वतंत्र विभाग सुरू करण्याचा ठराव विनायक आंबेकर यांनी मांडला आहे. तर, विद्यापीठातर्फे नेमल्या जाणाऱ्या विविध समित्यांमध्ये सदस्य समावेशाबाबतचे, एका सदस्याने एका वर्षात किती समित्यांवर काम करावे, या संदर्भात स्पष्ट निकष ठेवण्याची मागणी डॉ. सुनील लोखंडे यांनी केली आहे.

विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यासाठी विद्यापीठाकडून जीवनसाधना गौरव पुरस्कार देण्यात येतात. मात्र, यंदा हे पुरस्कार घाऊक स्वरुपात देण्यात आल्याने पुरस्कार बंद करण्याची मागणी करण्यात आली होती. या अनुषंगाने जीवनसाधना गौरव पुरस्कार देण्यासाठी निवड समिती नियुक्त करून समितीने निवडलेल्या व्यक्तींचाच विचार पुरस्कारासाठी करण्याचा ठराव डॉ. भागुजी निगळे यांनी, तर बाळासाहेब सागडे यांनी जीवनसाधना गौरव पुरस्कारासाठी काही निकष निश्चित करण्याचा ठराव मांडला आहे.

### या आहेत अधिसभा सदस्यांच्या मागण्या

- स्वतंत्र स्वयपांकघर सुरू करा
- अंमली पदार्थांपासून दूर राहाण्यासाठी समुपदेशन व्हावे
- विद्यापीठाची सुरक्षा अधिक कडक करावी
- अध्यासनाच्या कामकाजाचा आढावा घ्यावा
- जीवन गौरव पुरस्काराचे निकष ठरवावेत

## खराडी परिसर वाहतुकीसाठी बनला धोकादायक



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खराडी परिसरात विविध शाळा, महाविद्यालये आहेत. मुलांना शाळेत घेऊन जाणारी वाहनांची संख्या तसेच, सायकलवरून शाळेत जाणाऱ्या, दुचाकीवरून कामाला जाणाऱ्यांची संख्या अधिक आहे. परिसरात लहान-मोठ्या दगडाने काठोकाठ भरलेले डंपर, ट्रक, हायवा असे अतिअवजड वाहने सर्रासपणे वेगाने जाताना दिसतात.

खराडीतील मुंढवा पूल, खराडी बायपास, नगररोड जकात नाका तसेच, अंतर्गत रस्त्यावर दगडांनी कठड्याच्यावर भरलेले अतिअवजड वाहने सर्रासपणे वाहतूक करताना दिसतात. अशा वाहतुकीवर नियंत्रण आणण्यास वाहतूक पोलिस अपयशी ठरले आहेत. त्यामुळे नागरिकांच्या जिवाशी खेळ होत आहे. अशा वाहनांवर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली.

गतिरोधकावर हे वाहन गेल्यावर त्यातील दगड रस्त्यावर पडून मागून येणाऱ्या सायकल, दुचाकीवर किंवा शालेय वाहतूक करणाऱ्या वाहनावर पडून मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही. खराडीत इमारत बांधण्याची कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. खोदाई करताना निघालेल्या लहान-मोठ्या दगडाची वाहतूक केली जाते. अशी मोठी वाहने क्षमतेपेक्षा अधिक दगड घेऊन 'ओव्हरलोड' वाहतूक नेहमीच करत असतात. त्यामुळे वाहतूक विभागाने लक्ष देऊन कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

> 'हायवा' मालक, चालकांबरोबर दोन वेळा बैठक झाली होती. तरीही क्षमतेपेक्षा अधिक मालाची वाहतूक करतात, त्यांच्यावर वाहतूक शाखेकडून कारवाई केली जाते.
>
> **— प्रशांत किरवे,** पोलिस निरीक्षक, चंदननगर वाहतूक शाखा

## ‘कंस’ प्रकार मैफलीत आरती ठाकूर-कुंडलकर यांचे गायन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतीय अभिजात शास्त्रीय संगीत अनेकविध रागरागिण्यांनी समृद्ध आहे. यातील ‘कंस’ या प्रकारातील विविध रागांचे मनोहारी दर्शन आज रसिकांना घडले. किराणा घराण्यातील ज्येष्ठ गुरू लीलाताई घारपुरे आणि जगविख्यात शास्त्रीय गायिका पद्मविभूषण डॉ. प्रभा अत्रे यांचे दीर्घकाळ मार्गदर्शन लाभलेल्या त्यांच्या ज्येष्ठ शिष्या आरती ठाकूर-कुंडलकर यांनी गुरूंच्या सान्निध्यात ग्रहण केलेल्या सांगीतिक वारश्यातील ज्ञान पुढील पिढीपर्यंत प्रवाहित रहावे या हेतूने या मैफलीची मांडणी केली होती.

आरती ठाकूर-कुंडलकर यांच्या शिष्य परिवाराच्या पुढाकारातून स्वरावर्तन फाऊंडेशनतर्फे या राग संगीताच्या मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. दिलीप देवधर यांची विशेष उपस्थिती होती.

कुंडलकर यांनी मैफलीची सुरुवात चंद्रकंस रागातील ‘अब कल नाही मनवा’ या विलंबित एकतालातील बंदिशीने केली. या नंतर तीन तालातील ‘मूरत मन भाए मोहन की’ ही बंदिश सादर करून त्याला जोडून कौशिकरंजनीतील आडा चौतालातील सुयोग कुंडलकर रचित ‘मोरी आली मोहे अब नाही चैन’ ही बंदिश प्रभावीपणे सादर केली.



पुणे कंस प्रकारातील राग संगीताच्या विशेष मैफलीत संजय देशपांडे, मीनलता जोशी-देशपांडे, आरती ठाकूर-कुंडलकर, कस्तुरी कुलकर्णी, सुयोग कुंडलकर.

# कसदार गायन, सुरेल संतूरवादनाने पं जितेंद्र अभिषेकी महोत्सवाचा समारोप



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शैक्षणिक तज्ज्ञ, संगीतकार व पं. जितेंद्र अभिषेकी यांचे शिष्य असलेल्या प्रा समीर दुबळे यांचे कसदार गायन, पं अभय रुस्तुम सोपोरी यांचे घराणेदार संतूरवादन आणि भजन सम्राट अनुप जलोटा यांची भावपूर्ण भजने अशा एकाहून एक सरस सादरीकरणाने आज १९ व्या पं. जितेंद्र अभिषेकी महोत्सवाचा समारोप झाला.

आपला परिसर आणि तरंगिणी सांस्कृतिक प्रतिष्ठान यांच्या वतीने रसिक प्रेक्षकांच्या भरघोस प्रतिसादात हा तीन दिवसीय महोत्सव संपन्न झाला. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पं. शौनक अभिषेकी, पं. सत्यशील देशपांडे, उज्ज्वल केसकर, डॉ. सतीश देसाई आदी मान्यवर यावेळी आवर्जून उपस्थित होते.

यावेळी चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पहिला विद्याताई अभिषेकी स्मृती पुरस्कार लेखिका शैला मुकुंद यांना प्रदान करण्यात आला. यावेळी बोलताना चंद्रकांत पाटील यांनी मागील १९ वर्ष आयोजित होत असलेल्या पं जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सवाचे कौतुक केले. या महोत्सवात दिग्गज कलाकारांसोबत युवा आश्वासक गायकांसाठी होत असलेल्या ‘युवोन्मेष’ या उपक्रमाचे कौतुकही पाटील यांनी केले. सांस्कृतिक क्षेत्रात नवी पिढी तर होणे आवश्यक असून अशा महोत्सवाद्वारे त्याला वाव दिला जात असल्याचे समाधान पाटील यांनी व्यक्त केले.

वयाच्या १० व्या वर्षापासून मी पं अनुप जलोटा यांची भजने ऐकत आलो आहे. एखाद्या भजनाने आपली इष्ट देवता आपल्या समोर साकारणे म्हणजे काय हे त्यांच्या भजनातून आपण अनुभवतो असे सांगत पाटील यांनी जलोटा यांचे कौतुक केले.

यावेळी पुण्यातील त्यातही कोथरूडमधील बागांमध्ये होणारे सांस्कृतिक कार्यक्रम महानगरपालिकेने बंद केले होते ते सुरू करण्याच्या सूचना चंद्रकांत पाटील यांनी दिल्या त्याबद्दल उज्ज्वल केसकर यांनी पाटील यांचे आभार मानले. यानंतर ताथवडे उद्यानात दर महिन्याला दोन सांस्कृतिक कार्यक्रम होतील असेही केसकर यांनी जाहीर केले.

प्रा. समीर दुबळे यांनी राग श्याम कल्याणने महोत्सवाच्या पाचव्या व शेवटच्या सत्राला आपल्या सादरीकरणाने सुरुवात केली. यामध्ये त्यांनी 'आओ ना मोरे पिया...', 'पायल मोरी पायल, रे सजना...', 'बेला सांझ की...' या रचना पेश केल्या. ' आधी रचिली पंढरी...' या संत नामदेवांच्या अभंगाने त्यांनी समारोप केला. प्रा दुबळे यांना उदय कुलकर्णी (संवादिनी), चारुदत्त फडके (तबला), ज्ञानेश्वर दुधाने (पखवाज), निलेश धाक्रस (गायन) तर रविराज काळे व पल्लवी पिळणकर (तानपुरा) यांनी साथसंगत केली.

यानंतर प्रसिद्ध संतूर वादक, संगीतकार पं अभय रुस्तुम सोपोरी यांचे संतूर वादन रंगले. यावेळी त्यांनी राग जोग ची प्रस्तुती केली. यामध्ये त्यांनी सुरुवातीला आलाप जोड सादर केले. यानंतर त्यांनी काही गत, बंदिशी, झपताल, छंद, तराणा यांची प्रस्तुती केली. आपले वडील पं भजन सोपोरी यांचे तीन तालातील गतही त्यांनी वाजविली.आपल्या वडिलांची आणि घराण्याची शैली म्हणून प्रसिद्ध असलेल्या 'सोपोरी बाज' चे बहारदार सादरीकरण त्यांनी केले.

## ब्राम्हण समाजाचा वधू-वर मेळावा संपन्न

**पुणे :** कोथरूड मधील ब्रह्मे हॉल येथे नववधू ग्रुप तर्फे ब्राह्मण वधू वर सूचक मेळावा आयोजित करण्यात आला होता.ह्या मेळाव्यात ४८ इच्छित वधू, वर तसेच त्यांचे पालक हजर होते. ह्या मेळाव्यात जमलेल्या सर्वांना चैतन्य भाषा प्रसार मंडळ या संस्थेच्या संचालिका अनिता जोशी यांनी विवाहाचे आपल्या हिंदू संस्कृतीत असलेले महत्व ,त्याच्या रीतीभाती सांगितल्या तसेच मुला मुलींनी पुणे,मुंबई या शहरातीलच जोडीदार पाहिजे असा अट्टाहास करू नका असे सांगितले तर शाळेच्या अध्यापिका अवंती बायस यांनी विवाहापूर्वी आपल्या जोडीदाराची माहिती तपासून बघितली पाहिजे,कायदेशीरदृष्ट्या काय महत्वाचे असते. या मेळाव्यामध्ये चैतन्य भाषा प्रसार मंडळाविषयी माहिती सांगण्यात आली तसेच सर्व वधूवरांनी आपली माहिती मराठीतून भरण्यासाठी चैतन्य भाषा प्रसार मंडळांनी आग्रहाने त्यांना विनंती केली आले.





## सिंबायोसिसतर्फे जर्मनीतील शिक्षणासाठी मार्गदर्शन

**पुणे :** सिंबायोसिस स्कील्स अॅन्ड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, पुणे (SSPU) ने अॅलेन युनिव्हर्सिटी, जर्मनी सोबत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मार्गदर्शना करीता चर्चा सत्राचे आयोजन केले होते. आज अॅलेन युनिव्हर्सिटीच्या अधिकाऱ्यांनी सिंबायोसिस स्कील्स अॅन्ड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीला भेट दिली.

अॅलेन युनिव्हर्सिटीतील, मिरियम कोल्मर-ट्रायनी (एमए), आंतरराष्ट्रीय संबंध आणि संशोधन विपणन तज्ञ, आणि प्रा. डॉ. अंजा डायकमन यांनी शिष्यवृत्तींबद्दल मौल्यवान माहिती दिली. या वेळी मेजर सोनाली कदम (निवृत्त) आणि राघवन संथानम, संचालक - स्कूल ऑफ पोर्ट्स, टर्मिनल मॅनेजमेंट, लॉजिस्टिक्स आणि सप्लाय चेन मॅनेजमेंट हे देखील उपस्थित होते.

या चर्चा सत्रामध्ये विद्यार्थ्यांनी अर्ज प्रक्रिया, पात्रता निकष आणि आंतरराष्ट्रीय शिक्षणाचे फायदे जाणून घेतले. सिंबायोसिस स्कील्स अॅन्ड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी आणि अॅलेन युनिव्हर्सिटी यांच्या सहयोगामुळे जागतिक संधी आणि शैक्षणिक प्राविण्य मिळवण्यासाठी एक नवा मार्ग खुला झाला आहे.

## सलग चार तासाहून अधिक वेळ सादर करणार लावणी

**पुणे :** लावणीच्या समृद्ध परंपरेला जागतिक पातळीवर नेण्यासाठी अभिनेत्री गायिका आणि सामाजिक कार्यकर्त्या पुष्पा प्रदीप चौधरी अनोखा विश्वविक्रम करणार आहेत. सलग ५१ लावणी गीतांचे सादरीकरण करून 'वर्ल्ड रेकॉर्डस इंडिया' आणि वंडर बुक ऑफ रेकॉर्ड इंटरनॅशनल' मध्ये विक्रम नोंदविण्यासाठी त्या सज्ज आहेत. विश्वविक्रमाचा हा सोहळा बुधवार, दिनांक २६ मार्च रोजी सकाळी ९.३० ते दुपारी ३ वाजेपर्यंत कोथरूड मधील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात होणार आहे, अशी माहिती पुष्पा चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.



पत्रकार परिषदेला रत्ना दहीवेलकर, अनिरुद्ध हळंदे उपस्थित होते. स्वामिनी म्युझिक, डान्स अँड अॅक्टींग अकॅडमी वारजे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

मराठी लावणी ला जागतिक पातळीवर नेण्यासाठी पुष्पा चौधरी यांनी या विश्वविक्रमासाठी पुढाकार घेतला आहे. कार्यक्रमाला ज्येष्ठ कलाकार लीला गांधी, सुरेखा पुणेकर, माया खुटेगावकर, श्वेता शिंदे, माधुरी पवार, प्राजक्ता गायकवाड, प्रतीक्षा जाधव, आरती शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले, सिद्धेश्वर झाडबुके, सुरेश विश्वकर्मा, प्रदीप कोथमीरे तसेच कला व सामाजिक क्षेत्रातील मंडळी याशिवाय वॅलेंटिना ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे विश्वस्त देखील उपस्थित राहणार आहेत.

# पुणेकरांना दूषित पाण्याचा 'डोस'..!

### साथीचे आजार बळावले, नागरिकांना उलट्या व जुलाबाचा त्रास



राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** उन्हाचा कडाका वाढत असतानाच नागरिकांची पाण्याची 'तहान' वाढली आहे; हे वास्तव असतानाच शहराला चक्क दूषित पाण्याने 'विळखा' घातला असून या पाण्याचा स्रोत मिळत नसल्याने महापालिका प्रशासनही हतबल झाले आहे. त्यामुळे पुणेकरांना दूषित पाण्याचा 'डोस' घेण्याची वेळ आली आहे, त्यातूनच साथीचे आजार बळावले आहेत. नागरिकांना विशेषत: लहान मुलांना जुलाब आणि उलट्यांचा त्रास होत आहे; त्यातूनच नागरिक दिशाहिन झाले आहेत.

गेल्या काही महिन्यांच्या कालावधीत शहराला पाणीपुरवठा करत असलेल्या जलवाहिन्या खूप वर्षांपूर्वीच्या आहेत, या वाहिन्या गटार वाहिन्यांच्या शेजारीच असल्याने त्या वाहिन्यांचे पाणी जलवाहिन्यांमध्ये मिश्रीत होत आहे. त्यामुळे शहराच्या जवळपास सर्वच भागांना दूषित पाणीपुरवठा होत आहे, याचे प्रमाण शहराच्या मध्यवस्तीसह नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या गावांमध्ये सर्वाधिक आहे.

धक्कादायक बाब म्हणजे या जलवाहिन्या आणि गटार वाहिन्यांची माहितीच महापालिका प्रशासनाला नाही, त्यामुळे या वाहिन्या शोधताना प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यातूनच तीन ते चार महिन्यांपूर्वी सिंहगड रस्त्यावरील जवळपास सर्वच गावांमध्ये 'जीबीएस'च्या आजाराने अक्षरश: धुमाकुळ घातला होता, प्रशासनाने त्यासाठी केलेल्या पाहाणीत हा रोग दूषित पाण्यामुळेच होत असल्याचे स्पष्ट झाले होते.

त्यामुळे नागरिकांनी 'आरो प्लॉन्ट'चे पाणी वापरण्यास सुरूवात केली होती, त्यातून काही प्रमाणात दिलासा मिळेल अशी नागरिकांना आशा होती. मात्र; शहरातील बहुतांशी प्लॉन्टच्या माध्यमातून दूषित पाण्याचाच पुरवठा होत असल्याचा निष्कर्ष प्रशासनाने केलेल्या पाहाणीत निघाला होता. त्यामुळे नागरिकांनी काहीशी सावध भूमिका घेतली होती.

मध्यतंरीच्या काळात दूषित पाण्याचा पुरवठा काही प्रमाणात कमी झाला होता, त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला होता. मात्र; आता पुन्हा या दूषित पाण्याने डोके वर काढले असून शहराच्या बहुतांशी भागाला मैलापाणी सदृश्य पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे साथीच्या आजाराने अक्षरश: थैमान घातले आहे, नागरिकांना विशेषत: लहान मुलांना उलट्या आणि जुलाबाचा त्रास होत आहे. त्यामुळे सरकारी आणि खासगी दवाखाने अक्षरश: फुल्ल झाले आहेत, परिणामी नागरिक हतबल झाले असून त्यांच्यामध्ये भीतीदायक वातावरण निर्माण झाले आहे.

राष्ट्रसंचार EXCLUSIVE


### असा होतोय त्रास

- उलट्या, जुलाबाचा सर्वाधिक त्रास
- पाण्याला मैलापाण्याचा वास
- पोटात चमकणे आणि पोट दुखण्याच्या तक्रारी
- ब्लिचिंग पावडर टाकूनही पडत नाही फरक
- पाणी गाळून,उकळूनही वास



नागरिकांना शुद्ध पाण्याचा पुरवठा करणे ही महापालिका प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र; प्रशासन त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे ही बाब निश्चितच चिंताजनक अशीच आहे. त्यामुळे नागरिकांच्या उत्तम आरोग्यासाठी प्रशासनाने शुद्ध पाणीपुरवठा करण्यावर भर दिला पाहिजे.

**-योगेश घोरपडे देशमुख,** जिल्हा प्रमुख, शिवसेना सहकार सेना



जलवाहिन्या आणि गटार वाहिन्या शेजारी शेजारी असल्याने त्यामुळे पाणी दूषित होण्याचे प्रकार घडत आहेत; त्यानुसार ज्या भागातील तक्रारी आहेत तेथे जाऊन तपासणी करण्यात येत असून नागरिकांना शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यावर भर दिला जात आहे. याचा त्रास उदभवणार नाही यासाठी नागरिकांनीही सतर्कता बाळगण्याची आवश्यकता आहे.

**-नंदकिशोर जगताप,** पाणीपुरवठा प्रमुख, पुणे महापालिका




दूषित पाणीपुरवठा होत असल्याच्या अनेक नागरिकांच्या तक्रारी येत आहेत, त्यामुळे त्याची पडताळणी प्रशासनाच्या वतीने करण्याची गरज आहे. या पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे; ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी प्राधान्य दिले पाहिजे.

**-डॉ. सिद्धार्थ धेंडे**, माजी उपमहापौर, पुणे मनपा



वडगांवशेरी भागात बहुतांशी सोसायट्यांमध्ये दूषित पाणी येत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत, यासंदर्भात पाणीपुरवठा विभागाशी संपर्क साधून याची माहिती यापूर्वीच दिली आहे. त्यामुळे त्यासाठी आता प्रशासनानेच पुढाकार घ्यावा, अन्यथा आंदोलनाचा मार्ग पत्करावा लागेल.

**-शिवप्रसाद जठार,** उप शहर प्रमुख, शिवसेना (ठाकरे गट)



# उपअधिक्षकांचे 'मोजमाप'..!

### अमरसिंह पाटील यांच्या चौकशीचे आदेश

कोणत्याही सरकारी कार्यालयात सकाळी १० ते सांयकाळी ६ यावेळेतच 'अधिकृत' कामकाज चालावे असा राज्य आणि केंद्र शासनाचा लिखित नियम असून त्यासंदर्भात सर्व कार्यालयांना सूचना करण्यात आल्या आहेत. त्याशिवाय सरकारी अथवा साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी करण्यात आलेली कामे ग्राह्य धरण्यात येऊ नयेत अशी तंबीच शासनाने दिली आहे. मात्र; हे वास्तव असतानाही बहुतांशी सरकारी कार्यालयात 'उतावळा' कारभार सुरू असल्याची धक्कादायक माहिती यापूर्वी अनेकवेळा उघडकीस आली आहे. असेच काम करत असलेल्या भूमी अभिलेख कार्यालयातील उपअधीक्षकांच्या कामकाजाचे थेट 'मोजमाप' करण्याचा निर्णय वरिष्ठांनी घेतला आहे. त्यामुळे अशा प्रकारची कामे करत असलेल्या अधिकारी वर्गाला निश्चितच लगाम लागणार आहे.

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** हवेली तालुका उपअधीक्षक कार्यालयात शासकीय सुट्टीच्या दिवशी म्हणजे २२ मार्च व २३ मार्चला हवेलीचे मोजणी कार्यालय सुरू ठेवून कार्यालयीन तपासणी सुरू होती. अमरसिंह पाटील हे राज्यातील बड्या नेत्यांचे नातेवाईक लागतात. त्यांची चौकशी सुरू झाल्याने प्रशासकीय वर्तुळात एकच चर्चा रंगली आहे. बारामती, पुणे या ठिकाणी त्यांनी पोस्टिंग केलेल्या आहेत. हवेली तालुक्यात जमीन मोजणी प्रकरणांत गंभीर स्वरूपाची अनियमितता व प्राधान्यक्रमानुसार मोजणीची प्रकरणे निकालात न काढता वर्षानुवर्षे मोजणीची प्रकरणे प्रलंबित राहात आहेत. तक्रारींची दखल म्हणून राज्याच्या अप्पर जमाबंदी आयुक्त सरिता नरके यांनी चौकशी आदेश दिले आहेत.

हवेली तालुक्यात जमीन मोजणी प्रकरणांत मोठी अनियमितता आल्याने हवेली उपअधीक्षक कार्यालयाचे उपअधीक्षक अमरसिंह पाटील यांच्या कार्यालयीन कामकाजाची विभागीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करून चौकशी करण्याचे आदेश राज्याच्या प्रभारी अप्पर आयुक्त तथा अतिरिक्त संचालक भूमिअभिलेख यांनी दिले आहेत.

शासनाच्या तपासणी पथकामध्ये नाशिक प्रदेशाचे भूमिअभिलेख, जिल्हा अधीक्षक रोहिणी सागरे, बाभूळगाव जि. यवतमाळचे उपअधीक्षक प्रतीक मोकाशी, संगमनेर जि. अहिल्यानगरचे उपअधीक्षक भाऊसाहेब पवार, उपअधीक्षक भूमिअभिलेख पैठणचे मुख्यालय सहाय्यक संजय बोरडे, उपअधीक्षक भूमिअभिलेख, इगतपुरीचे भूकरमापक अतुल खैरनार, उपअधीक्षक भूमिअभिलेख, मालेगावचे भूकरमापक अक्षय जाधव यांचा समावेश आहे.



हवेलीच्या मोजणी कार्यालयाची तपासणी जमाबंदी आयुक्तांच्या आदेशाची अंमलबजावणी आजपासून सुरू झाली आहे. सलग दोन दिवस हवेली उपअधीक्षक कार्यालयाची तपासणी सुरू राहणार आहे. त्यानंतर चौकशी अहवाल जमाबंदी आयुक्त कार्यालयास सादर करण्यात येणार आहे.

**-सूर्यकांत मोरे,** जिल्हा अधीक्षक, भूमिअभिलेख पुणे



अमरसिंह पाटील यांनी शासनाच्या नियमांचा भंग केला असल्याचे उघडकीस आले आहे. अनेक वेळा त्यांच्या कामाची चौकशी करावी, अशी मागणी आम्ही केली होती. मात्र शासनाने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे अनेक नागरिकांना संघर्ष आणि अडचणींचा सामना करावा लागला. चुकीचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची तत्काळ चौकशी करून त्यांचे निलंबन करण्यात यावे, अन्यथा आम्ही तीव्र आंदोलन करू.

**-रोहन सुरवसे पाटील,** सरचिटणिस, प्रदेश युवक काँग्रेस

## चुकीच्या मोजणीने दोन सोसायट्या संकटात

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्याच्या चुकीच्या मोजणीने सोसायटीची ये-जा करण्याचा पूर्ण रस्ता दुसऱ्याच मिळकतीत दाखवला गेल्याने बालेवाडीतील २ सोसायट्या संकटात सापडल्या आहेत.भविष्यात या इमारती पाडल्या जाण्याचा आणि ६० कुटुंबाची ये-जा बंद होण्याचा धोका निर्माण झाला असून या संशयास्पद कृतीविरुद्ध संबंधित भू-कर मापक कर्मचाऱ्यावर कारवाई करावी,अशी लेखी तक्रार आणि मागणी सोसायटी पदाधिकाऱ्यांनी भूमी अभिलेख कार्यालयाकडे केली आहे.

बालेवाडी येथील अमित एमराल्ड पार्क सोसायटी आणि सेलिब्रेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यानी ही तक्रार नोंदवली आहे.खासगी मिळकतदारासाठी हे कारस्थान केल्याचा आरोप या पदाधिकाऱ्यांनी आज पत्रकार परिषदेत केला.

अमित इम्राल्ड पार्क चे अध्यक्ष डॉ. विजय भिलवाडे,सेलिब्रेशन सोसायटीचे सचिव संतोष छाजेड, राजाराम ढवळे यांच्यासह अनेक पदाधिकारी,फ्लॅट धारक उपस्थित होते.

बालेवाडी येथे स. नं ३१/१ मध्ये अमित एमराल्ड पार्क सोसायटी आणि सेलिब्रेशन सोसायटी आहे. इमारती चे नकाशे २००७ आणि २०१० ला महापालिकेकडून मान्य झाले व त्यानंतर बांधकाम होऊन लोकांनी ह्या इमारती मधे सरकारी स्टैम्प ड्यूटी भरून फ्लॅट विकत घेतले व त्याला महापालिकेने भोगवटा पत्र सुद्धा दिले आहे. त्यासाठी आवश्यक त्या सरकारी मोजण्या २००५ आणि २०१० झालेल्या आहेत ,पुणे महापालिकेच्या परवानग्या घेतल्या गेलेल्या आहेत आणि ह्या सर्व इमारती अधिकृत आणि कायदेशीर आहेत. अमित एमराल्ड पार्क चा रस्ता महापालिकेने एफ एस आय स्वरूपात मोबदला देऊन ताब्यात घेतला आहे. काही दिवसांपूर्वी ह्या दोन्ही सोसायटी ने हायकोर्टात महापालिकेच्या विरोधात रस्ता दुरुस्त करून द्यावा असा दावा सुद्धा दाखल केलेला आहे आणि आज भूमीअभिलेख ने रस्ता गायब करून दुसऱ्यालाच देऊन टाकला आहे.

दिनांक ०३-०२-२०२५ रोजी भूमी अभिलेख कार्यालयाचे हद्दीच्या खुणा दाखविणा बद्दल पत्र सेलिब्रेशन आणि अमित इमराल्ड सोसायटीला मिळाले व भूमी अभिलेख चे भूकरमापक व्ही व्ही कोकरे यांनी दोन्ही सोसायटी च्या लोकांना विश्वासात न घेता जागेवर येऊन परस्पर हद्दी दाखवल्या व हा रस्ता दुसऱ्याच्या मिळकती मधे दाखवला व हरकती न नोंदवता कोकरे निघून गेले.

## तृतीयपंथीयांचा स्विकार करण्याची मानसिकता ठेवा

राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आज एकविसाव्या शतकात देखील तृतीयपंथींना वेगळी वागणूक दिली जाते. सर्वसामान्यांना प्रमाणे त्यांना वागणूक न देता वेगळे समजले जाते. त्यामुळे त्यांना अनेक गोष्टींसाठी संघर्ष करावा लागतो. परंतु ते समाजाचा एक भाग आहेत याचा स्विकार करून त्यांना देखील समान वागणूक दिली पाहिजे, असे मत सामाजिक कार्यकर्त्या पन्ना गाबरेल यांनी व्यक्त केले.

श्रीमंत राजे पवार घराणे सामाजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र (महिला विभाग) यांच्या वतीने शुक्रवार पेठेतील यादव व्यापार भवन येथे मैत्रेय पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात देवदासी भगिनींसाठी काम करणाऱ्या कर्तृत्ववान महिला व संस्थांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शीतल पवार या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. एन्ड्युरन्स टेक्नोलॉजी लि. चे कार्यकारी उपाध्यक्ष कल्याण पवार, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सागर पवार यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

सन्मानाला उत्तर देत चांदणी गोरे म्हणाल्या, लोक मला बघून हसतात कारण मी वेगळी दिसते. पण मी लोकांना बघून हसते कारण ते सर्व एकसारखे दिसतात, हे तत्व मी टोक्यात ठेवून काम करते.



पुणे श्रीमंत राजे पवार घराणे सामाजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र (महिला विभाग) यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त मैत्रेय पुरस्काराचे आयोजन करण्यात आले. यावेळी देवदासी भगिनींसाठी काम करणाऱ्या कर्तृत्ववान महिला व संस्थांचा सन्मान करण्यात आला.

# सहकारातून समृद्धीचे धोरण हे स्वयंपूनर्विकासातून साध्य करणार : फडणवीस



राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सहकारी गृहनिर्माण संस्थाना सहकारात स्थान नव्हते, त्यावेळी २०१९ साली त्याकरिता स्वतंत्र चॅप्टर आम्ही केला. त्यामुळे कायद्याने आधार मिळाला. येत्या १० ते १२ दिवसात उर्वरित नियम देखील आम्ही प्रसिद्ध करू, तसेच अपार्टमेंट कायद्यात देखील येत्या महिन्याभरात आवश्यक पूर्तता करू. सहकारातून समृद्धीकडे नेण्याचे पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांचे धोरण हे स्वयंपूनर्विकासातून साध्य करण्याचा विचार आहे. स्वयंपुर्नविकास हा आणखी सोप्या पद्धतीने व्हायला हवा. त्यामध्ये सहकारातून समृद्धीकडे नेण्याचे धोरण आहे, असे मत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

पुणे जिल्हा आणि महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघ, सहकारी पतसंस्था महासंघ, सहकारी बँक महासंघ यांच्यावतीने महाराष्ट्रातील गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स यांना मार्गदर्शन व सहकार्य मिळावे, यासाठी पुण्यात महाअधिवेशन आणि प्रदर्शनाचे आयोजन गणेश कला क्रीडा मंच येथे करण्यात आले होते.

समारोपप्रसंगी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, आमदार प्रवीण दरेकर, ज्येष्ठ सहकार तज्ज्ञ विद्याधर अनास्कर, आमदार हेमंत रासने, धीरज घाटे, दीपक मिसाळ, संघटनेचे अध्यक्ष सुहास पटवर्धन, सीताराम राणे, मुंबई गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश दरेकर, सचिव मनिषा कोष्टी, नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडिया नवी दिल्लीचे कार्यकारी संचालक आशिष त्रिवेदी आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी अनेक ऑनलाईन सेवा व स्मरणिका, विविध पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, क्लस्टर पद्धतीने स्वयंपुर्ण विकास करण्याचा आमचा प्रयत्न आहे. गृहनिर्माण संस्थाना टँकरमुक्त आम्ही करू. मात्र, सोलरयुक्त संस्था हा उपक्रम सर्वत्र राबविणे गरजेचे आहे. त्याकरिता प्रधानमंत्री सूर्य धन योजनेचा संस्थानी लाभ घ्यायला हवा. पुढील ३ महिन्यात संस्थाशी निगडित ऑनलाईन प्रणाली सुरु होत असून पुढील सहा महिन्यात व्हाट्स अँप वर सुविधा उपलब्ध होतील. यामुळे नागरिकांना हेलपाटे मारावे लागणार नाहीत, असे आश्वासनही त्यांनी दिले.



भारत हा कृषीप्रधान देश असल्याने ४० टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या सहकाराशी जोडली गेली आहे. देशात ८ लक्ष तर राज्यात २.२५ लक्ष सहकारी संस्था असून त्यातील १.२५ लक्ष गृहनिर्माण संस्था आहेत. त्यामुळे ही चळवळ मजबूत करण्याचा प्रयत्न आहे. आज ३० वेगवेगळ्या क्षेत्रात अशा पद्धतीचे काम सुरु आहे.

**— मुरलीधर मोहोळ,** केंद्रीय नागरी उड्डाण व सहकार राज्यमंत्री

# 'ले छलांग' देणार विद्यार्थ्यांच्या कल्पनांना वाव

## 'हॅक एमआयटी-डब्ल्यूपीयू' तर्फे तीन दिवसीय इनोव्हेशन




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** विद्यार्थ्यांमध्ये इनोव्हेशन, इन्क्युबेशन आणि इनव्हेंशनची संस्कृती वाढविण्याच्या दृष्टीने एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीतर्फे ले छलांग 'हॅक एमआयटी-डब्ल्यूपीयू' २०२५ ही तीन दिवसीय स्पर्धा २६ ते २८ मार्च २०२५ या दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती एमआयटीचे संस्थापक विश्वस्त व एमआयटी टीबीआयचे संचालक प्रा. प्रकाश जोशी, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस व प्र कुलगुरू व कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. मिलिंद पांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ही स्पर्धा तृतीय, चतुर्थ, यूजी, पीजी व पीएचडीच्या विद्यार्थ्यांमध्ये होणार आहे. यात आयडियाथॉन, वर्क्याथॉन, फॉर्माथॉन, बायो-थॉन, डिझाईन थॉन, हॅक-एआय-थॉन, आणि ऑक्टॅथॉन या गटात होईल.

यामध्ये वैज्ञानिक व अवैज्ञानिक असे शेकडो समस्या स्टेटमेंट्स हे विविध कंपन्यांकडून प्राप्त झाले आहेत. अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, विज्ञान, आरोग्य, बिजनेस ॲण्ड लिडरशीप, आर्टस, ह्यूमॅनिटीस अॅड प्रोफेशनल्स स्टडिज, सार्वजनिक आरोग्य इ. क्षेत्रातील ७००० स्पर्धक सहभागी झाले आहेत. प्रत्येक गटातील प्रथम दोन विजेत्यांना रोख पारितोषिके व मेडेल देण्यात येणार आहेत. तसेच स्टार्टअप फंडिंग सुद्धा देण्यात येणार आहे.

ले छलांग 'हॅकएमआयटी-डब्ल्यूपीयू' २०२५ मध्ये एमआयटी डब्ल्यूपीयूच्या विद्यार्थी १०० पेक्षा अधिक स्टार्टअप ची प्रदर्शनी आयोजित करणार आहेत. ही सर्वांसाठी निःशुल्क असेल. या स्पर्धेचे उद्‌घाटन बुधवार, २६ मार्च रोजी सकाळी १० वा. होईल. एमआयटी शिक्षण संस्था समुहाचे संस्थापक प्रा. प्रकाश जोशी हे उद्‌घाटक म्हणून उपस्थित राहतील. तसेच, अध्यक्षस्थानी एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड असतील.

**स्पर्धेचे वैशिष्ठ्य :**

- महिला सशक्तीकरण करण्यासाठी व्यावसायिक उत्कृष्ट व्यासपीठ निर्माण करण्याची संधी
- विद्यार्थ्यांनी स्वतःची कल्पना साकार करणे
- मूर्तरूप देणे आणि ऑक्टॅथॉन म्हणजे ८ तासात स्पर्धकाने एखाद्या समस्येचे समाधान शोधून काढून त्याचे प्रारूप तयार करणे
- या सर्व गटांसाठी एकूण ८५४ समस्या विद्यापीठाला प्राप्त
- ४६८ मेंटॉरची नियुक्ती
- स्पर्धेसाठी व्यावसायीक जगातील प्रसिद्ध व्यक्ती, आर्थीक दृष्ट्या सक्षम झालेल्या स्टार्टअप जगतातील प्रमुख व्यक्ती व विद्यापीठाचे माजी विद्यार्थी हे ज्यूरी म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करणार




"पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १६ जानेवारी हा दिवस स्टार्ट अप डे म्हणून घोषित केला आहे. त्यावर एमआयटी डब्ल्यूपीयू ने पुढचे पाऊल उचलून स्पर्धा आयोजित केली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये उद्योजकतेला खतपाणी घालण्यासाठी नवनिर्मिती आणि नवीन संकल्पना आत्मसात करण्याची वेळ आली आहे. या स्पर्धेतून नवे उद्योजक निर्माण होऊन देश प्रगतीपथावर जाईल.

**-डॉ. आर.एम.चिटणीस**

"माइंड टू मार्केट' आणि ' पेपर टू प्रोडक्ट' ही संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी ही स्पर्धा महत्वाची आहे. देशात नोकरी मागणारे नाही तर नोकरी देणाऱ्यांची संख्या वाढवायची आहे. आत्मनिर्भर भारत आणि स्टार्ट अप इंडिया संस्कृती वाढविण्यासाठी या स्पर्धेतून मदत होणार आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पनांना वाव देऊन त्यांना उद्योजक बनविण्याचे धोरण प्रत्यक्षात आणण्याचा हा एक स्तुत्य प्रयत्न आहे.

**-डॉ. मिलिंद पांडे**

# राज्यात ४० हजारांहून अधिक क्षयरुग्ण

## सर्वेक्षणातून धक्कादायक माहिती उघड, आरोग्य विभागाची मोहिम

क्षयरोग हा मायकोबॅक्टेरियम ट्युबरक्युलोसिस या जीवाणूमुळे होणारा संसर्गजन्य आजार असून, याचा प्रसार श्वसनाद्वारे होतो. गेल्या काही वर्षांच्या कालावधीत त्याचा वेगाने फैलाव होत आहे, त्यामुळे केंद्रअणि राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने हा फैलाव रोखण्यासाठी वेळीच मोहिम हाती घेतली आहे. त्यासाठी राज्यभरात तपासणी मोहिम राबविण्यात आली, त्यामध्ये या रुग्णांची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. या रोगाचा निपटारा करण्यासाठी आरोग्य विभागाने आता पुढाकार घेतला असून त्यासाठी कार्यकाळही निश्चित करण्यात आला आहे. मात्र; नागरिकांनी घाबरून जाऊ नये असे आवाहन केंद्र आणि राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने केले आहे.



| वर्ष | संशयित रुग्ण | निदान झालेले रुग्ण |
|---|---|---|
| २०२२ | १९ लाख ९८ हजार ३५६ | २ लाख ३३ हजार ८७२ |
| २०२३ | २६ लाख २२ हजार ६४६ | २ लाख २३ हजार ४४४ |
| २०२४ | ३५ लाख ३९ हजार ९४१ | २ लाख ३० हजार ५१५ |
| २०२५ (फेब्रुवारीअखेपर्यंत) | ७ लाख ५४ हजार ६११ | ३९ हजार ७०५ |

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** क्षयरोग हा मायकोबॅक्टेरियम ट्युबरक्युलोसिस या जीवाणूमुळे होणारा संसर्गजन्य आजार असून, याचा प्रसार श्वसनाद्वारे होतो. राज्यात गेल्या वर्षी ३५ लाख ३९ हजार ९४१ संशयित रुग्णांची तपासणी केली. त्यात २ लाख ३० हजार ३१५ जणांचे क्षयरोगाचे निदान झाले. केंद्रीय क्षयरोग विभागाने चालू वर्षासाठी राज्याला २ लाख ३० हजार क्षयरुग्ण शोधण्याचे उद्दिष्ट दिले आहे. राज्यात यंदा जानेवारी व फेब्रुवारीमध्ये ७ लाख ५४ हजार ६११ जणांची तपासणी केली. त्यात ३९ हजार ७०५ जणांचे क्षयरोगाचे निदान झाले.

क्षयरोगाबाबत जनजागृतीसाठी करण्यासाठी जागतिक क्षयरोग दिन २४ मार्चला साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने १०० दिवस क्षयरुग्ण शोध मोहीम राबविली. या मोहिमेत ७ डिसेंबर २०२४ ते २४ मार्च २०२५ पर्यंत राज्यात क्षयरोगाचे रुग्ण जास्त आढळून येत असलेले १७ जिल्हे आणि १३ महापालिकांमध्ये तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान ४० हजार ४७१ क्षयरुग्णांचा शोध घेण्यात आला. संशयित क्षयरुग्णांचे निदान करून त्यांच्यावर तातडीने उपचार करून क्षयरोगाची साखळी खंडित करण्याचा प्रयत्न आरोग्य विभागाकडून सुरू आहे. यासाठी ८० डिजिटल हँड हेल्ड एक्स-रे यंत्रे जिल्ह्यांना वितरित करण्यात आली आहेत, असे डॉ. सांगळे यांनी स्पष्ट केले.

जागतिक स्तरावरील शाश्वत विकास ध्येयानुसार २०३० अखेरपर्यंत क्षयरोग दूर करणे अपेक्षित आहे. परंतु, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हे उद्दिष्ट अलीकडे आणून २०२५ अखेरपर्यंत क्षयमुक्त भारताचे लक्ष्य ठेवले. हे लक्ष्य गाठणे अवघड असल्याचे ताज्या आकडेवारीतून समोर आले आहे. देशात क्षयरुग्णांची शोध मोहीम वेगाने सुरू असली, तरी रुग्ण आढळण्याचे प्रमाणही अधिक आहे. त्यामुळे क्षयरुग्णांवर उपचार करून प्रसाराची साखळी खंडित करणे आणि क्षयमुक्त भारताचे उद्दिष्ट गाठणे, या वर्षाच्या अखेरपर्यंत शक्य नसल्याचे चित्र आहे.

"जगातील एकूण क्षयरुग्णांपैकी २५ टक्के भारतात आढळतात, तर देशातील १० टक्के क्षयरुग्ण महाराष्ट्रात आढळून येतात. त्यामुळे १०० दिवसांत राज्यातील क्षयरुग्णांचा शोध घेऊन त्यांच्यावर उपचार करण्याची मोहीम आरोग्य विभागाने हाती घेतली होती. त्यात ४० हजारांहून अधिक क्षयरुग्णांचा शोध घेण्यात यश आले आहे.

**-डॉ. संदीप सांगळे,** सहसंचालक, क्षयरोग विभाग, राज्य शासन


# साडेसहा लाख असाक्षर साक्षरतेकडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिक्षण संचालनालयाच्या (योजना) वतीने उल्लास ॲपवर नोंदणी झालेल्या असाक्षरांची चाचणी रविवारी घेण्यात आली. यु-डायस क्रमांकानुसार असाक्षरांची नोंदणी केलेली प्रत्येक शाळा ही परीक्षा केंद्र होती. राज्यातील एकूण ५३ हजार २७१ केंद्रावर ही परीक्षा झाली. राज्यातून परीक्षेसाठी आठ लाख चार हजार असाक्षरांनी परीक्षा देणे अपेक्षित होते. त्यापैकी सहा लाख ५० हजार असाक्षरांनी परीक्षा दिली.

केंद्रपुरस्कृत उल्लास-नव साक्षरता कार्यक्रम (२०२२-२७) या अंतर्गत राज्यातील तब्बल सहा लाख ५० हजार निरक्षरांनी 'पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी' रविवारी झाली. यात ७० वर्षांच्या पुढील आजी-आजोबांनीही नवसाक्षर होण्याचा निश्चय करत परीक्षा दिली.

ही परीक्षा सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत घेण्यात आली. एकूण १५० गुणांची ही वाचन,



लेखन आणि संख्याज्ञान यावर आधारित होती. मराठी, उर्दु, हिंदी, गुजराती, इंग्रजी, कन्नड, तेलगु, तमिळ, बंगाली अशा एकूण नऊ माध्यमात ही चाचणी झाली. चाचणी निकषानुसार उत्तीर्ण झाल्यानंतर नवसाक्षरांना केंद्र सरकारकडून प्रमाणपत्र, गुणपत्रक देण्यात येणार आहे. अनेक परीक्षा केंद्रावर असाक्षरांचे औक्षण करून, पुस्तक, गुलाबपुष्प भेट म्हणून देत, आकर्षक फलक लेखन करत स्वागत करण्यात आले. परीक्षा केंद्रावर जाऊन परीक्षा देणे शक्य नसलेल्यांना स्वत:च्या घरी चाचणी देण्याची व्यवस्था करण्यात आली.

'केंद्रपुरस्कृत उल्लास-नव भारत साक्षरता कार्यक्रमातंर्गत ही पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी घेण्यात आली. या चाचणीतून व्यक्तीच्या जीवनामध्ये आर्थिक साक्षरता, कायदेविषयक साक्षरता, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन, आरोग्याची काळजी व जागरुकता, बालसंगोपन आणि शिक्षण, कुटुंब कल्याण अशी जीवन मूल्य विकसित होण्यास मदत होईल."

— **महेश पालकर**शिक्षण संचालक (योजना)

# प्रभात मित्र मंडळाच्या वतीने वेशभूषा व नृत्य स्पर्धेला प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** प्रभात मित्र मंडळाच्या वतीने ऐतिहासिक वेशभूषा वक्तृत्व स्पर्धा आणि पारंपरिक नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध वयोगटांतील स्पर्धकांनी उत्कृष्ट सादरीकरण करत आपली कला सादर केली. स्पर्धेत अनुज पाटणे, सक्षम वरदेकर, श्रावण पानकर, स्वामिनी बडदे, मधुरा राजीवडे, आरोही राजपूत यांच्यासह अनेक स्पर्धकांनी बाजी मारली.

स्पर्धेचे आयोजन गुरुवार पेठेत करण्यात आले होते. मंडळाचे अध्यक्ष किशोर चव्हाण, सचिव उदय वाडेकर, खजिनदार सचिन भोसले, उत्सव प्रमुख नितीन घोगरे, अमोल व्यवहारे हेमराज साळुंखे अमोल थोरात यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

ऐतिहासिक वेशभूषा व वक्तृत्व स्पर्धेत छोट्या गटात अनुज पाटणे, सक्षम वरदेकर, अनघा काची, मध्यम गटात श्रावण पानकर, शौर्य टेकवडे, मनस्वी दोडला, मोठ्या गटात स्वामिनी बडदे, श्रीपाद नुल्ला, मनस्वी कदम हे प्रथम तीन क्रमांकाचे विजेते ठरले. पारंपरिक नृत्य स्पर्धेत छोट्या गटात स्वरा रायरीकर, आरोही तांबे, शार्विका जाधव, मोठ्या गटात मधुरा राजीवडे, आरोही राजपूत, स्वरा परदेशी, समूह नृत्यात अंश पाटणे, मनस्वी दोडला, ओवी यंदे , अक्षदा महाडीक, रुद्रा डोके, अनुज पाटणे, वेदश्री दोडला यांनी प्रथम तीन क्रमांक पटकाविले.




**पुणे** प्रभात मित्र मंडळाच्या वतीने ऐतिहासिक वेशभूषा वक्तृत्व स्पर्धा आणि पारंपरिक नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध वयोगटांतील स्पर्धकांनी उत्कृष्ट सादरीकरण करत आपली कला सादर केली.

# मंगळवार पेठेतील जागा आंबेडकर स्मारकासाठीच : फडणवीस




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मंगळवार पेठ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भावनालगतची सुमारे अडीच एकर जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठीच राहील. यासंदर्भात लवकरच निर्णय करून ही जागा स्मारक उभे करण्यासाठी उपलब्ध करून दिली जाईल, असा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला.

मुख्यमंत्री फडणवीस काल पुणे दौऱ्यावर आले असता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन विस्तारीकरण समितीच्या शिष्टमंडळाचे त्यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. मुख्यमंत्र्यांनी स्मारक उभारण्याबाबत सकारात्मकता दर्शवली असून, स्मारकाचा मार्ग प्रशस्त झाल्याची भावना शिष्टमंडळातील सर्वच प्रतिनिधींनी व्यक्त केली.

केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्र्यांना भेटलेल्या या शिष्टमंडळात माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे ॲड. अविनाश साळवे, परशुराम वाडेकर, ॲड. जयदेव गायकवाड, राहुल डंबाळे, शैलेंद्र चव्हाण, रोहिदास गायकवाड, ॲड. अरविंद तायडे, युवराज बनसोडे, शैलेंद्र मोरे व अतुल साळवे यांचा समावेश होता.

मंगळवार पेठेतील सार्वजनिक बांधकाम विभागाची जागा खाजगी विकसकाला देण्याचा घाट घातला आहे. मात्र, या जागेवर शासनाने यापूर्वी जाहीर केल्याप्रमाणे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे यथोचित स्मारक व्हावे, यासाठी पुणे शहरातील आंबेडकरी चळवळीतील विविध पक्ष, संघटना व कार्यकर्त्यांकडून आंदोलन केले जात आहे.



"विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चांगले स्मारक उभारण्यासाठी लागेल तितका निधी उपलब्ध करण्यास सहकार्य करण्यात येणार आहे डॉ. आंबेडकरांचे स्मारक व्हावे, ही भावना पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रातील आंबेडकरी जनतेची आहे. यासाठी आम्ही सर्वजण कटिबद्ध आहोत.

— **मुरलीधर मोहोळ**, केंद्रिय नागरी उड्डाण राज्यमंत्री

# भाजपमुळेच 'जायका'स उशीर : मोहन जोशी

**पुणे :** "मुळा-मुठा नद्यांमधील प्रदूषण कमी करण्यासाठी सुरू केलेल्या जायका प्रकल्पास नऊ वर्षे




झाली, तरीही प्रकल्पाचे निम्मेदेखील काम पूर्ण नाही. प्रकल्पासाठी पुन्हा मुदतवाढ घेण्यात आली. या प्रकल्पास दिवसेंदिवस होणारा विलंब भाजपचा नाकर्तेपणा नाही का," अशी टीका प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष मोहन जोशी यांनी केली.

महापालिकेमार्फत काम सुरू असलेल्या जायका प्रकल्पासाठी पुन्हा एकदा मुदतवाढ घेण्यात आली. त्याबाबत जोशी म्हणाले की, जायका प्रकल्पाच्या कामाची प्रगती ५० टक्क्यांपेक्षा जास्त नाही. स्मार्ट सिटी, नदीसुधार योजना, 'रिंगरोड', मेट्रोचे जाळे अशा मोठमोठ्या घोषणा भाजपने निवडणुकीवेळी केल्या. त्यापैकी जायका प्रकल्पाची घोषणाही होती. तत्कालीन केंद्रीय पर्यावरणमंत्री प्रकाश जावडेकर यांनी हा प्रकल्प मंजूर केला होता. त्यावेळी जावडेकर यांचा नागरी सत्कारही करण्यात आला. त्यावरून भाजपने मोठा गाजावाजा करत प्रसिद्धी मिळविली. आता हा प्रकल्प संथगतीने सुरू असूनही भाजपचे मंत्री, आमदार, खासदार मौन बाळगून आहेत. त्यातून भाजपचा नाकर्तेपणा दिसून येत आहे.




# मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ एस एन पठाण

**पुणे :** दहावे अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलन दि. २६ व २७ एप्रिल २०२५ ला नागपूर येथे आयोजित करण्यात आले असून या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून शिक्षण तज्ञ , ज्येष्ठ साहित्यक व माजी कुलगुरु शहाबुद्दीन नुर महंमद पठाण उर्फ एस . एन . पठाण यांची निवड करण्यात आल्याची घोषणा परिषदेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ अजीज नदाफ व सचिव अय्यूब नल्लामंदू यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत केली . पुणे श्रमिक पत्रकार संघ येथे २४ एप्रिल रोजी झालेल्या या पत्रकार परिषदेत उपाध्यक्ष इ जा तांबोळी , सचिव अयूब नल्लामंदू , सहसचिव मुबारक शेख, खजीनदार हसीब नदाफ,इंतेखाब फराश यांची प्रमुख उपस्थिती होती . संमेलनाचे उदघाटन विमलताई देशमुख स्मृती सभागृह धनवटे नैशनल कॉलेज अजनी रेल्वे स्टेशन समोर नागपूर येथे ज्येष्ठ साहित्यिक डॉ . रावसाहेब कसबे यांच्या हस्ते होणार असून संमेलन स्वागत अध्यक्ष म्हणून प्रा डॉ शरयु तायवाडे यांची निवड करण्यात आली आहे.



# प्रेरणा म्युझिक तर्फे गुरुवारी गायन-वादन मैफल

**पुणे :** प्रेरणा म्युझिक ऑर्गनायझेशनतर्फे मराठी नववर्षानिमित्त गायन-वादन मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. मैफल गुरुवार, दि. २७ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता एस. एम. जोशी सभागृहात होणार आहे. यात आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या वादक विदुशी कला रामनाथ यांचे एकल व्हायोलिन वादन होणार आहे. त्याचप्रमाणे ग्वाल्हेर घराण्याचे सुप्रसिद्ध गायक पंडित अमरेंद्र धनेश्वर (मुंबई) आणि जयपूर घराण्याच्या प्रसिद्ध गायिका विदुषी सानिया पाटणकर यांचे गायन होणार आहे. जगविख्यात पंडित नयन घोष यांचे चिरंजीव व शिष्य ईशान घोष, प्रशांत पांडव (तबला), अमेय बिचू, प्रज्ञा देसाई (संवादिनी) साथसंगत करणार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन स्वाती प्रभूमीराशी यांचे आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.



# रायसोनी कॉलेजतर्फे एनएसएस सामाजिक सेवा

**पुणे :** जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, वाघोली यांच्यातर्फे आव्हाळवाडी येथे नुकतेच ७ दिवसांचे राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये सेवा भावना, नेतृत्व आणि समुदायाशी संवाद निर्माण करणे हा होता. शिबिरादरम्यान, विद्यार्थी स्वयंसेवकांनी ग्राम स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी, महिला सबलीकरण, महिला स्वसंरक्षण यांसारख्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला.

शिबिराचे उद्‌घाटन आव्हाळवाडी ग्रामपंचायतचे सरपंच नितीन घोलप, जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, वाघोलीचे संचालक डॉ. एच. आर. कुलकर्णी, उपसंचालक डॉ. प्रवीण जांगडे यांच्या हस्ते झाले. रायसोनी एज्युकेशनचे अध्यक्ष सुनील रायसोनी आणि रायसोनी एज्युकेशनचे कार्यकारी संचालक श्रेयस रायसोनी यांनी विद्यार्थ्यांचे आणि राष्ट्रीय सेवा योजना टीम अभिनंदन केले.

## कलेचा सन्मान



चिंचवड लोकोत्सव : महाराष्ट्र सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, भारत सरकार उदयपूर यांच्या संयुक्त विद्यमाने लोकोत्सवचा समारोप झाला. याप्रसंगी उमेश देसाई, नवगंध दास आणि कलाकारांचा आ. उमा खापरे यांच्या हस्ते कलाकारांचा सत्कार करण्यात आला.

## पिंपरी चिंचवडकरांनी अनुभवाला लोकसंस्कृतीचा कलाविष्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** लोकोत्सवामुळे पिंपरी चिंचवडकरांना महाराष्ट्र व ओरिसा मधील आदिवासी लोक संस्कृतीचा कलाविष्कार पाहण्याची संधी मिळाली. हा ठेवा अनुभवणे म्हणजे सामाजिक परंपरा, संस्कृतीचे जतन करणे देशाच्या ऐक्यासाठी नितांत गरजेचे आहे हे स्पष्ट झाले. यासाठी पिंपरी चिंचवड सोशल फाउंडेशने समन्वयाची भूमिका महत्त्वाची होती, असे मत विधानपरिषदेच्या आमदार उमा खापरे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, भारत सरकार उदयपूर यांच्या संयुक्त विद्यमाने, एक भारत श्रेष्ठ भारत अंतर्गत – लोकोत्सव हा महाराष्ट्र व ओरिसा राज्यातील संस्कृतीचे दर्शन घडविणारा तीन दिवसीय उत्सवाचा शनिवारी प्रा. रामकृष्ण मोरे सभागृह, चिंचवड येथे समारोप झाला.

यावेळी प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी महापौर केशव घोळवे, माजी नगरसेवक राजू दुर्गे, महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचालनालयाच्या पुणे विभागीय अधिक्षक जान्हवी जानकर आदी उपस्थित होते.



## निवृत्त सरकारी कर्मचाऱ्याची अडीच कोटींची फसवणूक

**चिंचवड :** इन्शुरन्स कंपनी मधून बोलत असल्याचं सांगून मोठी रक्कम मिळवून देण्याच्या बहाण्याने निवृत्त सरकारी कर्मचाऱ्याला २ कोटी ३० लाख रुपयांची फसवणूक केल्याचं उघडकीस आलं आहे. याप्रकरणी पिंपरी- चिंचवडच्या सायबर पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. लक्ष्मणकुमार पुनारामजी प्रजापतीला पुणे शहरातून तर भूपेंदर जीवनसिंग जिना आणि लक्ष्मण सिंग या दोघांना दिल्लीमधून अटक करण्यात आली. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण स्वामी यांच्या टीम केला.



## पाण्याच्या टाकीस दुर्गादेवी टेकडी बचाव समितीचा विरोध

**पिंपरी :** दुर्गा देवी टेकडी येथे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने १६ दक्ष लक्ष लीटर पाण्याची टाकी टेकडीवर करण्याचे नियोजन आहे व (आय एम डी) the India meteorological department यांचा हवामान खात्याचा एक वीस मीटर उंचीचा टॉवर दुर्गा टेकडी येथे लावण्यात येणार आहे. पोलीस प्रशासनाचा ट्राफिक कंट्रोलचा टॉवरसुध्दा लावण्यात आलेला आहे. अशी सर्व कामे करताना दुर्गा टेकडीवरील बरीचशी जुनी ४० ते ५० वर्षापासून असलेली झाडे महापालिका तोडणार आहे तेथील पक्षी प्राणी यांची खूप मोठ्या प्रमाणावर हानी होणार आहे. म्हणून यावरील प्रकल्पांना निसर्ग प्रेमींकडून आणि दुर्गादेवी टेकडी बचाव समितीकडून कडाडून विरोध करण्यात आलेला आहे त्यांच्या विरोधात साह्यांची मोहीम चालवली गेली आहे जवळजवळ तीन ते साडेतीन हजार लोकांनी सह्या करून वरील प्रोजेक्ट ला निषेध केला आहे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तांना दुर्गा देवी टेकडी येथील निसर्ग प्रेमींनी भेट देऊन निवेदन दिले आहे की वरील कुठलाही प्रोजेक्ट दुर्गादेवी टेकडी येथे करू नये अन्यथा जोरदार आंदोलन करण्यात येईल असे निवेदन आयुक्त शेखर सिंह यांना देण्यात आले.

## पुणे जिल्हा युवा पुरस्कार शुभम सातकर यांना जाहीर

**तळेगाव दाभाडे :** कान्हे येथील युवा उद्योजक शुभम सातकर यांना त्यांच्या सामाजिक कामांबद्दल महाराष्ट्र शासन जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे यांच्या वतीने दिला जाणारा जिल्हा युवा पुरस्कार जाहीर झाला आहे. सातकर हे २०२० मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील ग्रामपरिवर्तन अभियानात मुख्यमंत्री प्रतिनिधी (फेलोशिप) म्हणून काम करत असताना शेतकऱ्यांना संघटित करून फार्मर्स प्रोड्युसर कंपनी सुरू करण्यात योगदान दिले होते. तसेच, अनेक सामाजिक संघटनांच्या माध्यमातून त्यांचे सामाजिक कार्य सुरू आहे. शुभम यांच्या निवडीने मावळ तालुक्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, तरुणांनी त्यांचे अभिनंदन केले.

## भजन स्पर्धेत २५ महिला मंडळांचा सहभाग

**आकुर्डी :** पालवी महिला मंडळ ज्येष्ठ नागरिक संघ व पालवी भजनी मंडळ यांच्या विद्यमाने भजनी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. आकुर्डी येथील खंडोबा मंदिराजवळील सभागृहात झालेल्या या स्पर्धेमध्ये २५ भजनी मंडळांनी सहभाग घेतला होता. यात 'गीत मंजिरी' भजनी मंडळाने प्रथम, 'जोगेश्वरी' भजनी मंडळाने द्वितीय, 'स्वरांजली' भजनी मंडळाने तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. तर 'दत्तप्रसाद' भजनी मंडळाला उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले. विठ्ठल काळभोर, वैशाली काळभोर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी कुलकर्णी, मंडळाच्या अध्यक्षा शोभा जोशी यांनी आभार मानले.

## चिंचवड स्टेशन येथे ६ एप्रिलला बौद्ध साहित्य संमेलन

**पुणे :** भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त बौद्ध साहित्य परिषद आणि काव्यमित्र संस्थेच्यावतीने चिंचवड स्टेशन येथे ६ एप्रिलला आठवे बौद्ध साहित्य संमेलन भरविण्यात येणार आहे. यानिमित्त उल्लेखनीय कार्याबद्दल विविध क्षेत्रांतील व्यक्तींना पुरस्कारांनी गौरविले जाणार आहे. तारांगण ऑडिटोरिअममध्ये सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत हे संमेलन होणार आहे. पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. तर अॅड. सुनील सौंदरमल हे स्वागताध्यक्ष आहेत. या संमेलनात 'भारतीय संविधान काल, आज आणि उद्या' या विषयावर परिसंवाद होणार आहे. राज्याचे माजी समाज कल्याण आयुक्त आर. के. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या परिसंवादात व्याख्याते डॉ. सिद्धोधन कांबळे, राज्याचे माजी सहकार आयुक्त अॅड. एस. बी. पाटील सहभाग घेणार आहेत. तर गुंडू कांबळे सूत्रसंचालन करणार आहेत.

# मानवी साखळीद्वारे संवर्धनाचे आंदोलन

### नद्यांचे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्वबाबत जागरूकता

**अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा**

- हे आंदोलन प्रदूषणमुक्त नद्यांसाठीच्या मोठ्या मोहिमेचा एक भाग आहे. RFD सारख्या प्रकल्पांमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होण्याची, जैवविविधतेला धोका पोहोचण्याची आणि सार्वजनिक आरोग्यावर दुष्परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली. नदीकाठी बांधकाम करण्याऐवजी कचरा व्यवस्थापन आणि प्रदूषण नियंत्रण यावर लक्ष केंद्रित करण्याची मागणी आंदोलकांनी केली. त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास लवकरच अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.



- "वृक्षतोड थांबलीच पाहिजे!", "आधी नद्या स्वच्छ करा!" आणि "नद्या वाचवू, निसर्ग टिकवू!" अशा घोषणा देत त्यांनी नदीसंवर्धनाचा संदेश दिला.
- स्थानिक स्वयंसेवी संस्था आणि जागरूक नागरिकांनी या आंदोलनात एकत्र येत, नद्यांचे नैसर्गिक स्वरूप अबाधित ठेवण्याची मागणी केली.
- पवना, मुळा आणि इंद्रायणी या नद्यांचे संवर्धन ३० लाखांहून अधिक नागरिकांसाठी महत्त्वाचे असल्याचे आंदोलनकर्त्यांनी अधोरेखित केले.
- बांधकाम आणि कृत्रिम सौंदर्यीकरणाच्या नावाखाली वृक्षतोड, प्राण्या-पक्ष्यांचे अधिवास नष्ट करणे आणि पर्यावरणाला धोका निर्माण करणे हे मान्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपळे सौदागर :** पिंपरी-चिंचवडमधील नद्या प्रदूषण आणि दुर्लक्षिततेच्या विळख्यात अडकल्या आहेत. अनेक वर्षांपासून पर्यावरणतज्ज्ञ आणि स्थानिक नागरिक यासंदर्भात आवाज उठवत आहेत, पण ठोस पावले उचलली जात नाहीत. या नद्यांचे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व आहे, मात्र त्याकडे अजूनही दुर्लक्ष केले जात आहे.

या पार्श्वभूमीवर पर्यावरण संरक्षणासाठी एकत्र येत, १०० हून अधिक नागरिकांनी पिंपळे सौदागर येथील कोकणे चौकातील लिनियर गार्डनजवळ मानवी साखळी तयार केली. महापालिकेच्या नदी विकास प्रकल्पाला विरोध करत, या आंदोलनाचा उद्देश नदी प्रदूषण आणि संवर्धनाविषयी जागरूकता निर्माण करणे हा होता.

सकाळच्या फिरायला येणाऱ्या नागरिकांना पर्यावरणप्रेमींनी RFD प्रकल्पामुळे उद्भवणाऱ्या धोक्यांविषयी माहिती दिली. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अनेकांनी या आंदोलनात सहभाग घेतला.

## व्हिजन@५० मध्ये विविध विषयांवर विचारमंथन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** व्हिजन@५० शहरी धोरण उपक्रमाअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेत 'शहरी गतिशीलता', 'पर्यावरण आणि राहणीमान', 'शिक्षण आणि नागरी कल्याण', 'तंत्रज्ञान आणि प्रशासन', 'शहरी पायाभूत सुविधा', 'आर्थिक विकास' या प्रमुख विषयांवर सविस्तर चर्चा झाली. तसेच भविष्यात नागरी समस्या उद्भवल्या तर त्यासाठी कोणत्या उपाययोजना उपयुक्त ठरतील, यावरही विचारमंथन झाले.

अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी याप्रसंगी व्हिजन@५० बाबत बोलताना सांगितले की,'पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस ११ ऑक्टोबर २०३२ रोजी महापालिका स्थापनेपासून ५० वर्ष पूर्ण होत आहेत. त्या अनुषंगाने करावयाच्या आदर्श उपाययोजनेबाबतीत आयुक्त शेखर सिंह यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू झाला आहे. या अंतर्गत विविध क्षेत्रातील व्यक्तींशी चर्चा करण्यात येत असून आदर्श शहराबाबतीत त्यांचे मत जाणून घेण्याच्यादृष्टीने ही कार्यशाळा यशस्वी ठरत आहे.

> पिंपरी चिंचवड शहराचा विकास करण्यास महानगरपालिकेने नेहमीच प्राधान्य दिले आहे. आता व्हिजन@५० उपक्रमांतर्गत वेगवेगळ्या क्षेत्रातील नागरिकांचे मत विचारात घेत आहोत. महानगरपालिकेला ५० वर्ष पूर्ण करीत असताना आपल्या शहराची स्थिती काय असावी, यावर लक्ष केंद्रित करण्यास असे उपक्रम यशस्वी ठरत आहेत.
>
> — **विठ्ठल जोशी,** उप आयुक्त

# कर्करोगाच्या जनजागृतीसाठी आकुर्डीत धावले हजारोजण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** डी वाय पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय आकुर्डी, रोट्रॅक्ट क्लब ऑफ डीवायपीसीओई, सतेज स्पोर्ट क्लब, रोटरी क्लब ऑफ प्राधिकरण पुणे, डीवायपीसीओई माजी विद्यार्थी असोशियशन यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन आकुर्डी येथे संपन्न झाली. समाजात स्तन कर्करोग जागृती होण्यासाठी धावले हजारो जण.

एव्हरेस्ट वीर श्रीहरी तापकीर, रोटरी डिस्ट्रिक्ट 3131 चे युथ डायरेक्टर बलवीर चावला, डी वाय पाटील प्रतिष्ठानचे विश्वस्त तेजस पाटील, बांधकाम व्यवसायिक खुशी अभिचंदानी, डी वाय पाटील शैक्षणिक संकुलाचे संचालक रियर एडमिरल अमित विक्रम, प्राचार्या डॉ. पी. मालती, प्रशासकीय अधिष्ठाता डॉ. संदीप सरनोबत मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये उद्घाटन सोहळा पार पडला.



सदर मॅरेथॉनमध्ये भारतीय धावपटूंसोबतच, इथोपिया देशाच्या आंतरराष्ट्रीय धावपटू देसी निगेसे कितीला, शिफाईना गोबेना अरसे आणि अमन रासा मुहम्मद यांनी सहभाग नोंदवला.

एकूण १००० पेक्षा जास्त स्पर्धकांनी याच्यामध्ये भाग घेतला होता. ४५ हजार रुपये पेक्षा जास्त किमतीची बक्षिसे यामध्ये विजेत्यांना दिली गेली.

डी वाय पाटील आकुर्डी संकुलाचे चेअरमन सतेज पाटील, डॉ. डी वाय पाटील प्रतिष्ठानचे विश्वस्त तेजस पाटील, डॉ. डी वाय पाटील शैक्षणिक संकुलनाचे संचालक रियर एडमिरल अमित विक्रम आदींचे मार्गदर्शन लाभले.

**मॅरेथॉन ३ किमी, ५ किमी आणि १० किमी टप्प्यांमध्ये झाली**

- १० किमी (पुरुष) - प्रथम मोहम्मद दानेश द्वितीय पियुष सोळंकी तृतीय अक्षत
- १० किमी (महिला) - प्रथम मिताली भोयर द्वितीय विशाखा शिंदे तृतीय निशा पासवान
- ५ किमी (पुरुष) - प्रथम अजय शिंदे द्वितीय सुहास जाधव तृतीय विवेक उत्तेकर
- ५ किमी (महिला) - प्रथम सोमती कोडग द्वितीय सविता ठोंबरे तृतीय रिंकू यादव
- ३ किमी (पुरुष) - प्रथम सार्थक शिंदे द्वितीय वैभव वैभव गोगर्डे तृतीय साहिल यादव
- ३ किमी (महिला) - प्रथम शांभवी वेदपाठक द्वितीय नीलम शिंदे तृतीय भूमिका शिक्रे

# 'आमदार आपल्या दारी' उपक्रमाद्वारे समस्यांचे निराकरण




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड :** "नागरिकांच्या समस्या सोडवणे ही आमची जबाबदारी असून, 'आमदार आपल्या दारी' या उपक्रमाद्वारे नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. प्रशासन आणि लोकप्रतिनिधींमध्ये समन्वय साधून समस्यांचे निराकरण करण्यावर आमचा भर राहील." असे प्रतिपादन आमदार शंकर जगताप यांनी केले.

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक १६, १७ आणि १८ मधील नागरिकांसाठी "आमदार आपल्या दारी - संवाद | सेवा | समर्पण" या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम चिंचवडे लॉन्स, बिर्ला हॉस्पिटल जवळ, चिंचवडगाव येथे संपन्न झाला. या वेळी आमदार शंकर जगताप यांनी नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि तातडीने सोडवण्यासाठी उपाययोजना करण्याची ग्वाही दिली. या उपक्रमास जवळपास दोन ते अडीच हजार नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

K-विला सोसायटीच्या नागरिकांनी कचरा डेपो संदर्भात तक्रार नोंदवली, ज्यामुळे जवळपास 1000-2000 कुटुंबांवर परिणाम होत होता. या तक्रारीची तातडीने दखल घेत महापालिका अधिकाऱ्यांना हा डेपो स्थलांतरित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच, रेशन कार्ड संदर्भात ज्येष्ठ नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक ती मदत करण्यास सांगण्यात आले.

शासकीय योजनांची माहिती आणि मदत

कार्यक्रमादरम्यान नागरिकांना उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, आधार कार्ड, वयाचा दाखला, रेशन कार्ड अर्ज आणि दुरुस्ती यांसाठी मदत करण्यात आली. तसेच, सरकारी योजनांची माहिती देऊन त्याचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

**नागरिकांच्या समस्या आणि तातडीचे निराकरण**

- अतिक्रमण, रस्ते, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन, वीजपुरवठा समस्या, पाणीपुरवठा आणि नागरी सुविधांशी संबंधित अडचणींचा समावेश होता. नागरिकांच्या तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्यासाठी महानगरपालिका, महावितरण, पाणीपुरवठा विभाग आणि इतर शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

संपादकीय विशेष

# ‘हायड्रोजन मिशन’

केंद्र सरकारने ‘राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन’अंतर्गत परिवहन क्षेत्रासाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार देशातील प्रमुख महामार्गांवर हायड्रोजनवर चालणाऱ्या बस आणि ट्रक्सची चाचणी सुरू केली जाईल. यामध्ये पुणे-मुंबई महामार्गाचा समावेश आहे. हायड्रोजनच्या वापरामुळे देशातील पर्यावरणीय धोक्यांची पातळी कमी होईल आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रात एक महत्वाचा टप्पा गाठला जाईल. नवीनीकरणीय आणि अपारंपरिक ऊर्जा मंत्रालयाने या मिशनला चालना देण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली होती. वाहनांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर हायड्रोजनचा वापर सुरू करण्यात येणार असून यासाठी पाच पथदर्शी प्रकल्पांची मंजुरी दिली आहे. या प्रकल्पांतर्गत ३७ वाहने (बस आणि ट्रक) आणि ९ हायड्रोजन रिफ्युएलिंग स्टेशन्स स्थापित केले जातील. टाटा मोटर्स, रिलायन्स इंडस्ट्रीज, एनटीपीसी, अशोक लेलँड, बीपीसीएल, आयओसीएल अशा प्रमुख कंपन्यांनी या प्रकल्पांसाठी मंजुरी मिळवली आहे. ग्रेटर नोएडा-दिल्ली-आग्रा, भुवनेश्वर-कोणार्क-पुरी, अहमदाबाद-बडोदा-सुरत, साहिबाबाद-फरिदाबाद-दिल्ली, पुणे-मुंबई, जमशेदपूर-कलिंगनगर, तिरुअनंतपुरम-कोची, कोची-एडापल्ली, जामनगर-अहमदाबाद आणि विशाखापट्टणम-बय्यावरम या दहा मार्गांवर हायड्रोजन वाहने धावतील. यामुळे हायड्रोजनच्या वापरावर आधारित वाहतूक तंत्रज्ञानाच्या विकासाला मोठा धोरणात्मक लाभ होईल.

ऑइल इंडिया लिमिटेडने २० एप्रिल २०२२ रोजी आसाममधील जोरहाट पंप स्टेशनवर भारतातील पहिला ९९.९९९ टक्के शुद्ध ग्रीन हायड्रोजन पायलट प्लांट सुरू केला. त्याची स्थापित क्षमता प्रति दिन दहा इतकी असून तीन महिन्यांच्या विक्रमी वेळेत कार्यान्वित झाली आहे. राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन हे जागतिक स्तरावर ग्रीन हायड्रोजनचे उत्पादन आणि निर्यात करण्याच्या भारताच्या महत्त्वाकांक्षेचे प्रतीक आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने ४ जानेवारी २०२२ रोजी हे अभियान सुरू केले. या अभियानाद्वारे २०३० पर्यंत दर वर्षी ५० लाख टन ग्रीन हायड्रोजनचे उत्पादन करण्याचे उद्दिष्ट आहे. या अभियानाद्वारे ग्रीन हायड्रोजन आणि त्याच्या डेरिव्हेटिव्हजचे उत्पादन, वापर आणि निर्यात यासाठी भारताला जागतिक केंद्र बनवणे, स्वच्छ ऊर्जेद्वारे स्वावलंबी होण्याच्या भारताच्या उद्दिष्टामध्ये योगदान देणे आणि जागतिक स्वच्छ ऊर्जा संक्रमणासाठी एक प्रेरणा म्हणून काम करणे ही उद्दिष्ट्ये ठेवली गेली आहेत. २०३०पर्यंत, आठ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक आकर्षित करणे आणि सहा लाखांपेक्षा अधिक नोकऱ्या निर्माण करणे हे मिशनचे उद्दिष्ट आहे. २०३० पर्यंत अंदाजे ५० दशलक्ष मेट्रिक टन कार्बन डाय ऑक्साइड उत्सर्जन रोखणे अपेक्षित आहे. हे मिशन ग्रीन हायड्रोजनची मागणी, उत्पादन, वापर आणि निर्यातीला प्रोत्साहन देईल.

मिशनसाठी प्रारंभिक परिव्यय १९,७४४कोटी रुपये असेल. त्यामध्ये साइट प्रोग्रामसाठी १७,४९० कोटी रुपये, पथदर्शी प्रकल्पांसाठी १४६६ कोटी रुपये, मिशनच्या इतर घटकांसाठी रु. ३८८ कोटी यांचा समावेश आहे. संबंधित घटकांच्या अंमलबजावणीसाठी द्वारे योजना मार्गदर्शक तत्त्वे तयार केली जातील. ४ जानेवारी २०२३ रोजी ‘हरित हायड्रोजन मिशन’ सुरू करण्यात आले. भारताला ऊर्जा क्षेत्रात स्वावलंबी बनवणे हा या मिशनचा उद्देश आहे. या मिशनसाठी २०२९-३० पर्यंत १९,७४४ कोटी रुपयांचा निधी खर्च केला जाणार आहे. ग्रीन हायड्रोजनच्या वापराने देशात अक्षय ऊर्जा निर्मितीचा वेग वाढवून, पर्यावरणपूरक वाहतुकीला चालना दिली जाईल. देशभरातील १२५ गिगावॅट अक्षय ऊर्जेच्या क्षमता आणि पाच मिलियन मेट्रिक टन ग्रीन हायड्रोजन उत्पादन क्षमता हे या मिशनचे मुख्य उद्दिष्ट आहे. हरीत हायड्रोजन मिशनच्या सहाय्यक धोरणांमुळे आणि धोरणात्मक भागीदारीद्वारे ग्रीन हायड्रोजन निर्यात संधी निर्माण होतील. हरित हायड्रोजन किंवा ग्रीन अमोनिया, ग्रीन मिथेनॉल इत्यादी डेरिव्हेटिव्ह उत्पादनांच्या वापरातील किमान हिस्सा भारत सरकार नियुक्त ग्राहकांद्वारे ऊर्जा किंवा फीडस्टॉक म्हणून निर्दिष्ट करेल. अशा किमान वापराचा वर्षनिहाय मार्गक्रमण अधिकार प्राप्त गटाद्वारे ठरवला जाईल. ग्रीन हायड्रोजन आणि ग्रीन अमोनियाची खरेदी स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारे केली जाईल.

ग्रीन हायड्रोजन उत्पादनासाठी नवीकरणीय ऊर्जेचे वितरण सुलभ करण्यासाठी विविध हरित हायड्रोजन प्रकल्पांसाठी धोरणात्मक तरतुदींमध्ये ग्रीन हायड्रोजन उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या अक्षय ऊर्जेसाठी आंतर-राज्य पारेषण शुल्क माफ करणे, अक्षय ऊर्जा साठवण सुलभ करणे, कालबद्ध मुक्त प्रवेश आणि कनेक्टिव्हिटी प्रदान करणे समाविष्ट आहे.

स्वच्छ उर्जा स्त्रोत म्हणून ग्रीन हायड्रोजनच्या वापराला गती देणे हे नॅशनल ग्रीन हायड्रोजन मिशनचे उद्दिष्ट आहे. ते पुरवठा साखळींच्या विकासास समर्थन देईल जे हायड्रोजनची कार्यक्षमतेने वाहतूक आणि वितरण करू शकतात. यामध्ये निर्यातीसाठी तसेच स्वदेशी वापरासाठी पाइपलाइन, टँकर, मध्यम प्रवाहातील साठवण सुविधा आणि लास्ट माईल वितरण नेटवर्कचा समावेश आहे. मिशनअंतर्गत सार्वजनिक-खाजगी भागीदारी व्यवस्था केली जाईल. या व्यवस्थेसाठी उद्योग आणि संबंधित सरकारी संस्थांच्या योगदानासह समर्पित निधी तयार करणे आवश्यक आहे. या संस्था खाजगी क्षेत्राच्या सहकार्याने सर्वसमावेशक ध्येयकेंद्रित संशोधन आणि नाविन्यपूर्ण कार्यक्रम तयार करण्यासाठी संसाधने एकत्रित करतील. देशातील काही शहरे पर्यावरणाच्या दृष्टीने आदर्श मानली जातात. राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन’द्वारे देशातील महत्वाची शहरे हरित आणि पर्यावरणपूर्वक बनावित, यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे.

चंदीगडनंतर गांधीनगर हे भारतातील दुसरे पूर्णपणे नियोजित शहर मानले जाते. त्याला हरित नगर म्हणतात. येथे सचिवालय आणि मंत्र्यांची निवासस्थानेही आहेत. म्हैसूर शहर कार्यक्षम ड्रेनेज आणि सांडपाणी प्रणालीसाठी ओळखले जाते. हे शहर हिरवे आणि स्वच्छ असल्याचेही म्हटले जाते. यामुळे ते भारतातील सर्वात राहण्यायोग्य शहरांपैकी एक मानले जाते. शाश्वत विकासाच्या यशस्वी मॉडेलद्वारे २००१ मध्ये १०.२ टक्क्यांवरून २०२१ मध्ये २३.०६ टक्क्यांपर्यंत हरित कव्हरसह दिल्ली हे देशातील सर्वात हरित महानगर आहे. बंगलोरला ‘गार्डन सिटी ऑफ इंडिया’सह अनेक टोपणनावे आहेत. एकंदरीत, जीवाश्म इंधनाला पूरक पर्याय म्हणून नवे तंत्र वेगाने पुढे येत आहे. त्याचे स्वागत करायला हवे.

# वणवे रोखा निसर्गसंपदा वाचवा!

प्रासंगिक

श्याम ठाणेदार

पुणे



**उन्हाळा जसा तापू लागतो तसे वन खात्याच्या जंगलांना आगी लागण्याच्या घटनात वाढ होते. आताही राज्यात कोठेना कोठे वन खात्याच्या जंगलांना आगी लागून वणवे पेटल्याच्या बातम्या वर्तमान पत्रात वाचायला मिळतात. काही वेळा या आगी वेळीच आटोक्यात येतात पण बऱ्याचदा या आगी वेळीच आटोक्यात न आल्याने त्या रौद्ररूप धारण करतात आणि त्याचे रूपांतर मोठ्या वणव्यात होते आणि त्यात बहुमोल अशी निसर्ग संपदा जळून खाक होते. दोन वर्षापूर्वी गोव्यातील महादयी वन्यजीव अभयारण्याला भीषण आग लागली होती. जगातील आठ जैवविविधता हॉटस्पॉट पैकी एक असलेल्या पश्चिम घाटाचा हा विस्तिर्ण भाग गोव्याच्या इतिहासातील सर्वात भीषण आगीमुळे उध्वस्त झाला होता.**



मागील वर्षी पुणे जिल्ह्यातील वन खात्याच्या जंगलातही वणवे पेटण्याच्या अनेक घटना घडल्या त्यात शेकडो एकर जंगलातील बहुमोल अशी निसर्गसंपदा जळून खाक झाली होती. वणवा पेटला की त्यात निसर्गाची कधीही न भरून येणारी हानी होते. साधारणतः उन्हाळ्यात या आगी लागतात आणि वणव्यांमुळेच या आगी लागतात. सामान्यतः सदाहरित जंगलांमध्ये आगी लागत नाही आग लागली तरी ती आपोआप विझतेही मात्र जोराने वारे वाहत असतील तर आग लवकर विझत नाही उलट ती आणखी वाढते. वनांमध्ये वाळलेले लाकूड, पाने, गवत असे अनेक घटक ठिणगीच्या संपर्कात येताच आग भडकते. मग झाडे पेट घेतात आणि मग मोठ्या वेगाने हा वणवा सर्वत्र पसरतो. डोंगराळ भागाचा भूगोल आणि भूरचना जटिल असल्यामुळेही वणवे विझवण्यात अनेकदा अडथळे येतात. गोव्यात तेच झाले. दुर्गम परिसर आणि खडे चढण यामुळे तेथील आग विझवण्यात अडचण आल्याचे सांगितले गेले. अर्थात जंगलांना आगी लागण्याच्या या घटना नव्याही नाहीत. गेल्या काही वर्षात वणवे लागण्याचे प्रमाण ज्याप्रकारे वेगाने वाढत आहे तो एक नव्या संकटाचा इशारा आहे.

नैसर्गिक कारणामुळे जंगलांना वणवे लागण्याच्या घटना तर घडतातातच पण मानवनिर्मित वणवे लागण्याचा घटनांची संख्याही प्रचंड आहे. दरवर्षी उन्हाळा आला की जंगलांना आग लागण्याच्या घटना घडतात आणि त्यात बहुमोल अशी निसर्गसंपदा नष्ट होते केवळ जंगलांनाच नाही तर डोंगर, पर्वत, टेकड्यांवरील वृक्ष, वेली देखील या वनव्यांनी नष्ट होतात. विविध महापालिका, नगरपालिका, जिल्हापरिषदा, ग्रामपंचायती, राज्य व केंद्र शासन, राजकीय, सामाजिक व सेवाभावी संघटना पावसाळ्यात वृक्षारोपण करतात. पावसाळ्यानंतरही ही वनसंपदा जतन करण्यासाठी या संघटना रोपट्यांना पाणी घालून ते वाढवतात. गाई, गुरे, बकऱ्यांपासून त्यांना जपतात. मात्र उन्हाळ्यात ठिकठिकाणी वणवे लागून व काही समाजकंटकामार्फत वणवे लावून वर्षानुवर्षे वाढवली गेलेली ही बहुमोल निसर्गसंपदा आगीच्या भक्ष्यस्थानी पडत असते. उन्हाळ्यात लागणारे हे वणवे नैसर्गिक असल्याचे भासवले जाते पण हे यातील बरेचसे वणवे मानवनिर्मितच असतात हे उघड सत्य आहे. काही समाजकंटक जाणीवपूर्वक शहराजवळच्या डोंगरावरील हिरवाईला वणवे लावून ती नष्ट करतात. चराई करिता चांगले गवत यावे या हेतूने हे वणवे लावले जातात. (आग लागल्यावर चांगले व भरपूर गवत उगवते हा त्या मागचा उद्देश असतो.) लाकूडफाटा, कोळसा मिळवण्यासाठी तसेच शेती व शिकारीसाठी जमीन तयार करण्यासाठी या बहुमोल निसर्ग संपदेला आगी लावल्या जातात. या आगीत वृक्ष, वनस्पती, वन्य जीवांची हानी, स्थलांतर यामुळे जे नुकसान होत असते त्याची भरपाई होण्यास खूप वर्षाचा कालावधी जातो. निसर्गाची अपरिमित हानी होते. या आगीमुळे पर्यावर्णाची हानी तर होतेच पण कार्बनडायऑक्साईडही वातावरणात वाढतो त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते.

एकूणच झाडांना लावल्या जाणाऱ्या या आगी म्हणजे राष्ट्रीय हानी आहे. असे असतानाही या मानवनिर्मित वणव्यांकडे केंद्र व राज्याचे वने आणि पर्यावरण खाते, पोलिसखाते दुर्लक्ष करीत असतात. आगी लावणाऱ्या या समाजकंटकांवर पोलीस तसेच प्रशासन कोणतीही कारवाई करीत नाही त्यामुळेच वणव्यांच्या घटनांत वाढ होताना दिसत आहे. काही भ्रष्ट कर्मचारी आणि अधिकारी यांच्यामुळे निसर्गाची कधीही भरून न निघणारी हानी होत आहे, म्हणूनच सरकारने या वणव्यांची गांभीर्याने दखल घ्यायला हवी. वणवे लावून पर्यावरणाची हानी करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई व्हायला हवी. वणव्यांमुळे पर्यावरणाची होणारी हानी टाळायची असेल तर मानवनिर्मित वणवे रोखायलाच हवे.


# इंक्रेडिबल प्रीमियम लीग




जगातील सर्वाधिक महागडी आणि लोकप्रिय लीग म्हणून ओळखली जाणारी इंडीयन प्रीमियम लीग अर्थात आयपीएलच्या अठराव्या हंगामाची सुरुवात २२ मार्च पासून झाली असून पुढील दोन महिने आयपीएलचा थरार चालू राहणार असल्याने क्रिकेट प्रेमींसाठी ती मोठी मेजवानी ठरणार आहे. आयपीएलची सुरुवात २००८ साली झाली. म्हणजे आज आयपीएलला सतरा वर्ष पूर्ण झाली. या सतरा वर्षात क्रिकेटच्या मैदानात आणि मैदानाच्या बाहेर अनेक घडामोडी घडल्या पण आयपीएलची लोकप्रियता तसूभरही कमी झाली नाही. आयपीएललाही मॅच फिक्सिंग सारखी किड लागली होती. मॅच फिक्सिंगचा आरोप झाल्याने काही खेळाडूंना कायमचे घरी बसवण्यात आले तर चेन्नई आणि राजस्थान या सारख्या लोकप्रिय संघावर दोन वर्षाची बंदी घालण्यात आली होती. मॅच फिक्सिंगमुळे आयपीएलला उतरती कळा लागेल असा अंदाज बांधला जात होता मात्र तो फोल ठरला उलट आयपीएल आणखी लोकप्रिय ठरली. कोरोनाचा फटका जसा इतर क्रीडा प्रकारांना बसला तसाच तो आयपीएललाही बसला. कोरोनाच्या सावटातही बीसीसीआयने आयपीएलचे यशस्वी आयोजन केले. कधी देशात तर कधी परदेशात, कधी प्रेक्षकांशिवाय तर प्रेक्षकांसह आयपीएलचे आयोजन करून बीसीसीआयने क्रिकेट प्रेमींना आयपीएलचा थरार अनुभवण्याची संधी दिली.

जगभरातील इतर लीग कोरोनामुळे ठप्प झाल्या असताना बीसीसीआयने आयपीएलचे यशस्वी आयोजन करून जगापुढे व्यवस्थापनाचा आदर्श घालून दिला. सुरवातीला आठ संघात खेळली जाणारी ही स्पर्धा तीन वर्षापासून दहा संघात खेळली जात आहे. गुजरात टायटन आणि लखनौ सुपर जायंटस या दोन नव्या संघाची आयपीएलमध्ये एंट्री झाल्याने आयपीएलचा थरार आणखी वाढला आहे. विशेष म्हणजे यातील गुजरात टायटन या संघाने २०२२ साली पदार्पणातच विजेतेपद मिळवत अनेकांना अचंबित केले इतकेच नव्हे तर २०२३ साली देखील हा संघ अंतिम फेरीत पोहचला म्हणजे पदार्पणाच्या पहिल्या दोन वर्षातच विजेतेपद आणि उपविजेतेपद मिळवत या संघाने आपले कर्तुत्व दाखवून दिले आहे. आयपीएलमध्ये दहा संघ असले तरी आयपीएलवर चेन्नई आणि मुंबई या दोन संघाचेच वर्चस्व राहिले आहे. दोन्ही संघाने प्रत्येकी पाच विजेतेपद पटकावित आयपीएलवर आपले एकहाती वर्चस्व सिद्ध केले आहे. या दोघांशिवाय कोलकाता संघाने तीनदा तर हैद्राबाद या संघाने दोनदा विजेतेपद मिळवले आहे. गुजरात या संघाने आपल्या पहिल्याच प्रयत्नात म्हणजे २०२२ ला विजेतेपद मिळविले तर राजस्थान रॉयल या संघाने आयपीएलच्या पहिल्या हंगामात म्हणजे २००८ साली विजेतेपद मिळविले. बंगळुरू, पंजाब, दिल्ली, लखनौ या सारख्या प्रबळ संघांना मात्र अद्याप एकदाही विजेतेपदाला गवसणी घालता आलेली नाही यावर्षी आयपीएलला नवा विजेता मिळेल का ? याची उत्सुकता क्रिकेटप्रेमींना लागली आहे. अर्थात यावर्षीही चेन्नई आणि मुंबई हेच दोन संघ विजेतेपदासाठी प्रबळ दावेदार आहेत. याशिवाय कोलकाता, बंगळुरू आणि गुजरात हे देखील विजेतेपदाच्या शर्यतीत आहेत. कदाचित यावेळी एखाद्या नव्याच संघाने विजेतेपद पटकावून सर्वांना अचंबित केल्यास आश्चर्य वाटायला नको.

आयपीएल म्हणजे भारतीय संघात प्रवेश करण्याचे प्रवेशद्वार आहे त्यामुळेच आयपीएलमध्ये चांगली कामगिरी करण्यासाठी खेळाडू मैदानावर घाम गाळतात. आयपीएलमध्ये चांगली कामगिरी करून भारतीय संघात प्रवेश मिळवण्याचे स्वप्न सारे खेळाडू पाहतात ते स्वप्न यशस्वी करण्यासाठी ते जीवाचे रान करतात त्यामुळेच आयपीयलचे सर्व सामने रंगतदार होतात आणि प्रेक्षकांना खेळाचा मनमुराद आनंद लुटता येतो. यावर्षीही आयपीएलचे सर्व सामने रंगतदार होतील आणि प्रेक्षकांना खेळाचा मनमुराद आनंद लुटता येईल यात शंका नाही.




## राशीभविष्य

- **मेष** : आज महत्वाची कामे पुढे ढकलावीत. आर्थिक बाजू सांभाळा. कामात अडथळे निर्माण होतील.
- **वृषभ** : शुभकार्यासाठी दिवस चांगला. स्त्रीच्या नाजूक पाशात अडकाल. पर्यटनाची संधी साधाल.
- **मिथुन** : यश मिळवण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतील. कौटुंबिक सुख सामान्य राहील. खर्च वाढेल.
- **कर्क** : स्थावराचे व्यवहार सफल होतील. ताणतणाव कमी होईल. यशाचं शिखर गाठाल.
- **सिंह** : उत्सवाचा अभाव जाणवेल. खर्च करावा लागेल. आरोग्याच्या किरकोळ तक्रारी राहतील
- **कन्या** : स्पर्धेचा ताण कमी होईल. अंगभूत गुणांना वाव मिळेल. कार्यक्षेत्रात दबदबा वाढेल.
- **तूळ** : पाहुण्यांची अनिच्छेने सरबराई करावी लागेल. मन थाऱ्यावर राहणार नाही. गुंतवणूक टाळा.
- **वृश्चिक** : ठरवलेली कामं मार्गी लागतील. चिंता कमी होतील. लांबचे प्रवास लाभदायक होतील.
- **धनु** : घरातील वादविवादापासून दूर रहा. योग्य निर्णय घेणं अवघड होईल. स्वार्थी लोकांपासून सावध रहा.
- **मकर** : आर्थिक स्थिती बिकट राहील. प्रवास म्हणजे समस्या वाटेल. सद्‌विवेकबुद्धी जागृत ठेवा.
- **कुंभ** : गोड बोलून कार्यभाग साधाल. सर्व बाबतीत आघाडी असेल. संकल्प सिद्धीस जातील.
- **मीन** : शासकीय कामास अनुकूल दिवस. आत्मविश्वास जागृत ठेवाल. नवपरिणीतांचे प्रश्न सुटतील.

सल्ला मोलाचा

## फॅशन मिनिएचर टॅटूजची

त्वचेचं नैसर्गिक सौंदर्य अबाधित ठेवायचं आणि टॅटूची हौसही पुरवायची यातून मिनिएचर डिझाईनच्या टॅटूची चलती सुरू आहे. त्यांना ‘मिनिमलिस्टिक टॅटू’ असं म्हटलं जातं. अनेकदा व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वापेक्षाही तिच्या शरीरावरच्या टॅटूजकडे पहिल्यांदा लक्ष वेधलं जातं. आपल्या सुंदर चेहऱ्यावर, त्वचेवर आणि एकूणच व्यक्तिमत्त्वावर टॅटू आक्रमण करतात असं वाटतं. म्हणून सौंदर्य खुलवणारे छोटेसे टॅटूज काढले जातात. त्यांच्यामध्ये विविध गोलाकार, मंडलं, भूमितीय आकृत्या, नाजूक पानं, फुलं, पक्षी यांनी यात मोठं स्थान पटकावलं आहे. प्राण्यांच्या आणि इतर चित्रांवरून व्यक्तीचे गुणधर्म समजतात असंही मानलं जातं. त्यामुळे त्याचा अभ्यास करून आपण कसं वाटावं या दृष्टीनंही टॅटूंची निवड केली जात आहे. शिवाय विविध प्रकारची रत्नं जडवलेले टॅटूही सध्या फॅशनमध्ये आहेत. यांत हिऱ्यापासून पाचूपर्यंतच्या रत्नांचा वापर केला जातो. हे ‘जेम-टॅटू’ अर्थातच सर्वांचं लक्ष पटकन वेधून घेतात.

## २५ मार्च

दिनविशेष

- २०१३ : सहायक निरीक्षक सचिन सूर्यवंशी यांच्या निलंबनाच्या घोषणेनंतर विधिमंडळातील पेच सुटला.
- २०१४ : सर्वोच्च न्यायालयाचे एन. श्रीनिवासन यांच्यावर कठोर ताशेर, भारतीय क्रिकेट मंडळाच्या अध्यक्षपदावरून दूर होण्याविषयी सूचना.
- २०१६ : जम्मू-काश्मीरमध्ये भाजपचा ‘पीडीपी’ला पाठिंबा.
- २०१८ : केंद्रीय मंत्री अश्विनी चौबे यांच्या मुलाविरुद्ध अरेस्ट वॉरंट काढण्यात आला.

महत्त्वाचं काही

## प्राणी रंग कसे बदलतात?

सरडा रंग बदलतो तर काही सजीव आपल्या रंगामुळे निसर्गात अगदी सहज मिसळून जातात. काही फुलपाखरांचे पंख पानांसारखे वाटतात. त्यांच्या शिराही पानांवरच्या रेषांप्रमाणे दिसतात. यामुळे झाडाच्या खोडावर फुलपाखरू बसलं आहे हे पटकन लक्षात येत नाही. यामुळे शत्रूपासून त्यांचा बचाव होतो. झाडावर राहणाऱ्या बेडकांच्या काही प्रजाती रंग बदलतात. आता रंगबदलाची ही प्रक्रिया नेमकी काय आहे हे जाणून घेऊया. प्रत्येक सजीवाच्या शरीरात पेशी असतात. हृदय, फुफ्फुसासारखे अवयव आणि आपली त्वचाही याच पेशींपासून बनली आहे. यातल्या काही पेशींना मेलानोफोर असं म्हटलं जातं. या पेशींमध्ये रंगद्रव्यं असतात. त्याला पिगमेंट्स असं म्हटलं जातं. यामुळे त्वचेला रंग प्राप्त होतो. हिरव्या रंगाच्या पालींच्या शरीरात हिरवं रंगद्रव्य असतं. या पेशींवर मज्जासंस्थेचं नियंत्रण असतं. त्यामुळे गरजेनुसार पिगमेंट्सच्या संचयात बदल घडत जातात. वातावरणातला प्रकाश, तापमान, भीती किंवा धोक्याची जाणीव यामुळे पिगमेंट्सवर परिणाम होतो. यानुसारच सरडा तसंच इतर प्राण्यांमध्ये रंगबदलाची प्रक्रिया घडते.

## पंचांग

**मंगळवार, २५ मार्च २०२५**
क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
फाल्गुन कृ. ११, नक्षत्र: श्रवण
चंद्रराशी: मकर, योग: शिव
सूर्योदय: ६.४२, सूर्यास्त: ६.४९

## फॉरवर्डस

**कधी कधी यश हेच अनेकांच्या असुयेचं कारण ठरत असतं...**

नजरों मे दोस्तों की जो इतना खराब हैं,
उसका असूर है कि वो कामयाब हैं!

आरोग्यमंत्र

## उपयुक्त केळाच्या साली

आरोग्यरक्षणाच्या आणि वर्धनाच्या दृष्टीनं केळाचं सेवन महत्त्वाचं असतं तसंच केळाच्या सालीच्या वापरानंही विविध लाभ मिळतात. आज त्याबाबत जाणून घेऊ या.



✻ केळाच्या सालीचा आतील भाग चेहरा तसंच मानेवर रगडा आणि अर्ध्या तासानं कोमट पाण्यानं धुवा. नियमितपणे हा उपाय केल्यानं त्वचेवरील सुरकुत्या कमी होतात. ✻ पिकलेल्या केळाची साल दातांवर घासली तर दातांचा पिवळेपणा जाऊन ते मोत्यासारखे चमकतात. ✻ केळाची साल चेहऱ्यावर हळूवारपणे चोळल्यास मुरूमे, पुटकुळ्या नाहीशा होण्यास मदत होते. केळाच्या सालीत अँटी-ऑक्सिडंटस असल्यानं त्वचेवरील पिगमेंटेशन, वांग, डाग, दूर होतात. ✻ केळाच्या सालीतले पांढरे धागे काढून त्यात अ‍ॅलोव्हेरा जेल मिसळून डोळ्याखाली लावल्यास डोळ्याखालील काळी वर्तुळे नाहीशी होतात. ✻ मधमाशीने डंख, दंश केला तर त्याठिकाणी केळाची साल बारीक करून लावल्यास आराम पडतो. ✻ एखाद्या ठिकाणी वेदना होत असेल तर त्या जागी ३० मिनिटांपर्यंत केळाची साल बांधून ठेवावी. आराम पडतो. ✻ त्वचेवर कोठेही मस किंवा चामखिळ असल्यास तिथे केळाची साल चोळावी. काही दिवसातच चांगले परिणाम दिसतात. ✻ प्रदूषणामुळे किंवा संगणकावर जास्त वेळ काम केल्याने डोळ्यांवर ताण येतो. अशावेळी केळाची साल डोळ्यांवर ठेवावी. यामुळे थंडावा मिळतो आणि त्यातील मिनरल्स डोळ्यांना मिळतात. त्यामुळे डोळे निवतात.

## वाचा तर खरं

तरूणाईला सिनेसृष्टीविषयी बरंच वेड असतं. सिनेसृष्टीतील कलाकारांचं दर्शन व्हावं, जमल्यास त्यांच्याशी संवाद साधता यावा, यासाठी तरूणाई विशेष उत्सुक असते. अशा उत्सुकतेपोटी बॉलिवूडच्या फेव्हरिट पर्यटनस्थळांना अवश्य भेट द्यायला हवी. ✻ दार्जिलिंग- भारतीय सिनेमांचं आवडतं रमणीय स्थळ म्हणजे दार्जिलिंग. नव्या जुन्या अनेक सिनेमांचं शुटिंग दार्जिलिंगमध्ये झालं आहे. मै हूं ना, जग्गा जासूस, बर्फी आणि परिणीता या चित्रपटांचं चित्रिकरण दार्जिलिंगमध्ये झालं आहे. सप्टेंबर ते मार्च हा दार्जिलिंगला येण्याचा सर्वोत्तम कालावधी आहे.

‘राष्ट्र संचार’ (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave

Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### हमासच्या दोन दहशतवाद्यांचा खात्मा!

**नवी दिल्ली :** इस्रायल डिफेन्स फोर्सेसने गाझाच्या नास्सेर हॉस्पिटल संकुलात असलेल्या हमासच्या एका दहशतवाद्यावर लक्ष्यभेदी हल्ला केल्याची घोषणा केली. त्यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले की, गाझाच्या नास्सेर हॉस्पिटल संकुलात लपलेल्या एका प्रमुख हमास दहशतवाद्यावर लक्ष्यभेदी हल्ला करण्यात आला. हा हल्ला विस्तृत गुप्तचर माहिती संकलनानंतर आणि अत्यंत अचूक क्षेपणास्त्रांच्या मदतीने करण्यात आला, जेणेकरून परिसराला कमीत कमी हानी होईल. इस्रायली सैन्याने हमासवर नागरिक ठिकाणांचा आडोसा घेण्याचा आरोप करत सांगितले की, हमास रुग्णालयासारख्या नागरी पायाभूत सुविधांचा गैरवापर करीत असून, गाझातील लोकांचे जीव धोक्यात घालत आहे.

### राज्यात पुन्हा उष्णतेची लाट

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून राज्यात थोडा ढगाळ वातावरणाचा अनुभव घेतल्यानंतर आता पुन्हा एकदा उष्णतेची लाट जाणवू लागली आहे. विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि कोकण भागांमध्ये तापमान झपाट्याने वाढत आहे. विशेषत: पुणे, जळगाव, कोल्हापूर, सातारा आणि मुंबई यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये दुपारी उकाडा अस होत आहे. दरम्यान, मागच्या आठवड्यात पुण्यात कमाल तापमान ३६.६ अंश सेल्सिअस, तर मुंबईत ३४.६अंश सेल्सिअस इतकं दिसून आलं. मुंबईसह उपनगरांमध्ये दुपारच्या सुमारास उन्हाचा तडाखा वाढल्याने नागरिकांनी आवश्यक कामाशिवाय घराबाहेर न पडण्याचा सल्ला हवामान विभागाने दिला आहे.

# बुलेट ट्रेन प्रकल्पस्थळी अपघात

## रेल्वेसेवेवर परिणाम, २५ गाड्या रद्द, वटवा येथील दुर्घटना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**अहमदाबाद :** अहमदाबादजवळील बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या ठिकाणी झालेल्या अपघातामुळे मोठा अडथळा निर्माण झाला आहे, ज्यामुळे अनेक गाड्या रद्द कराव्या लागल्या आहेत. येथे बांधकामासाठी वापरलेला सेगमेंटल लाँचिंग गॅन्ट्री चुकून त्याच्या जागेवरून घसरला आणि जवळच्या रेल्वे मार्गावर परिणाम झाला, ज्यामुळे अनेक गाड्यांची वाहतूक विस्कळीत झाली. रविवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास वटवा येथे घडलेल्या या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, तसेच संरचनेचे कोणतेही नुकसान झाले नसल्याचे नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन (एनएचएसआरसीएल) ने सांगितले.

तथापि, या घटनेमुळे रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला, ज्यामुळे किमान २५ गाड्या रद्द करण्यात आल्या, तर १५ इतर अंशतः रद्द करण्यात आल्या, पाच गाड्यांचे वेळापत्रक बदलण्यात आले आणि सहा गाड्या वळवण्यात आल्या. रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले की, बाधित मार्गावर गाड्यांची वाहतूक सुलभ करण्यासाठी रेल्वे मार्ग मोकळा करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. एनएचएसआरसीएलच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, रोड क्रेनच्या मदतीने पुनर्संचयित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

या घटनेमुळे अनेक गाड्या पूर्णपणे किंवा अंशतः रद्द करण्यात आल्या आणि काही गाड्यांचे वेळापत्रक बदलण्यात आल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले. २३ मार्च रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास, वटवा (अहमदाबादजवळ) येथे व्हायाडक्ट बांधकामासाठी वापरल्या जाणाऱ्या सेगमेंटल लाँचिंग गॅन्ट्रीपैकी एक काँक्रीट गर्डरचे लाँचिंग पूर्ण झाल्यानंतर मागे हटत होती, असे एनएचएसआरसीएलने एका निवेदनात म्हटले आहे. ते चुकून जागेवरून घसरले.

याचा परिणाम जवळच्या रेल्वे मार्गावर झाला आहे, असे त्यांनी सांगितले. एनएचएसआरसीएलचे वरिष्ठ अधिकारी पोलिस आणि अग्निशमन सेवेच्या अधिकाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचले आहेत. परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. कोणत्याही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. उभारलेल्या संरचनेला कोणतेही नुकसान झाले नाही. अहमदाबाद रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, या घटनेमुळे वटवा आणि अहमदाबाद स्थानकांदरम्यानच्या डाउन लाईनवरील रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला. त्यांनी सांगितले की, आतापर्यंत २५ गाड्या पूर्णपणे रद्द करण्यात आल्या आहेत, १५ अंशतः रद्द करण्यात आल्या आहेत, पाच वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे आणि सहा गाड्या वळवण्यात आल्या आहेत.

### या गाड्या रद्द

● रद्द केलेल्या गाड्यांमध्ये वटवा-बोरिवली एक्सप्रेस, अहमदाबाद-मुंबई सेंट्रल एक्सप्रेस, वडोदरा-वटवा इंटरसिटी, अहमदाबाद-वलसाड गुजरात क्वीन, जामनगर-वडोदरा इंटरसिटी, वडनगर-वलसाड-वडनगर एक्सप्रेस आणि वटवा-आनंद मेमू यांचा समावेश आहे. अहमदाबाद-एमजीआर चेन्नई सेंट्रल हमसफर एक्सप्रेस, राजकोट-सिकंदराबाद एक्सप्रेस आणि इतर काही गाड्यांचे वेळापत्रक बदलण्यात आले. रेल्वे अधिकाऱ्यांनी प्रवाशांसाठी एक हेल्पलाइन नंबरही जारी केला.

# राहुल दुहेरी नागरिकत्व : ४ आठवड्यांची केंद्राला मुदत



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाने काँग्रेसचे खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या दुहेरी नागरिकत्वाच्या मुद्द्यावर निर्णय घेण्यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाला चार आठवड्यांची मुदत दिली आहे. मंत्रालयाने या प्रकरणी आठ आठवड्यांची मुदत मागितली होती, ती न्यायालयाने फेटाळून लावत चार आठवड्यांत निर्णय घ्यावा, असे सांगितले. राहुल गांधी कडेही ब्रिटीश नागरिकत्व असल्याचा आरोप केला जात असून हा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. याच मुद्द्यावर जनहित याचिका दाखल करण्यात आली असून, त्यावर उच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. आता

१९ डिसेंबर रोजी उच्च न्यायालयाने केंद्र सरकारला २४ मार्च रोजी केलेल्या कारवाईचा तपशील न्यायालयात सादर करण्याचे निर्देश दिले होते, परंतु केंद्र सरकारला तसे करता आले नाही. कर्नाटकातील सामाजिक कार्यकर्ते एस. विघ्नेश शिशिर यांनी ही जनहित याचिका दाखल केली आहे. यानुसार राहुल गांधी हे भारताचे तसेच ब्रिटनचे नागरिक आहेत, जे राज्यघटनेच्या कलम ८४ (अ) अन्वये निवडणूक लढविण्याच्या पात्रतेचे उल्लंघन आहे. हे सिद्ध झाल्यास राहुल गांधी आपला खासदार गमावू शकतात.

### जनहित याचिकेत काय म्हटले होते?

● १ जुलै २०२४ रोजी भाजप नेते आणि वकील एस विघ्नेश शिशिर यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयात याचिका दाखल करून राहुल गांधी यांच्याकडे ब्रिटनचे नागरिकत्व असल्याचा आरोप केला होता. याचिकाकर्त्याने २०२२ मधील ब्रिटिश सरकारच्या गोपनीय मेलचा हवाला देत हा आरोप केला होता. भारतीय नागरिकत्व कायदा १९५५ च्या कलम ९ (२) अन्वये राहुल गांधी यांचे भारतीय नागरिकत्व रद्द करण्याची मागणीही त्यांनी याचिकेत केली आहे.

# रस्त्यावर नमाज पढणाऱ्यांवर होणार कारवाई!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशाच्या बागपत जिल्ह्यात ईद-उल-फितर संदर्भात पोलिसांनी काही मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. रस्त्यावर नमाज पडण्यावर पूर्णतः बंदी असेल, असे स्पष्ट शब्दांत त्यामध्ये म्हटले आहे. तर नियम मोडणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाणार असल्याचेही पोलिसांनी सांगितले आहे.

पोलिस अधीक्षक अर्पित विजयवर्गीय यांनी दिलेल्या माहितीनुसार, गुड फ्रायडे आणि ईद-उल-फित्र सुरक्षितपणे पार पाडण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. सुरक्षेच्या कारणास्तव जिल्ह्यातील ६८ ईदगाह आणि १९५



मशिदी परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. ईदच्या संदर्भात कोणतीही नवीन परंपरा स्वीकारली जाणार नाही, त्याचबरोबर रस्त्यावर नमाज अदा करता येणार नाही. तसेच परंपरेबाहेरील कार्यक्रमांचे आयोजन केल्यास संबंधीतांवर कडक कारवाई केली जाईल.

संवेदनशील आणि संमिश्र भागांवर ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे नजर ठेवण्यात येणार आहे. तसेच समाज माध्यमांवरून आक्षेपार्ह आणि प्रक्षोभक पोस्ट टाकणाऱ्यांवर नजर ठेवण्यात येत असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.

# महात्मा ज्योतीराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाईंना 'भारतरत्न' देण्याचा ठराव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना देशाचा सर्वोच्च 'भारतरत्न' पुरस्कार प्रदान करुन गौरवण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करण्याचा महाराष्ट्र विधानसभेनं एकमताने मंजूर केलेला ठराव ऐतिहासिक असून प्रगत, पुरोगामी, सुधारणावादी महाराष्ट्राच्या लौकिकात भर घालणारा तसेच 'भारतरत्न' पुरस्काराचा गौरव वाढवणारा आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आनंद व्यक्त केला आहे.



संपूर्ण देशवासियांच्या लोकभावनेचा आदर करणारा हा ठराव सर्वानुमते मंजूर होण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व विधीमंडळ सदस्यांचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आभार मानले आहे. महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा पुण्यात सुरु करुन, स्त्रीशक्तीला शिक्षणाची दारे खुली करुन दिली. आज शेती, शिक्षण, ज्ञान, विज्ञान, संशोधन, अंतराळ, राजकारण, समाजकारण अशा सर्व क्षेत्रात महिला मोठ्या संख्येने जबाबदारीच्या पदांवर काम करत आहेत.

देशाच्या विकासात आपले योगदान देत आहेत. याचे संपूर्ण श्रेय महात्मा फुले आणि सावित्रीबाईंनी त्या काळात दाखवलेल्या दूरदृष्टीला, घेतलेल्या कष्टाला आहेत. समाजातील दुर्बल, वंचित, बहुजन समाजापर्यंत शिक्षणाची गंगा नेण्यासाठी या दांपत्याने केलेलं कार्य अलौकिक आहे. त्यामुळेच शेतकरी, कष्टकरी घटकांसह समस्त देशवासियांसाठी ते कायम 'महात्मा' राहणार आहेत. त्यांना 'भारतरत्न' देण्याचा महाराष्ट्र विधानसभेने मंजूर केलेला ठराव हा लोकभावनेचा आदर करणारा आणि 'भारतरत्न' पुरस्काराचा गौरव वाढवणारा ठराव आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

# मुंबईत बेशिस्त वाहनचालकांची संख्या वाढली!; १३ महिन्यात ५२६ कोटींचा दंड वसूल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई वाहतूक पोलिसांनी गेल्या १३ महिन्यांत (१ जानेवारी २०२४ ते ५ फेब्रुवारी २०२५) वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६५,१२,८४६ वाहन चालकांविरोधात कारवाई केली आहे. या कारवाईत ५२६ कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आला असून, त्यापैकी केवळ १५७ कोटी रुपयांची वसुली झाली आहे, तर ३६९ कोटी रुपयांची थकबाकी राहिली आहे.

ही माहिती आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी माहिती अधिकाराअंतर्गत मागवलेल्या प्रश्नाच्या उत्तरातून



स्पष्ट झाली आहे.

वाहतूक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ प्रकारच्या वाहतूक नियमभंग प्रकरणांमध्ये ४१ वाहतूक आणि १ मल्टिमीडिया विभागाद्वारे कारवाई करण्यात आली.

मात्र, केवळ २०,९९,३९६ वाहन चालकांनी दंड भरला असून ४४,१३,४५० वाहन चालकांनी अद्याप दंड अदा केलेला नाही. वाहतूक नियमांचे उल्लंघन करत फ्लिकर आणि अंबर दिवे वापरणाऱ्या ४७ वाहन चालकांविरोधात कारवाई करत २३,५०० रुपये दंड ठोठावण्यात आला. मात्र, यातील केवळ ७ वाहन चालकांनी ३,५०० रुपये दंड अदा केला. सर्वाधिक कारवाई मरीन ड्राईव्ह परिसरात झाली असून, ३२ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे.

पान १ वरून

## कुणाल कामराच्या अडचणीत वाढ

माध्यमातून टीका केली होती. त्याने आपल्या स्टॅन्डअप शोमध्ये ही कविता सादर करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना गद्दार म्हटले होते. 'दिल तो पागल है' या चित्रपटातील 'आंखो मे मस्ती....' या गाण्याच्या चालीवर त्याने ही विडंबनात्मक कविता सादर केली होती. त्याच्यामध्ये शिंदे गुवाहाटीला गेल्याचा उल्लेख केला होता, तसेच 'बाप चोरल्याचा' उल्लेखही केला होता. कुणाल कामराचा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर मुंबई ठाणे मध्ये याचे पडसाद उमटण्यास सुरवात झाली आहे. तसेच सध्या सुरु असलेल्या विधानसभेच्या अधिवेशनातही यावर जोरदार चर्चा झाली आहे.

.आम्ही शांत बसणार नाही : उदय सामंत

कुणाल कामराच्या गाण्यावर मंत्री उदय सामंत यांनीही भाष्य केले आहे. कुणाल कामराच्या गाण्यावर आम्ही चर्चा केली. ते पूर्ण गाणे ऐकूण आम्ही त्याच्यावर गुन्हा दाखल करणार आहे. एकनाथ शिंदे यांच्यावर जर कोणी बदनामीकारक गाणे तयार करायला लागले, तर आम्ही शांत बसणार नाही असा इशारा उदय सामंत यांनी दिला.

याची धुलाई करू : संजय निरुपम

शिवसेना नेते संजय निरुपम यांनी आज त्याची धुलाई करू. कुणाल कामरा हा काँग्रेसच्या इकोसिस्टिमचा एक भाग आहे. एकीकडे राहुल गांधींबरोबर तो पदयात्रा करतो आणि दुसरीकडे सुप्रिया सुळे व शरद पवारांबरोबरही दिसतो, असा घणाघात केला आहे.

कुणाला कामराचा एक पॉडकास्ट प्रसिद्ध झाला. त्यात त्याने 'ठाणे की रिक्षा'वर गाणे म्हटले आहे. यावर धमक्या देण्याची सेट तोडण्याची काय गरज आहे? महाराष्ट्राला कमजोर गृहमंत्री लाभल्याचे लक्षण आहे. देवेंद्र फडणवीस यांनी गृहखाते सोडावे. त्यांना गृहखाते झेपत नाही किंवा त्यांना काम करू दिले जात नाही. बीड, परभणी आणि नागपूरला काय झाले? आता मुंबईत आता एका पॉडकास्टरचा सेट तोडण्यात आला. पोलीस काय झोपा काढत होते का?"
**— संजय राऊत,** खासदार उबाठा

## मल्लखांबाचे प्रत्याक्षिक...

दिवस सुरु व्हायचा. खेळाडू म्हणून घडत असताना आई प्रभावती हीदेखील दररोज न चुकता पळायला येत असे. इतकेच नाही तर ती कबड्डी, खो-खो खेळायची. त्यामुळे आमच्यामध्ये ते गुण रुजत गेले. व्यायाम करणे हे इतके अंगवळणी पडले होते की त्यामध्ये खाडा पडला तर कंटाळा यायचा, अशी आठवण आशा करमरकर यांनी सांगितली. आई आणि वडील यांचे सहजीवन हे डोळा आणि काजळासारखे होते. आम्हा नऊ मुलींना त्यांनी मुलासारखेच वागवल्याची भावना त्यांनी या वेळी व्यक्त केली.

## खासदारांच्या वेतनात घवघवीत...

करण्यात आली आहे. ५ वर्षांहून अधिक सेवेसाठी अतिरिक्त पेन्शन, जी पूर्वी २ हजार रुपये प्रति महिना होते, ते देखील बदलले आहे, आता ते २ हजार ५०० रुपये प्रति महिना केले आहे.

## अपर जिल्हाधिकारी स्नेहल...

देखील पोलिस अधिक्षक पदी कार्यरत आहेत. स्नेहल बर्गे या प्रांतधिकारी म्हणून कार्यरत असताना बड्या राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने त्यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचे प्रकरण गाजले होते.

## बुलडोझर चालला

प्रमुख फहीम खान सध्या तुरुंगात आहेत. छत्रपती संभाजीनगरमधील औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मागणीसाठी विश्व हिंदू परिषदेने (श्लृढ) ने केलेल्या निदर्शनादरम्यान धार्मिक शिलालेख असलेली एक पत्रक जाळल्याची अफवा पसरल्यानंतर १७ मार्च रोजी हिंसाचार उसळला होता.

नागपूर हिंसाचार प्रकरणात राज्य सरकारने बेधडक कारवाई सुरुवात केली होती. त्याचाच एक भाग म्हणजे नागपूर महानगर पालिकेच्या अतिक्रमण पथकाकडून ॲक्शन मोडवर येत फहीम खान व युसुफ शेख या दोन आरोपींच्या घरावर कारवाई केली गेली. तर, शाहीन अमीन या आरोपीचे दोन दुकाने सील करण्यात आली आहेत. संजय बाग कॉलनीतील फहीम खानचे घर नागपूर महानगर पालिकेच्या पथकाने जमीनदोस्त करण्यास सुरुवात केली होती. त्यानंतर नागपूर हिंसाचारात आरोपी युसुफ शेख यांचे नागपूरच्या महाल भागातील जोहरीपूर येथील घरावरही पालिकेचा हातोडा पडला आहे.

युसूफ शेखच्या घरात खाली पार्किंगमध्ये एक रुम अनधिकृत आहे. सोबतच अधिकृत नकाशा व्यतिरिक्त पहिल्या व दुस-या माळ्यावरील बाल्कनीचे बांधकाम करण्यात आले होते, ते नागपूर महानगर पालिकेच्या पथकाने तोडले आहे. दरम्यान, गणेशपेठ पोलिस ठाण्याच्या तक्रारीमध्ये युसूफ शेखचे नाव हे ४८ नंबर आहे, तर फहीम खान मुख्य आरोपी पैकी एक आहे. मात्र, आता उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडून पाडकामाला स्थगिती देण्यात आली आहे.

## सेन्सेक्स १,०७८ अंकांनी वाढून बंद

निम्म्याहून अधिक योगदान राहिले.

आज सर्व १३ क्षेत्रीय निर्देशांक तेजीत राहिले. निफ्टी बँक, निफ्टी पीएसयू बँक आणि निफ्टी प्रायव्हेट बँक हे २ ते ३ टक्के वाढून आघाडीवर राहिले. निफ्टी आयटी, निफ्टी रियल्टी, निफ्टी एनर्जी, निफ्टी ऑटो निर्देशाकांनीही १ ते २ टक्के वाढ नोंदवली. तर बीएसई मिडकॅप १.३ टक्के आणि स्मॉलकॅप १.१ टक्के वाढून बंद झाला.

## २२ नक्षल्यांचे आत्मसमर्पण

**माहितीनुसार, आत्मसमर्पण केलेल्या सहा नक्षलवाद्यांवर एकूण ११ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर होते. छत्तीसगड सरकारच्या पुनर्वसन धोरणाअंतर्गत या सर्व नक्षलवाद्यांना प्रत्येकी २५,००० रुपयांची रोख मदत देण्यात आली आहे.**

## कांद्याच्या दरात मोठी घसरण

यामुळं शेतक-यांना मोठा आर्थिक फटका बसणार आहे. शासनाने कांदा उत्पादक शेतक-यांना भाव मिळवून देण्याची मागणी शेतक-यांमधून व्यक्त होत आहे.

धुळे जिल्ह्यात कांद्याचे क्षेत्र विस्तारत असून अनेक शेतकरी हे वर्षभर कांदा पीक घेतात. जिल्ह्यातील कांदा इंदौर, नाशिक, मुंबई, गुजरातच्या बाजार समितीत जातो. यंदाही उन्हाळी कांद्याचे क्षेत्र मोठे असून त्यातच मागील १५ दिवसांपासून उन्हाळी कांदा बाजारात येऊ लागला आहे. आवक अधिक असल्यानं दरात उतार आला आहे. महिन्यापूर्वी कांद्याला क्विंटलला चार हजारांपर्यंत भाव मिळत होता. मागील १० दिवसांपूर्वी अडीच हजार रुपये क्विंटलने कांदा विकला. पण, सध्या तर १ हजार ६०० रुपये प्रति क्विंटल दराने कांदा विकला जात आहे. यामुळं शेतक-यांना मोठा आर्थिक फटका बसणार आहे. शासनाने कांदा उत्पादक शेतक-यांना भाव मिळवून देण्याची मागणी शेतक-यांमधून व्यक्त होत आहे.

## बेरोजगारी विरोधात काँग्रेसची निदर्शने

ते म्हणाले की, आरएसएस देशाची शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त करत आहे आणि भविष्यात कोणालाही रोजगार मिळणार नाही. राहुल म्हणाले एक संघटना भारताचे भविष्य, शिक्षण व्यवस्था नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहे. तिचे नाव आरएसएस आहे. सत्य हे आहे की आपली शिक्षण व्यवस्था हळूहळू त्यांच्या हातात जात आहे. व्यवस्था त्यांच्या हातात गेली, तर देश उद्ध्वस्त होईल. कोणालाही रोजगार मिळणार नाही. ही निदर्शने राष्ट्रीय विद्यार्थी संघटना (एनएसयूआय), ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन, स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया, ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन, मुस्लिम स्टुडंट्स फेडरेशन, समाजवादी छात्र सभा आणि छात्र राष्ट्रीय जनता दल यांनी आयोजित केली आहेत.


### जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की मिलींद विलास गायकवाड राहणार सर्व्हे नंबर २०/१/१/१६, यश निल बिल्डिंग, फ्लॅट नंबर ६, विजयनगर, दिघी, पुणे. ४११०१५. यांचे नुकतेच निधन झाले असून, त्यांच्या नावावर असलेले दोन चाकी वाहन नंबर MH 14 HX 2354 असा असून त्याचा चासीस नंबर ME2B64BY1KWF21713 व इंजिन नंबर DHYWKF19591 असा असून, सदर वाहन त्यांची एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती प्रियांका मिलींद गायकवाड यांच्या नावावर पिंपरी-चिंचवड आरटीओ कार्यालयात करण्यात येणार असून, याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास, पंधरा दिवसाच्या आत कार्यालयात कळवावे. अन्यथा कोणाची काही तक्रार नाही, असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

१०/०३/२०२५

**श्रीमती प्रियांका मिलींद गायकवाड**
राहणार सर्व्हे नंबर २०/१/१/१६, यशनिल बिल्डिंग,फ्लॅट नंबर ६, विजयनगर, दिघी, पुणे ४११०१५.

### उपविभागीय अधिकारी हवेली, उपविभाग पुणे यांचे कार्यालय

७, निलगिरी बंगला, क्विन्स गार्डन, अल्पबचत भवनमागे, पुणे ४११००१.

### नोटीस

क्र. आरटीएस/अपिल /८००/२०२३
दिनांक २०/०१/२०२५

सुरेश गणपत ढमाले
रा. बेलावडे ता. मुळशी जि. पुणे
तर्फे कु. मु.धारक ज्ञानेश्वर पांडुरंग गरुड
रा. टाकवे खु. ता. मावळ जि. पुणे **वादी**

**विरुद्ध**

१) कामगार तलाठी वडकी
२) मंडल अधिकारी हडपसर
३) रामचंद्र दगडोबा जगताप
रा. मु.पो. नाना धुमाळ पेट्रोल पंपामागे सासवड ता. पुरंदर जि. पुणे
४) तुकाराम भगवंतराव मोडक
रा. वडकी ता.हवेली, जि. पुणे **प्रतिवादी**
५) विजय विठ्ठल जाधव
रा.ए-७०३ लुंकड आर्चिड विमाननगर पुणे

मौजे वडकी, ता.हवेली, जि. पुणे येथील येथील जमीन सर्व्हे नंबर / गट नंबर १२३४ बाबत फे. फा.**क्र.६९०६ व इ.** या निर्णयाविरुध्द अपिलार्थी यांनी इकडे दाखल केलेल्या अपिलाची सुनावणी **उपविभागीय अधिकारी हवेली उपविभाग पुणे यांचे कार्यालय, ७, निलगिरी बंगला, राणीचा बाग, अल्पबचत भवन मागे, पुणे - ४११००१ येथे दिनांक** ०३/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठेवण्यात आलेली आहे. तरी आपण नेमलेल्या तारखेस व वेळी पुराव्याच्या कागदपत्रासह न चुकता हजर रहावे. सदरहू तारखेस व वेळी आपण गैरहजर राहिल्यास तुमचे काही एक म्हणणे नाही असे समजून सुनावणीत एकतर्फी निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी. प्रतिवादींना अपिलासोबतची कागदपत्रे पुरविण्याची जबाबदारी अपिलार्थीची राहील.

**सही/ उपविभागीय अधिकारी हवेली, उपविभाग पुणे करीता**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की माझे अशील श्री सुधाकर शंकर डाळिंबे राहणार धानोरी पुणे, ह्यांचा पत्नी कै.सुनंदा सुधाकर डाळिंबे, दिनांक ०१/११/२०१७ रोजी पुणे येथे मयत झाल्या आहेत. मयत कै. सुनंदा सुधाकर डाळिंबे यांच्या पश्च्यात पती श्री सुधाकर शंकर डाळिंबे, व दोन मुले श्री मधुकर सुधाकर डाळिंबे आणि श्री संतोष सुधाकर डाळिंबे हे मयतास कायदेशीर वारस आहेत. तरी कोणाला कसलाही वरील कायदेशीर वारस आक्षेप असल्यास त्यांनी मला संबंधित कागदपत्रे घेऊन खालील पत्त्यावर सात दिवसांच्या आत कळवावे.

दिनांक- २३/०३/२०२५

**अड. वनश्री क्षीरसागर**
**वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड**
**३६३१३, एफ पी नं -ZISI3, अपार्टमेंट नं ३, दुसरा मजला, ए विंग, ; प्रतिसाद जोग कॉंडोमिनियम, शिवाजीनगर, पुणे -४११००४ - मोब नं - ९८२३५९८८०१, ईमेल - vanashree.kshirsagar@vastuhfc.com**

### जाहीर समन्स

**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)**

**पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन लि., पुणे**

**बारामती विभागीय कार्यालय : मयुरेश्वर अपार्टमेंट, पहिला मजला, भिगवण रोड, मु. पो. बारामती, ता. बारामती, जि. पुणे. फोन (०२११२) २२९५३२**

राजहंस ग्रामीण बि. शेती सह पतसंस्था मर्या.
पत्ता: करंजे, ता. बारामती, जि. पुणे. **अर्जदार**

**विरुध्द,** **जाब देणार**

| क्र. | प्रतिवादीचे नाव | प्रतिवादी क्र. | दावा क्र. | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. मकरंद माधव आपटे रा, राजस सोसायटी सर्व्हे नं.- २५/१-२ गंगा ओशियन पार्क, कात्रज, पुणे. | १ | १२४९/२५ | ४०७१३०८/- |
| २. | विकास कोंडिबा गायकवाड रा, जांबे रसिकवाडी, ता. मुळशी, जि पुणे . | २ | १२४९/२५ | ४०७१३०८/- |
| ३. | सौ. पुनम विकास गायकवाड रा, जांबे रसिकवाडी, ता. मुळशी, जि पुणे. | ३ | १२४९/२५ | ४०७१३०८/- |
| ४. | हेमाराम मांगीलाल परिहार रा. स. न. ४८/७ कृष्णाई मंगल कार्यालयजवळ नऱ्हेगाव ता. हवेली, जि.पुणे. | ४ | १२४९/२५ | ४०७१३०८/- |

सदर दाव्याचे कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील प्रतिवादींना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतु प्रतिवादी यांना समन्स रुजू न झाल्याने / त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने जाहीर समन्स देत आहोत.
उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दिनांक २८/०३/२०२५ रोजी ११.३० वाजता दाव्यासंबंधी कागदपत्रांसह आपण या न्यायालयात हजर रहावे.
या नोटीशीद्वारे उपरोक्त प्रतिवादी यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.
म्हणून आज दिनांक ०७/०३/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहीर समन्स दिला आहे.

शिक्का

**सही व शिक्का**
**(श्री एस. एम. तांदळे)**
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन लि., पुणे

# मुस्लिम आरक्षणामुळे संसदेत गदारोळ

## घटनेत बदल करण्याच्या काँग्रेसच्या विधानाने संतप्त पडसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** कर्नाटकातील सरकारी कंत्राटांमध्ये मुस्लिमांना चार टक्के आरक्षण देण्याच्या मुद्द्यावरून बेंगळुरूपासून नवी दिल्लीपर्यंत गदारोळ माजला आहे. सोमवारी संसदेतही त्याचे पडसाद उमटले. या मुद्द्यावरून सत्तापक्ष आणि विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे राज्यसभेचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले. दरम्यान, माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचा पक्ष आणि केंद्र सरकारमध्ये सहभागी असलेल्या जेडीएसने या मुद्द्यावर स्पष्ट केले आहे की, मुस्लिमांच्या आरक्षणाच्या मुद्द्यावर भाजप आणि जेडीएसमध्ये कोणतेही मतभेद नाहीत आणि दोन्ही पक्ष एकजुटीने त्याला विरोध करतात.

जेडीएस कर्नाटकचे प्रदेशाध्यक्ष आणि केंद्रीय अवजड उद्योग आणि पोलादमंत्री एचडी कुमारस्वामी यांनी या मुद्द्यावर एक निवेदन जारी करत आरक्षण हे धर्माच्या आधारावर नव्हे तर सामाजिक न्यायाच्या पायावर असावे, असे म्हटले आहे. जेडीएस आणि भाजपमध्ये समन्वय नसल्याच्या माध्यमांमध्ये येत असलेल्या बातम्या सत्यापासून दूर असल्याचेही केंद्रीय मंत्र्यांनी या निवेदनात म्हटले आहे. राज्यातील काँग्रेस सरकारवर निशाणा साधताना कुमारस्वामी म्हणाले की, राज्यात तुष्टीकरण विरुद्ध उपेक्षा असे राजकारण सुरू आहे.

या मुद्द्यावरून जेडीएस-भाजप युतीत संघर्ष निर्माण करण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे, पण आरक्षण हे धर्मावर आधारित नसून सामाजिक न्यायाच्या पायावर आधारित आहे आणि ते कायम राहिले पाहिजे, अशी जेडीएसची भूमिका ठाम आहे. काँग्रेस सरकारने मुस्लिमांना चार टक्के कंत्राटी आरक्षण देण्याच्या लढाईत जेडीएस आणि भाजपमध्ये दुरावा निर्माण झाल्याच्या बातम्या सत्यापासून दूर आहेत. काही वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्या दिशाभूल करणारी माहिती देत आहेत, जी पूर्णपणे निराधार आहे. कर्नाटक विधानसभा अधिवेशनापूर्वी बेंगळुरू येथे एनडीए समन्वय समितीची बैठक पार पडली, ज्यात सर्व मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्या बैठकीतच सरकारविरोधात लढण्याची रणनीती आखण्यात आली होती आणि त्यात मी स्वत: सहभागी झालो होतो. काँग्रेस सरकार निवडणुकीच्या फायद्यासाठी आरक्षण धोरणाचा गैरवापर करत असल्याचा आरोप करत कुमारस्वामी म्हणाले की, काँग्रेस सरकार केवळ व्होट बँकेच्या राजकारणासाठी सामाजिक न्यायाची मूलभूत संकल्पना नष्ट करत आहे. आरक्षणाचा तुष्टीकरणाचे हत्यार म्हणून वापर करून राज्यातील जनतेची दिशाभूल केली जात आहे. काँग्रेस देशभरात आरक्षणाची अराजकता निर्माण करत आहे, असा आरोप त्यांनी केला.

**संसदेत गदारोळ :** काँग्रेसप्रणीत कर्नाटक सरकारने मुस्लिमांना चार टक्के आरक्षणाची तरतूद केली आहे. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी याच पार्श्वभूमीवर वादग्रस्त केले आहे. डीके शिवकुमार म्हणाले की, हा निर्णय मुस्लिमांना आरक्षण देण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल पहिले आहे. भविष्यात मुस्लिमांना आरक्षण देण्यासाठी आम्ही राज्यघटनेतही सुधारणा करू शकतो. त्यांच्या या वक्तव्यावरून गदारोळ झाला असून, सोमवारी राज्यसभेत त्याचे पडसाद उमटले. संविधानात बदल करण्याची भाषा काँग्रेसच्या एका जबाबदार व्यक्तीने केली आहे, याकडे संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी लक्ष वेधले. डीके शिवकुमार यांच्या वक्तव्यामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाज तहकूब करण्यात आले.

> **जेडीएस आणि भाजप यांनी जनतेशी संबंधित अनेक मुद्द्यांवर एकत्र लढा दिला आहे आणि भविष्यातही लढणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याबाबत तडजोड करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या सर्व घटकांना समान संधी आणि लाभ मिळायला हवेत. एका विशिष्ट समाजाचे तुष्टीकरण करताना इतर समाजाकडे दुर्लक्ष करणे अन्यायकारक आणि घटनाबाह्य आहे. हा राज्यघटनेचा अपमान आहे.**
>
> **-एचडी कुमारस्वामी,** केंद्रीय मंत्री

# 'आप' सरकारची श्वेतपत्रिका काढणार

## दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांची घोषणा

दिल्ली विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात झाली. अधिवेशन वादळी ठरण्याची शक्यता आहे. विधानसभेत मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी दिल्ली सरकार मागील 'आप' सरकारच्या कार्यकाळाबाबत श्वेतपत्रिका काढणार असल्याची घोषणा केली. दिल्लीच्या मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री रेखा गुप्ता २७ वर्षांनंतर भाजप सरकारचा पहिला अर्थसंकल्प सादर करणार आहेत.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** श्वेतपत्रिका हा सरकारी दस्तऐवज असल्याचे स्पष्ट करा. सरकारकडून पाठिंबा मिळवण्यासाठी आणि जनतेचा अभिप्राय जाणून घेण्यासाठी हे सादर केले जाते. इतकेच नव्हे तर श्वेतपत्रिकेच्या माध्यमातून मागील सरकारचा कथित गैरकारभारही समोर आणला जातो आणि या त्रुटींपासून धडा घेत नव्या सरकारची धोरणे आणि कर्तृत्वही समोर आणले जाते.

दिल्ली विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी आम आदमी पक्षाच्या आमदारांनी नियम २८० अन्वये चर्चेदरम्यान आपल्या एकाही आमदाराचे नाव न घेण्याच्या विधानसभा अध्यक्ष विजेंदर गुप्ता यांच्या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली. या मुद्द्याच्या निषेधार्थ 'आप'च्या आमदारांनी सभात्याग केला. नियम २८० नुसार आमदारांना त्यांच्या मतदारसंघाशी संबंधित मुद्दे मांडण्याची मुभा आहे.

माध्यमातील वृत्तानुसार, विधानसभा अध्यक्षांनी 'आप'च्या आमदाराला बाजूला सारल्यानंतर विरोधी पक्षनेत्या आतिशी यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या गटाच्या आमदारांनी विरोध केला आणि सभागृहातून बाहेर पडले. विधानसभा अध्यक्षांनी 'आप'च्या आमदारांचे हे पाऊल धोरणात्मक अडथळा असल्याचे म्हटले आहे. अशा परिस्थितीत कॅगचा अहवाल लवकरच सादर केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यानंतर सरकारने दिल्ली परिवहन महामंडळाच्या (डीटीसी) कामकाजाबाबत नियंत्रक व महालेखापरीक्षकांचा (कॅग) प्रलंबित अहवाल विधानसभेत मांडला. मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी डीटीसीवरील कॅगचा अहवाल सादर केला. मागील 'आप' सरकारने कॅगचे अनेक अहवाल सभागृहात येऊ दिले नाहीत. वादग्रस्त दारू करार धोरण आणि मोहल्ला क्लिनिकबाबतच्या अहवालानंतर विद्यमान सरकारने सोमवारी कॅगचा तिसरा अहवाल सादर केला.

# कोल्हापूरच्या हद्दवाढीला गावकऱ्यांचा विरोध!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापूर नगरपालिकेचे रूपांतर कोल्हापूर महानगरपालिकेत १९७२ मध्ये झाले. मात्र, त्यानंतर अद्याप एकदा देखील कोल्हापूर शहराची हद्दवाढ झालेली नाही. यामुळं शहराचा विकास खुंटल्याचं म्हटलं जातंय. अशातच आता शहराची हद्दवाढ व्हावी, यासाठी मोठ्या प्रमाणात शहरातून मागणी होत असून सरकार देखील हद्द वाढीसाठी सकारात्मक असल्याचं दिसून येतंय. आज मंत्रालयात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत कोल्हापूरच्या हद्दवाढ संदर्भात महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आलीय. मात्र, दुसरीकडं हद्दवाढीमध्ये येणाऱ्या २० गावांनी आज गाव बंदची हाक दिलीय.

कोल्हापूर शहराच्या हद्दवाढीवरून हद्दवाढ समर्थक कृती समिती आणि हद्दवाढ विरोधी समितीमध्ये संघर्ष सुरू आहे. कोल्हापूर महानगर पालिका १९७२ ला स्थापन झाल्यापासून ६६.८२ चौ.कि.मी. इतकीच हद्द आहे. गेल्या कित्येक वर्षात या महानगरपालिकेची हद्दवाढच झालेली नाही. ज्यामुळं शहराच्या विकासावर मर्यादा येत आहेत. महापालिकेनं हद्दवाढीसाठी ६ वेळा प्रस्ताव शासनाला पाठवला अनेक आंदोलन, उपोषण झाले तरीही अद्याप प्रस्ताव मंजूर झाला नाही. दरम्यान, आज दुपारी उपमुख्यमंत्री आणि नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मंत्रालयात हद्दवाढ संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. मात्र या बैठकीला आणि हद्दवाढीला शहरालगतच्या २० गावांनी विरोध केलाय.

### ...तर तीव्र आंदोलन होईल

- या २० गावांनी गाव बंद ठेवत हद्दवाढीला विरोध दर्शवला असून कोल्हापुरातील उचगाव, पाचगाव, कळंबा, वडणगे यासह प्रत्येक गावात कडकडीत बंद पाळण्यात आलाय. दरम्यान, कोल्हापूर महानगरपालिका शहराचा विकासच करण्यात अपयशी ठरलेली असताना या गावांना शहरात घेऊन आमच्या गावांचा देखील विकास खुंटणार, यापेक्षा प्राधिकरणाला आणखी ताकद मिळाली तर आमच्या गावाचा आणखी विकास होईल. हद्दवाढ झाली तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा उचगावचे सरपंच मधुकर चव्हाण आणि ग्रामस्थांनी दिलाय.

# चालत्या ट्रेनमध्ये महिलेचा विनयभंग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हैदराबाद :** चालत्या ट्रेनमध्ये एका व्यक्तीने एका महिलेचा विनयभंग केल्याची घटना समोर आली आहे. त्यानंतर महिलेला रेल्वेतून उडी मारावी लागली. यावेळी महिला गंभीर जखमी झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, त्यावेळी ही महिला कोचमध्ये एकटीच होती.

हैदराबादमधील अलवल रेल्वे स्थानकाजवळ सोमवारी ही घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, चालत्या ट्रेनमध्ये एका महिलेवर बलात्काराचा प्रयत्न करण्यात आला, त्यानंतर महिलेने ट्रेनमधून उडी मारली. या अपघातात महिला गंभीर जखमी झाली आहे. रेल्वे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका २३ वर्षीय तरुणीने धावत्या रेल्वेतून उडी मारली. पोलिसांनी सांगितले की, एका व्यक्तीने कोचमध्ये तिच्यावर बलात्काराचा प्रयत्न केला. पीडित `वर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

सिकंदराबाद रेल्वे स्थानकावरून मेडचलकडे जाणाऱ्या मल्टी मॉडेल ट्रान्सपोर्ट सर्व्हिस ट्रेनच्या लेडीज कोचमधून २२ मार्च रोजी सायंकाळी ही घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, त्यावेळी ती कोचमध्ये एकटीच प्रवास करत होती. अलवल रेल्वे स्थानकावर डब्यात प्रवास करणाऱ्या दोन महिला प्रवासी ट्रेनमधून खाली उतरल्या.



**जेरुसलेम** जेरुसलेममधील इस्रायली पंतप्रधानांच्या निवासस्थानाजवळ, गाझामधील हमासच्या ताब्यातील सर्व ओलिसांच्या सुटकेची मागणी होत आहे. इस्रायली सरकार आणि पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या विरोधात नागरिक निदर्शने करत असून, इस्रायली पोलिसांनी त्यांना पांगवण्यासाठी पाण्याचा वापर केला गेला.

# फोक्सवॅगनला ११,६०० कोटींचा कर भरावा लागणार




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** जर्मन कार निर्माता कंपनी फोक्सवॅगनने भारतीय न्यायालयात दाखल केलेल्या ११,६०० कोटी रुपयांच्या कर नोटीसविरोधात लढा दिला आहे. फोक्सवॅगनच्या १२ वर्षांच्या चौकशीनंतर आयात शुल्काशी संबंधित करांची भारतातील आतापर्यंतची सर्वाधिक मागणी झाली आहे. फोक्सवॅगन इंडियावर फोक्सवॅगन, स्कोडा आणि ऑडी कार स्वतंत्र भाग म्हणून आयात करून कर चुकवल्याचा आरोप आहे. पूर्णपणे तयार केलेल्या कारवर ३०-३५ टक्के आयात शुल्क आकारले जाते, परंतु सुट्टे भाग आणल्यास केवळ ५-१५ टक्के इतकाच कर आकारला जातो. फॉक्सवॅगनने आपल्या आयातीविषयी महत्त्वाची माहिती आणि डेटा रोखून विलंब केल्याचे या दस्तावेजात उच्च न्यायालयाला सांगण्यात आले.

कर प्राधिकरणाने १० मार्च रोजी असा युक्तिवाद केला होता की, कंपनीचा युक्तिवाद मान्य केल्यास आयातदारांना महत्त्वाची माहिती दडपून ठेवता येईल आणि त्यानंतर कर विभागाकडून चौकशीची मुदत उलटून गेल्याचा दावा करता येईल. जगातील तिसऱ्या क्रमांकाची कार उत्पादक कंपनी फोक्सवॅगनची मर्सिडीज आणि बीएमडब्ल्यू सारख्या लक्झरी प्रतिस्पर्ध्यांशी टक्कर आहे. फोक्सवॅगन केवळ हप्त्यांमध्ये शिपमेंट रिव्ह्यू पूर्ण करण्यासाठी आवश्यक माहिती आणि कागदपत्रे पुरवत असल्याचे कर विभागाने आपल्या ताज्या याचिकेत म्हटले आहे.

न्यायालयाने फॉक्सवॅगनला प्रक्रियेचे पालन करण्याचे निर्देश द्यावेत आणि न्यायाधीशांसमोर नव्हे तर प्राधिकरणाशी वाटाघाटी करून आपल्या कर नोटिशीला उत्तर द्यावे, अशी भारत सरकारची इच्छा आहे.

फोक्सवॅगन इंडियाने २०२३-२४ मध्ये एकूण २.१९ अब्ज डॉलर्सची विक्री केली आणि केवळ ११ दशलक्ष डॉलर्सचा निव्वळ नफा कमावला.

ऑगस्ट २०२४ मध्ये भारतीय आयटी कंपनी इन्फोसिसला सुमारे ४ अब्ज डॉलर कर नोटीसला सामोरे जावे लागले. २०१२ मध्ये लागू केलेल्या कायद्यानुसार, व्होडाफोनसारख्या कंपन्यांनाही कर वादाचा सामना करावा लागला. केर्न एनर्जीने २०१५ मध्ये भारत सरकारविरूद्ध १.४ अब्ज डॉलर्सच्या कर वादामुळे आंतरराष्ट्रीय लवादाचा आधार घेतला.



## बेरोजगारी कमी, दरडोई जीडीपी वाढला

**लखनौ :** उत्तर प्रदेशातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकारला आठ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी उत्तर प्रदेशच्या आर्थिक प्रगती आणि कल्याणकारी उपक्रमांवर प्रकाश टाकला. बेरोजगारीचा दर लक्षणीयरीत्या कमी झाला आहे, दरडोई उत्पन्न वाढले आहे आणि उत्तर प्रदेश एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर आहे, असे त्यांनी नमूद केले. उत्तर प्रदेशातील बेरोजगारीचा दर २०१६ मधील १९ टक्क्यांवरून आता ३ टक्क्यांपेक्षा कमी झाला आहे, अशी माहिती योगी आदित्यनाथ यांनी पत्रकार परिषदेत दिली. २०१७ मध्ये दरडोई उत्पन्न ४६,००० रुपये होते, ते आता १,२४,००० रुपयांवर पोहोचले आहे.

## संभलमधील वकिलांचा संप

**संभल (उत्तर प्रदेश) :** जामा मशीद व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जफर अली यांच्या अटकेच्या निषेधार्थ संभल जिल्ह्यातील वकिलांच्या एका गटाने सोमवारी एक दिवसाचा पेन डाऊन संप केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षी २४ नोव्हेंबर रोजी झालेल्या हिंसाचारप्रकरणी अली या ज्येष्ठ वकिलाला रविवारी अटक करण्यात आली होती. मात्र, या घटनेचा तपास करणाऱ्या न्यायालयीन आयोगासमोर साक्ष देण्यापासून रोखण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप वकिलांच्या एका गटाने केला आहे. हिंसाचाराच्या चौकशीसाठी उत्तर प्रदेश सरकारने तीन सदस्यीय न्यायिक आयोग ाची स्थापना केली आहे.



## आंध्र प्रदेशात उष्णतेची लाट

**अमरावती :** आंध्र प्रदेश राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने राज्यातील २९ मंडळांमध्ये उष्णतेची लाट येण्याचा अंदाज वर्तविला आहे. त्याचप्रमाणे, दक्षिणेकडील राज्याच्या अल्लूरी सीतारामराजू जिल्ह्यातील चिंटुरू आणि कुनावरम मंडळांमध्ये तीव्र उष्णतेची लाट येण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. २९ मंडळांपैकी विजयनगरम, पूर्व गोदावरी, एलुरू आणि अल्लूरी सीतारामराजू जिल्ह्यातील प्रत्येकी तीन मंडळांना उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे, त्यानंतर श्रीकाकुलम जिल्ह्यातील चार, पार्वतीपुरम मन्याम जिल्ह्यातील सात आणि एनटीआर जिल्ह्यातील एका मंडळाला उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे.



## बनावट चोरीचा पर्दाफाश, तिघांना अटक

**कोझीकोड (केरळ) :** येथील कुट्टीकट्टूर येथे या प्रकरणातील मुख्य संशयिताच्या सासऱ्याकडून सुमारे ४० लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. पी. एम. रहीस, साजिद ऊर्फ शाजी आणि जमशिद अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. विशेष पथकाने दोन दिवसांच्या तपासानंतर अनेक ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर या प्रकरणाचा उलगडा करण्यात आला.

## झाशीमध्ये स्कूलबस पलटी

**झाशी (उत्तर प्रदेश) :** दुर्गम गावांतून विद्यार्थ्यांना खासगी शाळेत घेऊन जाणारी स्कूल बस सोमवारी सकाळी पलटी होऊन एक डझनहून अधिक मुले जखमी झाली असून त्यातील तिघांची प्रकृती चिंताजनक आहे. पूंछ पोलीस स्टेशनचे स्टेशन हाऊस ऑफिसर राजेश पाल यांनी सांगितले की, बाजना रोडवर दोन डझनहून अधिक विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी स्कूल बस बाजना गावाजवळ नियंत्रण सुटली आणि रस्त्याच्या कडेला उलटली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुमारे १४ मुले जखमी झाली आहेत. त्यांना तातडीने पूंछ येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले.

# बारामतीचा इतिहास दाखवण्याचे निर्देश

## अजित पवार यांनी केली कामांची पाहणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बारामती :** सेंट्रल पार्क परिसरात नागरिकांना बारामतीचा बदलता इतिहास, ऐतिहासिक प्रसंग आदी बाबी मोठ्या आकाराच्या पडद्यावर दाखविण्याच्यादृष्टीने नियोजन करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले.

अजित पवार यांनी शहरातील तीन हत्ती चौक परिसर सुशोभिकरण, कुस्ती महासंघ शेजारील कामाची आखणी अंतिम करणे, कुस्ती महासंघ ते घारे साठवण तलाव दरम्यान कॅनाल परिसर, घारे साठवण तलाव सुशोभीकरण आणि पदपथाचे काम, सेंट्रल पार्क सुशोभीकरण आणि प्रशासकीय भवनच्या बाहेरील रंगकामाची पाहणी करुन संबंधित अधिकांऱ्याकडून माहिती घेतली.

यावेळी उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल, गट विकास अधिकारी अनिल बागल, मुख्याधिकारी पंकज भुसे आदी उपस्थित होते. तालुक्यात विविध विकास कामे सुरु असून ही सार्वजनिक विकासकामे करताना ती गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होईल याकडे लक्ष द्यावे, अशा सूचना पाहणीप्रसंगी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

सेंट्रल पार्क परिसरातील बैठक व्यवस्था, पायऱ्या, वाहनतळ, जलतरण तलावकरीता ज्येष्ठ नागरिक, लहान बालके यांचा विचार करुन फरश्या बसवाव्यात. कामे पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना समाधान वाटले पाहिजे. तीन हत्ती चौक परिसर सुशोभीकरणाची कामे करताना परिसरातील जागेचा पुरेपूर वापर करावा. दीपस्तंभाचे काम करण्यापूर्वी जागेचे सपाटीकरण करुन घ्यावे. वाहतूक कोंडी होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. कुस्ती संघ ते घारे साठवण तलाव दरम्यान कॅनाल परिसरात पदपथाचे कामे करताना संरक्षक भिंतीतून पाणी गळती होणार नाही, याचा विचार करुन कामे करावीत. नागरिकांकरीता शौचालय उभारण्यात यावे. ज्येष्ठांनाही या पदपथावर फिरताना त्रास होणार नाही, याचाही विचार करावा. परिसरात अधिकाधिक सावली देणाऱ्या विविध प्रजातीच्या वृक्षांची लागवड करावी, असे निर्देश त्यांनी दिले.



## जेजुरीत भाजपा बूथ प्रमुखांची निवड

**जेजुरी :** जेजुरी शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने जेजुरी शहरासाठी बूथ अध्यक्ष तसेच शक्ती केंद्रप्रमुख पदासाठी निवडणूक होवून अध्यक्ष व केंद्रप्रमुख नेमण्यात आले. भाजपचे निवडणूक निर्णय अधिकारी सत्यवान कामठे व जिल्हा सरचिटणीस शेखर वढणे यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक घेण्यात आली . तसेच बूथ अध्यक्ष व नियमावली शक्तिकेंद्र प्रमुखांचे कार्य याची माहिती देवून त्यांना जबाबदारी सोपवण्यात आली. मंडल निवडणूक अधिकारी सत्यवान कामठे शेखर वढणे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य सचिन पेशवे अलकाताई शिंदे कोल्हापूरच्या प्रभारी अध्यक्ष अलका शिंदे, जेजुरी शहर भाजपाध्यक्ष गणेश भोसले जेजुरी शहराध्यक्ष, पुरंदर तालुका अध्यक्षा मंगल पवार, तसेच पदाधिकारी गणेश मोरे दशरथ उबाळे, शिवाजी बारसूडे, चंद्रकांत झगडे, अनिकेत भालेराव, विजय जाधव, उर्मिला खुंटे, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार सचिन पेशवे यांनी मानले.

## न्हावरे-शिक्रापूर महामार्गावर भीषण अपघात

**शिक्रापूर :** न्हावरे (ता. शिरूर) येथे न्हावरे-शिक्रापूर महामार्गावर सरके-साठेवस्ती नजिक रविवारी रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास कंटनेर व स्विफ्ट गाडी यांच्यात समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील तिघेजण जागीच ठार झाले आहेत. या अपघातात कैलास उर्फ दादा कृष्णाजी गायकवाड(५०), गौरी कैलास गायकवाड (१८), गणेश महादेव निर्लेकर(२५) हे तिघेजण जागीच ठार झाले, तर दुर्गा कैलास गायकवाड (४५) ही महिला गंभीर जखमी झाली आहे.

घटनेची सविस्तर माहिती अशी की, कैलास गायकवाड हे आपल्या चारचाकी वाहनातून तळेगावहून न्हावऱ्याकडे येत असताना, त्यांच्या स्विफ्ट गाडीला कंटनेरने जोरदार धडक दिली. या अपघातात कैलास गायकवाड व त्यांची मुलगी गौरी गायकवाड तसेच जवळचे नातलग गणेश निर्लेकर जागीच ठार झाले तर कैलास गायकवाड यांच्या पत्नी दुर्गा कैलास गायकवाड गंभीर जखमी झाल्या आहेत. एकाच कुटुंबातील तिघांच्या भीषण अपघाती निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली न्हावरे पोलीस करत आहेत.

## शिंदेवाडी शाळेत दिली नवसाक्षरांनी परीक्षा



**पारगांव :** पारगांव, ता. दौंड येथे केंद्र सरकार पुरस्कृत उल्हास नव साक्षरता कार्यक्रमांतर्गत शिंदेवाडी परिसरातील उल्हास ॲप वरती ज्या असाक्षरांची नोंदणी करण्यात आली होती. त्या सर्वांची ऑफलाईन परीक्षा दिनांक २३ मार्च रोजी घेण्यात आली. त्यामध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान चाचणी यावर आधारित प्रश्नपत्रिका नवसाक्षरांनी सोडवली. अत्यंत उत्साही वातावरणात सर्व नव साक्षरांनी ही परीक्षा दिली. त्यामध्ये पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान चाचणी यावर आधारित प्रश्नपत्रिका नवसाक्षरांनी सोडवली वाचन गुण ५० लेखन गुण ५० संख्याज्ञान गुण ५० एकूण १५० परीक्षा घेण्यात आली.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष सुनील चव्हाण यांनी भेट दिली, तसेच पारगाव केंद्राचे केंद्रप्रमुख कैलास आढागळे यांनी भेट दिली. त्यांनी संपूर्ण पारगाव केंद्राची माहिती दिली. पारगाव केंद्रातील एकूण १४ केंद्रावर ही परीक्षा होत असून त्यामध्ये एकूण ६८ पुरुष साक्षर आणि ३४ महिला असाक्षरांनी ही परीक्षा दिली. शिंदेवाडी येथे केंद्र संचालक म्हणून संदीप थोरात व पर्यवेक्षक म्हणून अक्का मोरे यांनी काम पाहिले.

## मंजुरी प्राप्त घरकुलांची बांधकामे सुरू करावीत

**इंदापूर :** इंदापूर तालुक्यात सन २०२४ - २५ या आर्थिक वर्षात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोन मध्ये एकूण ५८०६ घरकुलांपैकी ५६४२ घरकुले मंजुर आहेत. मंजुरी घरकुले व आधार लिंक बँक लिंकेज व्हेरिफाय ३९६९ लाभार्थ्यांना पहिला हप्ता पंधरा हजार रुपये अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाले आहे. राज्याचे क्रीडा, युवक कल्याण व अल्पसंख्याक विकास मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात पहिला हप्ता अनुदान वितरण करण्यात आले. ज्या लाभार्थ्यांना अनुदानाचा पहिला हप्ता जमा झाला आहे, त्यांनी घरकुलाचे पाया बांधकाम त्वरित सुरू करावीत, म्हणजे त्यांना घरकुलाचा दुसरा हप्ता वितरण करणे सोयीस्कर होईल, असे आवाहन पंचायत समितीचे गट विकास अधिकारी सचिन खुडे यांनी केले.

जागा नसलेल्या ९९८ लाभार्थ्यांनी पंडित दीनदयाळ जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेमधून स्वतःची ५०० स्क्वेअर फूट उपलब्ध जागा खरेदी केल्यास, त्यांना एक लाख रुपये मर्यादे पर्यंत अनुदान मिळू शकते मात्र तसे प्रस्ताव ग्रामपंचायतकडे जमा करणे आवश्यक आहे. शासन राजपत्र २०२३ तुकडे बंदी सुधारणा निर्णय नुसार तुकडे बंदीचा एक गुंठा जागा खरेदीसाठीचा प्रस्ताव माननीय जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेसाठी ग्रामपंचायत मार्फत प्रस्ताव सादर करावेत असे आवाहन इंदापूर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी संजीव मारकड यांनी केले.

# संचालक मंडळ बरखास्त करा

## घोडगंगाच्या निष्क्रियतेवर सभासदांचा संताप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**शिरूर :** न्हावरे, ता. शिरूर रावसाहेबदादा पवार घोडगंगा सहकारी साखर कारखाना सुरू करण्यासाठी अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके यांनी साखर संकुल येथे झालेल्या बैठकीत अर्थसंकल्पात तीस कोटीची तरतूद करण्यासाठी संचालक मंडळाचा प्रस्ताव पाठवावा, असे सांगितले असतानाही कारखान्याने दोन महिने होऊनही अद्याप पर्यंत प्रस्ताव पाठवला नाही. त्यामुळे कारखाना सुरू करायचा आहे. मात्र, प्रस्ताव न आल्याने हा हंगाम सुध्दा वाया जाऊ शकतो. त्यामुळे कारखाना सुरु करण्यासाठी संचालक मंडळ बरखास्त करावे व कारखाना चालु करावा, अशी मागणी घोडगंगा साखर कारखान्याचे माजी संचालक सुधीर फराटे यांनी पत्रकार परिषदेमध्ये केली आहे.

या पत्रकार परिषदेला घोडगंगा कारखान्याचे संचालक दादा पाटील फराटे, शिरूर बाजार समितीचे माजी सभापती शशिकांत दसगुडे, घोडगंगाची संचालक सोपान गवारे, विरेंद्र शेलार उपस्थित होते. घोडगंगा सहकारी साखर कारखान्यावर आजपर्यंत ३१५ कोटी रुपयांची कर्ज आहे. त्यापैकी १५७ कोटी बँकांची कर्ज, ४४ कोटी सप्लायर्स देणे, ४२ कोटी साखर व्यापारी व इतर १८ कोटी, ४८ लाख कामगार पगार, २९ कोटी सभासद ठेव, १३ कोटी विज बिल सात कोटी पाणीपट्टी ग्रामपंचायत कर दोन कोटी पाच, कोटी टीडीएस थकबाकी दोन कोटी जीएसटी थकबाकी दोन कोटी पीएफ थकीत थकबाकी ३९ लाख, २०२२ ला झालेल्या निवडणुकीचा खर्च थकीत २८ लाख, पीएसआय व इतर वर्गणी देणे असे जवळपास ३१५ कोटी रुपये देणे व थकबाकी आहेत.

साखर आयुक्त प्रादेशिक सहसंचालक पुणे विभाग यांनी अनेक वेळा एनसीडीसीसाठीचा कर्ज प्रस्ताव घोडगंगा कारखान्याकडे मागितला असून, जाणीवपूर्वक कारखान्याची चेअरमन व संचालक मंडळ प्रस्ताव देण्यास टाळाटाळ करत आहेत. त्यामुळे घोडगंगा कारखान्याचे संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकीय संचालक मंडळ नियमावे अशी प्रमुख मागणी आमची राज्य सरकारकडे आहे.

९ जानेवारी रोजी साखर संकुल येथे झालेल्या बैठकीस अजित पवार, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, शिरूर हवेलीचे आमदार माऊली कटके, एमएससी बँकेचे मुख्य प्रशासक अनास्कर, साखर आयुक्त, सहकार आयुक्त तावरे, प्रादेशिक सहसंचालक गायकवाड, तालुकाध्यक्ष रवी काळे, दादापाटील फराटे, घोडगंगेचे चेअरमन ऋषीराज पवार, सुधीर फराटे, शशिकांत दसगुडे, राहुल पाचर्णे, सोपान गवारे, राजेंद्र कोरेकर, स्वप्निल ढमढेरे, स्वप्निल गायकवाड, श्रीनिवास गाडगे, महेश ढमढेरे यांच्या समवेत कारखान्या संदर्भात सविस्तर बैठक झाली. परंतु बैठकीत ठरल्याप्रमाणे राज्याच्या अर्थसंकल्पात तीस कोटी रुपये मदतीची घोडगंगा साठी तरतूद करण्याचे ठरले परंतु संचालक मंडळांनी तसा ठराव दिलेला नाही. त्यामुळे बजेटमध्ये पैसे मिळाले नाहीत.

९ सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने घोडगंगाच्या सर्व आजी-माजी संचालकांना कर्ज एनपीए झाल्यामुळे कारखान्याची मालमत्ता जप्त करत असल्याचे लेखी कळविले होते परंतु तदनंतर जवळपास सहा महिने संचालक मंडळाकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने ६ मार्च रोजी बँकेने कारखान्याची सर्व मालमत्ता ताब्यात घेतली असल्याचे कारखान्याचे संचालक दादापाटील फराटे यांनी सांगितले.

### ३०० कोटींची आवश्यकता

● कारखाना चालू करण्यासाठी जवळपास ३०० कोटी रुपये रकमेची आवश्यकता असून, आमदार माऊली कटके यांच्या मागणीनुसार सदर रक्कम एनसीडीसी मार्फत देण्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मान्य केले आहे. परंतु घोडगंगाचे चेअरमन व संचालक मंडळ जाणीवपूर्वक सदरचा प्रस्ताव देण्यास टाळा टाळाटाळ व विलंब करत आहेत यातून अशोक पवारांनाच घोडगंगा कारखाना चालू होऊ द्यायचा नाही, असे सध्याच्या परिस्थितीवरून दिसत असल्याचे बाजार समितीचे माजी सभापती शशिकांत दसगुडे यांनी सांगितले.

## अल्पवयीन बालिकेचे अपहरण करणाऱ्यांना अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिरूर :** शिरूर जोशीवाडी येथून दहा वर्षीय मुलीचे अपहरण करणाऱ्या तिघांना शिरूर पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने अटक केली असून, अपहरण केलेल्या बालिकेची मुंबई येथून सुटका करून नातेवाईकांच्या ताब्यात दिली असल्याची माहिती शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांनी दिली. अटक केलेल्यांमध्ये दोन महिलांचा समावेश आहे. लताबाई बसीर काळे, आकाश बसीर काळे, सुप्रिया उर्फ रॅम्बो आकाश काळे (सर्व सोने सांगवी ता. शिरूर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत बालिकेच्या घरच्यांनी शिरूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली होती.

दिनांक १३ मार्च रोजी सकाळी ८ ते दुपारी १ वाजण्याच्या दरम्यान शिरूर शहरातील दोषी वाडी येथे झालासमोरून दहा वर्षीय बालिकेचे अपहरण केल्याची फिर्याद शिरूर पोलीस स्टेशन येथे दाखल दाखल करण्यात आली होती. या प्रकरणाची पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांनी गंभीर दखल घेत शिरूर पोलिस स्टेशनच्या तपास पथकाला या गुन्ह्यातील अपहरण झालेल्या बालिकेचा तपास करण्याचे आदेश दिले होते. तपास पथकाचे पोलिस उपनिरीक्षक शुभम चव्हाण व पोलीस अंमलदार नितेश थोरात, विजय शिंदे, रविंद्र आव्हाड यांनी अपहरीत बालिका व अज्ञात आरोपींचा शोध घेणेकामी शिरूर शहरामधील सुमारे १०० पेक्षा अधिक सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासले. गुन्हा घडले त्या ठिकाणापासुन सीसीटीव्ही फुटेज तपासुन तांत्रिक विश्लेशण केले असता, त्यात लता, आकाश, सुप्रिया या तिघांनी मोटर सायकलवर दहा वर्षीय बालिकेचे अपहरण करून पळवून नेल्याचे सिद्ध झाले. पोलीस पथकाने या तीनही आरोपींना मोठ्या शितापीने ताब्यात घेतले.

सदरची कार्यवाही पुणे ग्रामीण पोलीस अधिक्षक पंकज देशमुख, पुणे विभाग अप्पर पोलीस अधिक्षक रमेश चोपडे , शिरूर उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले, पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांचे मार्गदर्शनाखाली शिरूर पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, पोलीस हवालदार नाथसाहेब जगताप, महीला पोलीस अंमलदार गिता सुळे, पोलीस अंमलदार नितेश थोरात, विजय शिंदे, निरज पिसाळ, रविंद्र आव्हाड, सचिन भोई, अजय पाटील यांचे पोलीस पथकाने केली आहे.

## सासवडच्या बादशाही मस्जिदमध्ये इफ्तार पार्टी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सासवड :** रमजान महिन्याच्या निमित्ताने हिंदु मुस्लीम बांधवांमधे ऐक्य निर्माण व्हावे या उद्देशाने सासवड येथील बादशाही मस्जिद मध्ये "रोजा इफ्तार पार्टीचे" आयोजन करण्यात आले होते. गेली अनेक वर्षे हा स्तुत्य उपक्रम राबविणाऱ्या सासवड शहर पत्रकार संघ व सासवड पोलिस स्टेशनच्या वतीने हा कार्यक्रम संपन्न झाला. या दोन्ही संघटनांच्या वतीने फराळाचे जिन्नस व गुलाबपुष्प देवून मुस्लीम बांधवांना शुभेच्छा देण्यात येवून त्यांच्या समवेत फलाहार करण्यात आला.

पोलिस स्टेशनच्या वतीने पोलिस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी, सहाय्यक पोलिस निरीक्षक वैभव सोनवणे, पोलिस उपनिरीक्षक अर्जुन चोरगे,रुपेश भगत, सुरज नांगरे, अक्षय चिले यांसह पत्रकार संघाचे अध्यक्ष सुधीर गुरव, बाळासाहेबकुलकर्णी, जीवन कड गणेश मुळीक संभाजी महामुनी, राजेन्द्र बर्गे संदीप जगताप, जगदीश शिंदे, सुनिल वढणे , हेमंत ताकवले ,नगरपालिका आरोग्य अधिकारी मोहन चव्हाण आदी मंडळी या प्रसंगी उपस्थित होती. पोलिस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी व पत्रकार हेमंत ताकवले यांनी मनोगतातून शुभेच्छा दिल्या.

हाजी रफिक गनीभाई बागवान, हाजी इलाही बागवान, मौलाना शमशाद, हाजी रफिक बाबासो बागवान, हिंदु धर्मीय असुन अनेक वर्षे रोजा करणारे अरविंद चिव्हे यांसह अनेक मुस्लीम बांधव, छोटी मुले या प्रसंगी उपस्थित होती.

# वनपुरी ग्रामस्थांचा निर्धार; विमानतळ प्रकल्प करणार हद्दपार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सासवड :** महाराष्ट्र शासनाने आमच्या गावात विमानतळ प्रकल्प करण्याचा कितीही निर्धार केला आणि कितीही प्रयत्न केले तरी कोणत्याही परिस्थितीत शांततेच्या मार्गाने त्यास विरोध केला जाईल. वेळ पडल्यास लाठ्या, काठ्या खाऊ पोलिसांच्या गोळ्या झेलू, परंतु विमानतळ प्रकल्प होवू देणार नाही. एमआयडीसी च्या माध्यमातून शासन दररोज एक एक घोषणा करीत आहे. यातून स्थानिक नागरिकांना कोणत्याही प्रकारे विश्वासात न घेता अथवा आमचू भूमिका समजून न घेता प्रकल्प लादत असून तो आमच्यावर अन्यायकारक आहे. परंतु कोणत्याही परिस्थितीत प्रकल्प हद्दपार करणारच असा ठाम निर्धार वनपुरी ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, पारगाव, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी या सात गावात विमानतळ प्रकल्प जाहीर केला असून यासाठी २८३२ हेक्टर क्षेत्र संपादित करण्याचे जाहीर केले आहे. मात्र यामुळे सातही गावे कायमची विस्थापित होण्याचा धोका व्यक्त करीत सातही गावातील नागरिकांनी सुरुवातीपासून कडवा विरोध केला आहे. मात्र शासनाकडून शेतकऱ्यांचा विरोध झुगारून दररोज नवनवीन घोषणा केल्या जात आहेत. त्यामुळे या भागातील नागरिक पुन्हा एकदा आक्रमक झाले असून प्रकल्प हद्दपार होण्यासाठी कोणत्याही पद्धतीचा वापर करू मात्र प्रकल्प होवू देणार नाही असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

दरम्यान वनपुरी येथील ग्रामदैवत श्री भैरवनाथ मंदिरात एका बैठकीचे आयोजन केले होते. यावेळी प्रकल्पाला विरोध करताना माजी सरपंच नामदेव कुंभारकर यांनी शासनाच्या भूमिकेचा तीव्र निषेध केला. ग्रामस्थांनी राजकीय गट, तट, एकमेकांतील मतभेद बाजूला ठेवून एक होण्याचे त्यांनी आवाहन केले. आपण आता भांडत बसलो आणि शासनाच्या भूमिकेला पाठींबा दिला तर भविष्यात आपण एक मेकांत राहणार नाही.

## आशा दिनानिमित्त विविध कार्यक्रम उत्साहात



**आळंदी :** पंचायत समिती खेड आरोग्य विभाग यांचे वतीने मोठ्या उत्साहात आशा दिन साजरा करण्यात आला. यावेळी आशा सेविका ३२० पेक्षा जास्त आशा कार्यकर्ती आणि १७ आशा गटप्रवर्तक उपस्थित होते. सन २०२३ - २४ या आर्थिक वर्षात उत्कृष्ट काम केलेल्या तालुका स्तरावरील प्रथम, द्वितीय व तृतीय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील प्रथम आशा कार्यकर्ती यांचा सन्मान करण्यात आला. तालुका स्तरावरील प्रथम व इतर सर्व गट प्रवर्तक यांचा उत्कृष्ट काम केल्या बद्दल सन्मान करण्यात आला.


तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विलास माने यांच्या नेतृत्वाखाली तसेच तालुका समुह संघटक निलेश बेलवटे यांचे मार्गदर्शनात कार्यक्रम झाला. खेड तालुक्यातील ११ प्राथमिक आरोग्य केंद्र, ६० आरोग्य उपकेंद्र या माध्यमातून सर्व आशांची लक्षणीय उपस्थिती ने दाद दिली. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. इंदिरा पारखे, तालुका कार्यालय पं स खेड येथील श्रीम आशा नवगिरे, आशा नाईकडे, रेवननाथ ढाकणे, सानिका घाटकर उपस्थित होते. या प्रसंगी आरोग्य सेवक नितिन भुसारी, प्रतिक गवारी, केतन घोलप, श्रीमती वैष्णवी पवार यांनी विशेष परिश्रम घेतले. आशा कार्यकर्ती यांनी आपले दैनंदिन सेवा देतानाचे अनुभव आणि बळकटीकरण व्यक्त केले. तसेच त्यांच्या सुप्त कला गुणांना वाव देण्यात आला. यावेळी सादरीकरण झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी देखील उत्सहात झाली. उपस्थितांनी मोठी दाद दिली. आशा दिना निमित्त सर्वांना स्वादिष्ट सुग्रास स्नेहभोजन देण्यात आले.

## दंगलीच्या पार्श्वभूमीवर उरुळी कांचन पोलिसांचा रूट मार्च

**उरुळी कांचन :** नागपूरमध्ये नुकत्याच घडलेल्या हिंसक प्रकाराच्या पार्श्वभूमीवर उरुळी कांचन व परिसरात सतर्कतेचा इशारा देत पोलिस प्रशासनाने रस्त्यावर उतरून नागरिकांच्या मनात सुरक्षिततेचा विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आगामी विविध सणांच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी शहरातील संवेदनशील भागांमध्ये प्रभावी रूट मार्च काढला होता.

उरुळी कांचन परिसरात शांतता आणि कायदा-सुव्यवस्थेचा संदेश देण्यासाठी उरुळी कांचन पोलिस ठाण्याच्या वतीने भव्य रूट मार्चचे आयोजन करण्यात आले. हा रूट मार्च जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. पंकज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वरिष्ठ पोलिस निरीक्षक शंकर पाटील यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. या रूट मार्चची सुरुवात पोलिस ठाण्यापासून झाली. त्यानंतर हे संचलन पी एम टी चौक,आश्रम रोड, मनीभाई पतसंस्था, सटवाई चौक, महात्मा गांधी रोड, तळवडी चौक, पांढरस्थळ, शिंदवणे रोड, पी एमटी चौक या भागातून काढण्यात आला. संपूर्ण रूटमार्च दरम्यान पोलिसांनी संवेदनशील भागांची पाहणी करत नागरिकांशी संवाद साधला आणि शांतता राखण्याचे आवाहन केले. या रूट मार्चमुळे शहरातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेबाबतचा विश्वास वाढला असून, नागरिकांनी याचे स्वागत केले आहे. शहरात शांतता राखण्यासाठी प्रशासनाची ही हालचाल निर्णायक ठरणार असल्याचे चित्र आहे.

## श्रीमंती मिळविण्यासोबतच ती टिकविणे गरजेचे



**बारामती :** श्रीमंती ही केवळ पैशातूनच मोजली जात नाही, पैसा व शरीरासोबत मनाची श्रीमंती तितकीच महत्वाची आहे. श्रीमंती मिळविणे सोपे असते पण ती टिकवणे गरजेचे आहे, कुटुंबाला आर्थिक साक्षरता शिकविणेही गरजेचे आहे, असे प्रतिपादन व्याख्याते अनिकेत यादव यांनी केले. एन्व्हॉर्यमेंटल फोरम ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित प्रतिबिंब व्याख्यानमालेमध्ये तुम्हाला श्रीमंत व्हायचय का.... या विषयावर अनिकेत यादव यांनी बारामतीकरांशी संवाद साधला. अनुत्पादक गोष्टींसाठी अजिबात कर्ज घेऊ नका, अन्यथा कर्जाच्या खाईत तुम्ही जाऊ शकाल. अनावश्यक कर्ज लवकर फेडून टाका. हिशेब लिहायची सवय प्रत्येकाने लावून घ्यायला हवी. त्या मुळेही आपण कोठे आहोत, हे आपले आपल्याच समजेल, असेही त्यांनी सांगितले.

## बाबीत बिबट्याचा वावर

**ओतूर :** बिबट्यांचे नंदनवन अशी ओळख निर्माण होत असलेल्या ओतूर (ता.जुन्नर) परीसरातील बाबीत मळ्यात गेल्या काही दिवसांपासून बिबट्यांचा मोठ्या प्रमाणात वावर वाढला आहे. ३ ते ४ वेळा वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबटे जेरबंद झाले आहेत. आता सोमवारी (दि.२४) पहाटे साडेचार वाजता बाबीत मळा मध्ये बिबट नर अंदाजे वय पाच ते सहा वर्ष अडकला आहे. तुकाराम गीते यांनी ही माहिती देताच तात्काळ ओतूर वनविभागाच्या वनपाल सारिका बुट्टे, वनरक्षक विश्वनाथ बेले, दादाभाऊ साबळे, मोहिनी वाघचौरे, किसन केदार, गंगाराम जाधव, गणपत केदार, फुलचंद खंडागळे, रोहित लांडे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी करून घटनेची खात्री केली.

ओतूर वनपरिक्षेत्र अधिकारी लहू ठोकळ यांना फोन वरून माहिती दिली त्यांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळी सर्व वन कर्मचारी, आपदा मित्र वैभव अस्वार, विराज अस्वार, तसेच ग्रामस्थ तुकाराम गीते, गणेश गीते, संस्कार गीते विकास, गीते कुणाल गीते, पोपट मालकर, प्रदीप तांबे , सुनील मोरे यांचे मदतीने पिंजऱ्याच्या साहाय्याने सदर बिबट्यास योग्य त्या पद्धतीने रेस्क्यू करून त्याला सुखरूप माणिक डोह बिबट निवारा केंद्र येथे दाखल करण्यात आले आहे.

# उजनीतून बेकायदेशीरपणे विसर्ग

## उजनी धरणग्रस्त बचाव समितीचा आरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी देवकर :** उजनी धरणात उन्हाळ्यात नदी पात्रात पाणी सोडण्याची तरतूद नसताना देखील दरवर्षी राजकीय दबावापोटी उजनी धरणातून बेकायदेशीर नदी पात्रात पाणी सोडण्यात येत आहे. यामुळे धरणग्रस्त शेतकऱ्यांना हक्काच्या पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे. या वर्षी देखील कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत सुमारे ११ टीएमसी पाणी बेकायदेशीर रित्या सोडण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. जो धरणग्रस्तांना रस्त्यावर आणणारा आल्याचा आरोप उजनी धरणग्रस्त इंदापूर तालुका बचाव कृती समितीचे अध्यक्ष अरविंद जगताप यांनी केला आहे.

कालवा सल्लागार समितीती झालेल्या निर्णयानुसार भीमा नदीतून पहिलं आवर्तन ६ एप्रिल ते २० एप्रिल या दरम्यान ६.५० टीएमसी व २६ मे ते ७ जून पर्यंत ४.५० टीएमसी पाणी सोडण्याचा बेकायदेशीर निर्णय झाला आहे. मूळ आराखड्यात उन्हाळ्यात नदी पात्रात पाणी सोडण्याची तरतूद नसताना हा प्रताप करण्यात आला आहे. उलट धरणग्रस्तांच्या हक्काच्या राखीव पाण्याची तरतूद करण्यात आली नाही. त्यामुळे सरकारने पुन्हा या वर्षी धरणग्रस्त शेकऱ्यानावर अन्याय केला असल्याचा आरोप अरविंद जगताप सह धरणग्रस्त शेतकरी करत आहेत. ६ जानेवारी २०१६ रोजी लवादाने सोलापूरला पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन तातडीने पूर्ण करण्याचा आदेश दिला होता. याला आता ९ वर्षांचा कालावधी लोटला तरी देखील अद्याप पाइपलाइन पूर्ण करण्यात आली नाही. बेकायदेशीर रित्या पिण्याच्या नावाखाली नदी पात्रातून सिंचनासाठी उजनीतून पाणी नेलं जात आहे.

यासाठी जाणीवपूर्वक या पाइपलाईनच काम रेंगाळत ठेवलं जात असल्याचा आरोप इंदापूर तालुक्यातील धरणग्रस्त शेतकरी करत आहेत. त्यामुळे धरणग्रस्त शेतकरी म्हणतात आम्हाला विकास नको आमच्या शेतीला पाणी द्या. तरी उजनीच्या हककच्या पाण्या बाबत काठावरील शेतकरी संघटित नसल्याने राजकर्ते केवळ पाण्यावर राजकारण करून वेळ मारून नेत आहेत. व दर वर्षी शेतकऱ्याला मात्र हककाच्या जमिनी देऊन पाण्यासाठी रडत बसण्याची वेळ आली आहे.

सध्या उजनी धरणात केवळ १८.६४ टीएमसी पाणी शिल्लक आहे. दररोज सुमारे ४२०० क्यूसेकने पाण्याचा विसर्ग सुरु आहे. बोगदा ३३३, कॅनॉल २८५० क्यूसेक, दहिगाव योजना १२० क्यूसेस पाण्याचा विसर्ग सुरु आहे. याच प्रमाणे विसर्ग सुरु राहिल्यास ७ जूनपर्यंत सोडण्यासाठी धरणात पाणीच शिल्लक राहणार नाही.



### ५० गावांना फटका

● विशेष बाब म्हणजे इंदापूरचे आमदार यांच्या काळात लवादाच्या हा निर्णय झाला होता. त्यानंतर भरणे यांच्याकडे सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री पद असतानाच्या काळात देखील इंदापूरच्या आमदारांची तालुक्यातील जनतेचा उजनीच्या राखीव पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी ही पाइपलाइन पूर्ण कारण्यासाठी विशेष प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे सध्या इंदापूर तालुक्यातील धरणग्रस्त २७ गावे व उजनीच्या पाण्यावर अवलंबून असणारी वीस ते पंचवीस अशी सुमारे चाळीस ते पन्नास गावांतील नागरिकांना याचा फटका बसला आहे. पाण्यासाठी शेतकऱ्यांना जीवाचं रान करून उजनीतील गाळात पाईप व केबल वाढवण्याची वेळ आली आहे.

# हुतात्मा राजगुरू यांना सरकारने भारतरत्न पुरस्कार द्यावा

## माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांचे आवाहन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात ज्यांनी प्राणाची आहुती दिली, अशा हुतात्मा राजगुरू, भगतसिंग आणि सुखदेव यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा. यासाठी खेड तालुक्यातील नागरिकांनी त्यासाठी सह्यांची मोहीम राबवण्याचे आवाहन खेडचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी केले. याशिवाय हुतात्मा राजगुरू स्मारकाच्या कामात अडथळा असलेल्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा करण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार प्रयत्नशील आहेत. त्यामुळे महायुती सरकारच्या काळात राजगुरू स्मारकाचे काम पूर्ण होणार असल्याचा विश्वास माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी व्यक्त केला.

हुतात्मा राजगुरू, भगतसिंग आणि सुखदेव यांच्या बलिदान दिनाच्या निमित्ताने रविवारी (दि. २३) राजगुरुनगर येथे आयोजित अभिवादन कार्यक्रमात दिलीप मोहिते पाटील बोलत होते. अभिवादन स्थळी आळंदी येथुन आलेल्या वारकरी बांधवांनी या तीनही क्रांतिकारकांना भारतरत्न देण्याची मागणी केली. त्याला दुजोरा देत मोहिते पाटील यांनी वारकरी बांधवांनी तालुक्यात सह्यांची मोहीम राबवली आणि एक लाख सह्यांचे निवेदन तयार केले, तर केंद्र सरकाराला या क्रांतिकारकांना भारतरत्न पुरस्कार जाहीर करावा लागेल असे म्हटले.

या कार्यक्रमात हुतात्मा राजगुरू यांच्या बलिदानाला उजाळा देत त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाला माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्यासह कात्रज दुध संघाचे संचालक अरूण चांभारे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष कैलास सांडभोर, वैभव नाईकरे, संतोष भांगे, अॅड दीपक थिगळे, माणिक होरे यांसह स्थानिक नेते, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना दिलीप मोहिते पाटील यांनी हुतात्मा राजगुरू यांच्या त्याग आणि समर्पणाचे कौतुक करत, त्यांचा आदर्श आजच्या पिढीने आत्मसात करावा, असे आवाहन केले.



**खेड :** हुतात्मा राजगुरू यांच्या स्मृती शिल्प स्थळी अभिवादन करताना माजी आमदार दिलीप मोहिते पाटील.

## पाण्याबरोबरच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील सर्वच जलाशयांचा सध्याचा पाणीसाठा अत्यल्प राहिला आहे. या परिस्थितीत पिण्याच्या, शेतीच्या पाण्याबरोबरच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. सध्या हिरवा चारा अल्प प्रमाणात असून, सुका चाराही संपत आल्याने दूध उत्पादन निम्म्यापेक्षा अधिक घटले आहे. त्यामुळे दुग्ध व्यवसाय तोट्यात असून, जनावरे संभाळणे शेतकऱ्यांना जिकिरीचे झाले आहे. यामुळे पुरंदरचा शेतकरी चिंतेत पडला आहे.

सध्या पुरंदर तालुक्यातील पशुपालकांपुढे चाऱ्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे सध्या कडबा व मका या पिकावर शेतकऱ्यांचे लक्ष आहे. जनावरांना पोषक चारा म्हणून कडब्याचा अधिक उपयोग केला जातो. अनेक शेतकरी रानामध्येच कडब्याची विक्री करत आहेत. ज्यांच्याकडे जनावरे नाहीत ते शेतकरी जादा दराने कडब्याची विक्री करत असल्याचे गराड्याचे प्रगतिशील शेतकरी सुनील तात्या जगदाळे यांनी सांगितले.

पशुखाद्याच्या एका पिशवीची किंमत १३०० रुपये, तर चाऱ्यासाठी ऊस प्रतिटन ४ हजार रुपये, वैरण (ज्वारीचा कडबा) बाजारभाव शेकडा ३५०० पासून ते ५००० पर्यंत जाऊन पोहचले आहेत. पुढील काळात किमती वाढण्याची शक्यता आहे. प्रत्येक जनावराला दररोज किमान ५० लिटर पाणी आवश्यक आहे. त्यामुळे सध्या पशुधन सांभाळणे छोट्या शेतकऱ्यांना अवघड झाले आहे.

## खेडमधील शाळांना खेळाच्या साहित्याचे वाटप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खेड तालुक्यातील चाकण एमआयडीसी मधील बॉश इंडिया फाऊंडेशन कंपनीने आपल्या सामाजिक जबाबदारी उपक्रमांतर्गत तालुक्यातील १५ शाळांना खेळाचे साहित्य वाटप केले. पाईट, कडूस, कनेरसर, राजगुरुनगर, किवळे, कुरकुंडी, कोहिंडे बुद्रुक, पाळू, आंबोली, डेहणे, वाडा, चास, वेताळे, वाशेरे आदी गावांतील शाळांचा यामध्ये समावेश आहे. या साहित्यामुळे विविध खेळांच्या सुविधा उपलब्ध झाल्या असून विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासाला चालना मिळणार आहे. तसेच या शाळांच्या प्रगतीत मोलाची भर पडणार आहे.

बॉश इंडिया फाऊंडेशनने चेस, खो-खो, बॅडमिंटन, भालाफेक, थाळीफेक, गोळाफेक, फुटबॉल, व्हॉलीबॉल, लांब उडी, क्रिकेट, लेझिम यांसह जिल्हा आणि राज्यस्तरीय खेळांसाठी आवश्यक असणारे जवळजवळ सर्व प्रकारचे साहित्य या शाळांना उपलब्ध करून दिले आहे. पाईट येथील कुंडेश्वर विद्यालयाला नुकतेच या साहित्याचे वाटप करण्यात आले. बॉश इंडिया फाऊंडेशनचे प्रतिनिधी रोहित बलुरे, पाईटचे माजी उपसरपंच जयसिंग दरेकर, युवक संघटक युवराज बंदावणे, सेवा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष किसनराव गारगोटे, विश्वजीत दांगट यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. हा उपक्रम शाळा आणि विद्यार्थ्यांसाठी एक पुढचे पाऊल ठरेल, अशी आशा उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. खेळाच्या माध्यमातून शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा बॉश इंडिया फाऊंडेशनचा हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे.



# पाटबंधारे खात्याचा इंदापूरवर अन्याय




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** अपुऱ्या पाण्याअभावी पाटबंधारे खात्याकडून इंदापूरवर दुर्लक्ष केलं जात आहे. येथील सिंचन व्यवस्था अल्पावधीतच पूर्ण संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. सध्या फक्त पाणी बंदोबस्तात मूळ कालव्यातून इंदापूरसाठी आणले जाते; पण ज्या वितरिका आहेत त्या पूर्ण बंद पडल्या आहेत. त्याचबरोबर पाटबंधारे खात्याचे नवे अधिकारी नवीन यंत्रणा, खासगी यंत्रणा यामुळे वितरिकेला पाणी सोडून शेतीचे सिंचनासाठी लाभधारकांना पाणी द्यावे लागते. या गोष्टीचा इंदापूरबाबतीत त्यांना पूर्ण विसर पडला आहे.

खडकवासला कालव्यावरील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा व शेतीसिंचनाचा प्रश्न जितका महत्वाचा आहे. तितकाच पुण्याच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न महत्वाचा आहे. नेहमीच शहरी अन् ग्रामीण भागाचा पाण्यासाठीचा संघर्ष हा आपल्याला पहावयास मिळतो. धरणाच्या प्रकल्प आराखड्यात तत्कालीन धरणातील पाण्याच्या उपलब्धतेनुसार शहरी अन ग्रामीण भागासाठी पाणी आरक्षित केले गेले. आजही धरणातील पाण्याची उपलब्धता, पाणी साठवण्याची क्षमता वाढली तर नाहीच उलट गाळामुळे थोडीफार कमी झाली असेल. ग्रामीण भागातील शेती सिंचनाचा विचार केला तर त्याठिकाणी पाणी वाढविले तर नाही उलट कमी केले त्याला कारण म्हणजे पुण्याची वाढती लोकसंख्या! शहरी भागाच्या पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देत ग्रामीण भागाचे पाणी कमी झाले.

जसजशी पुण्याची लोकसंख्या शहरीकरण वाढत गेले तसतशीच त्यांची पाण्याची मागणी वाढत गेली. त्यांच्या वाढत्या पिण्याच्या पाण्याच्या मागणीसाठी नवीन स्वतंत्र व्यवस्था करणं महापालिकेकडून अपेक्षित होतं; पण त्यादिशेने कोणतेही पाऊल पुणे महानगरपालिकेकडून उचलले गेले नाही अर्थातच शेवटच्या टोकावरील खडकवासला लाभक्षेत्रातील इंदापूरच्या हक्काच्या पाण्यावर गदा आली. वास्तविक पाहता पुण्यात वेळोवेळी नवीन गावांचा समावेश केला गेला. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची मागणीही वाढली आज पुणे महानगरपालिका २१ टीएमसी पाण्याची गरज आहे, अशी मागणी करतेय, अर्थातच इंदापूरचं पाणी कमी होतंय.

# कहाणी मनीषची...

**धुनिक काळातली, सर्व सोयीसुविधा उपभोगणारी तरुण पिढी इंटरनेटच्या आधीन झाली आहे असं समजलं जातं. पण आजही काहीजण असे आहेत ज्यांना आर्थिक परिस्थितीमुळे साधा इंटरनेटचा खर्चही परवडत नाही. मध्यप्रदेशमधील मनीष अशाच काहीशा परिस्थितीला सामोरं गेला. पण यावर मात करत आज त्याने तुफान यश मिळवलं आहे. जाणून घेऊ या मनीषचा प्रवास...**

आ अनेकदा आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने काही जणांचे शिक्षण अपूर्ण राहते. स्वप्नांना बांध घालावा लागतो. सरकारी नोकरीची इच्छा असूनही मिळवता येत नाही. परिस्थितीला शरण जाऊन काही जण मजुरी करायला सुरुवात करतात. मात्र या परिस्थितीतूनही मार्ग काढणारे काहीजण आपल्या आजूबाजूला असतात. हे तरुण परिस्थितीशी दोन हात करतात. सन्मानाने झुंज देतात. मनीष चौहान हा त्यातीलच एक विद्यार्थी. परिस्थितीशी हार न मानता मनीष संघर्ष करत राहिला आणि त्याने एकाच वेळी चार बँकांमध्ये नोकरी मिळवली. २३ वर्षीय मनीष मध्यप्रदेशच्या बुरहानपपूर येथील रहिवासी आहे. यंत्रमाग मजुराच्या मुलाने शेजाऱ्यांकडून इंटरनेट उधार मागून यूट्यूबच्या माध्यमातून बँकेच्या परीक्षेची तयारी केली आणि हे यश मिळवले. दोनदा अपयशी झाल्यावरही त्याने हार मानली नाही. आता तिसऱ्या प्रयत्नात या तरुणाची एकाच वेळी चार बँकांमध्ये निवड झाली. आता तो असिस्टंट बँक मॅनेजर झाला आहे.



मनीषने सेवासदन महाविद्यालयातून बीएस्सी कॉम्प्युटर सायन्स आणि बीएडचे शिक्षण घेतलले आहे. त्यानंतर बँकेच्या परीक्षेची तयारी सुरू केली. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. वडील सुरेश चौहान यंत्रमाग चालवतात. तर आई शेतात मजूर म्हणून काम करते आणि मोठा भाऊ धनराज चौहान हासुद्धा मजूरी करतो. मनीषच्या घरची परिस्थिती इतकी बेताची होती की त्याला मोबाइलवरचे इंटरनेटही परवडत नसे. त्यामुळे युट्यूबवरून बँकेच्या परीक्षांचे व्हिडिओ बघण्यासाठी त्याने शेजाऱ्यांकडून इंटरनेट मागितले आणि मन लावून अभ्यास केला. यात मनीष दोनदा नापास झालो. पण हारत न मानता तयारी करत राहिला आणि त्याच्या परिश्रमांना यश मिळाले.

मनीषला आई-वडिलांची मेहनत पाहून अनेकदा अस्वस्थ, निराश वाटायचं. मात्र, त्याने मेहनत सोडली नाही. तिसऱ्यांदा परीक्षा दिली आणि यावेळी देवाने मेहनतीचे फळ दिले. यावेळी त्याला मोठे यश मिळाले आणि एकाच वेळी ४ बँकांमध्ये निवड झाली. आता मध्य प्रदेश ग्रामीण बँकेत असिस्टंट बँक मॅनेजर म्हणून रुजू होण्याचे ठरवले आहे. आयबीपीएस परीक्षा दिल्यावर त्याची मध्यप्रदेश ग्रामीण बँकेत असिस्टंट मॅनेजर, ग्रामीण बँकेत क्लर्क, जिल्हा सहकारी केंद्रीय बँकेत सोसायटी मॅनेजर, आयडीबीआय बँकेत सेल्स एग्झिक्यूटिव्ह या पदांवर त्याची निवड झाली आहे. दरम्यान त्याच्या या निवडीनंतर त्याचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. अनेक जण त्याच्या घरी येऊन त्याचे अभिनंदन करत आहेत. या तरुणाचा हा प्रवास निश्चितच तरुणाईसाठी प्रेरणादाई आहे.

## फंडू एसएमएस

✼ चाहत वो नहीं जो जान देती है,
चाहत वो नहीं जो मुस्कान देती है,
ऐ दोस्त चाहत तो वो है, जो पानी
में गिरा आँसू पहचान लेती है।

✼ अब तो वो चाकू लेके मेरे
पिछे पडा है, उसे कहा था दिल
चीर के देख ,तेरा ही नाम होगा

✼ होके मायूस ना यूं शाम से
ढलते रहिये।
जिंदगी भोर है सूरज सा
निकलते रहिये।



# तंत्रज्ञानातल्या प्रगतीमुळे...

तं त्रज्ञानातली प्रगती अनेक अर्थांनी आपल्या पथ्यावर पडली असून यामुळे अनेक कार्यक्षेत्र खुली झाली आहेत. कोरोनाकाळातच तर हेच तंत्रज्ञान आपल्या मदतीला आलं. तुम्हालाही नव्या तंज्ञानाशी जोडून घ्यायची इच्छा असेल तर करिअरच्या या पर्यायांचा विचार करता येईल.

✼ सायबर फॉरेन्सिक ॲनालिस्ट ही काळजी गरज आहे. सायबर गुन्ह्यांच्या पोलीस तपासात या तज्ज्ञांची महत्त्वाची भूमिका असते. आपलं कॉम्प्युटरचं ज्ञान वापरून हे तज्ज्ञ बऱ्याच गोष्टी उघड करतात. कॉम्प्युटर सायन्स आणि क्रिमिनल जस्टीस या विषयांचा अभ्यास करून पुढे जाता येईल.

✼ ऑनलाईन जगताच्या मुळाशी जाण्याची तयारी असेल तर ग्रोथ हॅकर म्हणून काम करता येईल. ग्रोथ हॅकर्स ॲप किंवा सेवेसाठी ग्राहकांचा बेस तयार करतात. एखादा व्हिडिओ व्हायरल करून किंवा ट्विटरच्या माध्यमातून ते उत्पादनांची जाहिरात करतात. विविध स्टार्टअप्स ग्रोथ हॅकर्सची मदत घेताना दिसतात. ग्राहकांची मानसिकता समजून घेतली तर या क्षेत्रात मोठी मजल मारता येईल.कॉम्प्युटर सायन्स किंवा सॉफ्टवेअर इंजिनिअरींगची पदवी घेऊन या क्षेत्रात येता येईल.

**वेगळ्या वाटा**

✼ चीफ लिसनिंग ऑफिसर हे पदही आता तयार झालं आहे. हे अधिकारी समाज माध्यमांवर लक्ष ठेऊन असतात. सोशल मीडियावर युजर्स वापरत असलेले खास शब्द, ब्रँड्स, थीम्स आणि मीम्स यांवर त्यांचं लक्ष असतं. संबंधित संस्था किंवा कंपनीबाबतचं लोकांचं मत जाणून घेण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. मार्केटिंग कॅम्पॅन आणि बिझनेस स्ट्रॅटेजी आखण्यात यांची महत्त्वाची भूमिका असते.

✼ सोशल मीडिया इन्फ्लुएंसर हा आता फक्त ट्रेंड राहिलेला नाही तर उत्पन्नाचा चांगला मार्ग बनला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचणाऱ्या इन्फ्लुएंसरकडे कंपन्या, ब्रँड्स आकर्षित होत आहेत. या क्षेत्रात आपलं स्थान निर्माण केल्यानंतर तुम्ही गगनभरारी घ्यायला मोकळे.

# प्रियकराला विसरू शकले नाही

**मॅच मेकिंग**

मी २८ वर्षांची तरुणी असून साधारण वर्षभरापूर्वी माझं ब्रेकअप झालं. मग घरच्यांनी माझं लग्न ठरवलं. माझा होणारा नवरा सुशिक्षित, सुसंस्कृत आणि खुल्या विचारांचा आहे. मुख्य म्हणजे माणूस म्हणून तो खूप चांगला आहे. सगळं चांगलं असलं तरी मी माझ्या प्रियकराला विसरू शकलेले नाही. गेले वर्षभर आमचा संपर्क नाही. मी माझ्या होणाऱ्या नवऱ्याची तुलना सतत प्रियकरासोबत करत असते. त्याच्या आठवणींमधून मी अजून बाहेर आलेले नाही. त्याच्या चांगल्या-वाईट आठवणी माझ्याभोवती रुंजी घालत असतात. डिसेंबरमध्ये आमचं लग्न होणार आहे. या टप्प्यावर मी लग्न करावं का? मला या मुलाची फसवणूक करायची नाही. मी काय करू ?



उत्तर : सध्याची तुझी मानसिक स्थिती लग्न करण्याच्या दृष्टीने अजिबात योग्य नाही. मात्र हे अरेंज मॅरेज असल्याने ते रद्द करण्याचे किंवा पुढे ढकलण्याचे परिणाम समजून घे. आधीच्या नात्यातली कोणती गोष्ट तुला सतावत आहे, हे जाणून घेण्याचा प्रयत्न कर. आधीच्या नात्यातल्या भावनांना वाचा फोडून त्यातून बाहेर पडण्यासाठी मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेता येईल. प्रियकर तुझा भूतकाळ होता आणि होणारा नवरा तुझं वर्तमान आहे, हे लक्षात घे. तुला भूतकाळ बदलता येणार नाही. मात्र सध्याच्या नात्याकडे गांभीर्याने बघ. भविष्यात काय दडलं आहे, हे आत्ता सांगता येणार नाही. त्यामुळे या क्षणाला तो विचार करू नको. होणाऱ्या नवऱ्याची प्रियकराशी तुलना करणं सर्वसामान्य बाब आहे. मात्र या दोन वेगळ्या व्यक्ती आहेत हे ध्यानात ठेव.

# अनुभवा ब्लॅकची जादू

**फॅशन पॅशन**

मि त्रांनो, तुम्ही तुमच्या वॉर्डरोबमध्ये डोकावून बघितलं असेल आणि तिथे तुम्हाला नेव्ही ब्लू, ब्लॅक, डार्क ब्राउन रंगाचे भरपूर कपडे दिसत असतील तर काळजीचं काहीच कारण नाही. या रंगांमध्येही भरपूर फॅशन करता येईल. त्यातही तुमचं काळ्या रंगावर जास्तच प्रेम असेल तर चिंताच मिटली. काळ्या रंगाची फॅशन कशी मिरवता येईल याविषयी...

✼ सध्या मास्क मस्ट आहे. तुमच्याकडे काळ्या रंगाचं मास्क असायला हवं. हे मास्क कोणत्याही रंगाच्या आणि स्टाईलच्या कपडयांवर कॅरी करता येईल.



✼ काळ्या रंगाचं ट्रकर, बॉम्बर किंवा नेहरू जॅकेट घालता येईल. ही जॅकेट्स खूप आरामदायी आहेत. शिवाय त्यांची फार देखभालही करावी लागत नाही. लेअरिंगसाठी ही जॅकेट्स बेस्ट आहेत.

✼ साधासा, चांगल्या फिटिंगचा शर्ट तुमचा लूक पूर्णपणे बदलून टाकतो. म्हणूनच काळ्या रंगाचा कॉटन शर्ट विकत घ्या. हा शर्ट कोणत्याही ऑकेजनला चालून जाईल.

✼ काळ्या रंगाची फॉर्मल आणि आरामदायी ट्राउझरही मस्ट आहे. सोफेस्टिकेटेड लूकसाठी साधी पण फिटिंगवाली ट्राउझर तुमच्याकडे असायला हवी.

✼ तुमची ट्राउझर आणि शर्ट कितीही भारी असले तरी त्यांना शोभणाऱ्या ॲक्सेसरीज तुमच्याकडे असायला हव्यात. काळ्या रंगाचा लेदर बेल्ट, छानसं वॉलेट आणि सॉक्स या ॲक्सेसरीज मस्ट आहेत.

✼ गॉगल, टाय आणि ब्रेसलेटही विकत घ्या. घड्याळ घालत नसाल तर ब्रेसलेट ट्राय करता येईल.



# मस्त पोटॅटो कॉर्न कबाब

**झटपट रेसिपी**

दो स्तांनो, रविवारच्या संध्याकाळी काहीतरी वेगळं खावंसं वाटतं. परीक्षेचा अभ्यास असल्याने बाहेर जायचाही मूड नसतो. अशा वेळी चविष्ट अशी बटाटा कॉर्न कबाब रेसिपी पोटभरीची ठरेल. तसंच तुम्हाला पटकन ऊर्जाही मिळेल.

**साहित्य :** तीन कप मैदा, दोन मोठे बटाटे किसून घ्या, एक मध्यम कांदा बारीक चिरून घ्या, एक कप उकडलेले मके, चवीसाठी मीठ आणि मिरपूड, बारीक चिरलेल्या दोन ते तीन हिरव्या मिरच्या, तीन कप दूध आणि तेल

**कृती :** एका भांड्यात मैदा घ्या. त्यात बट्याट्याचा कीस, कांदा, मके, चवीनुसार मीठ, मिरपूड आणि मिरची घाला. या मिश्रणात थोडं थोडं दूध घाला. याचं दाटसर मिश्रण तयार व्हायला हवं. आता एखादा तवा किंवा पॅन घ्या. त्यात तेल घाला. ते तापल्यावर मिश्रणाचे जाडसर गोळे करून तव्यावर टाका. शॅलो फ्राय करून घ्या. दोन्ही बाजूंनी सोनेरी रंगावर तळून घ्या. सॉस किंवा चटणीसोबत गरमागरम खा.

## व्हॉट्स न्यू?

### ज्येष्ठांचा एकटेपणा दूर करणारा रोबो



दक्षिण कोरिया सरकारने ज्येष्ठ नागरिकांचा एकटेपणा दूर करण्यासाठी, त्यांना औषधांची आठवण करून देण्यासाठी जवळ जवळ सात हजार 'ह्योडोल' रोबो तयार केल्याचे सांगण्यात येत आहे. दक्षिण कोरियामध्ये ज्येष्ठ नागरिकांमधील एकटेपणा ही एक समस्या झाली आहे. त्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने दक्षिण कोरियाच्या सरकारने हा उपाय शोधून काढला आहे. 'ह्योडोल' रोबो अगदी मऊ, लवचिक आणि एखाद्या खेळण्यासारखे दिसतात. या रोबोतील तंत्रज्ञान संवादातून समोरील व्यक्तीच्या मनातील भावना ओळखण्यास सक्षम आहे. हे रोबो वृद्धांबरोबर चालू शकतात, संवाद साधू शकतात, संगीत वाजवू शकतात.

## बी ॲलर्ट


### होतोय का आधार कार्डचा गैरवापर?



वेगवेगळ्या कामांसाठी आधार कार्ड लागतं. मात्र तुमच्या या कार्डचा चुकीचा वापरही होऊ शकतो. आधार क्रमांकाचा वापर नेमका कुठे झाला आहे हे आपण जाणून घेऊ शकतो. मागील सहा महिन्यांचा डाटा यूआयडिएआयच्या साईटवर उपलब्ध असतो. यासाठी साईटवर जाऊन आधार सर्व्हिसेसच्या खालच्या बाजूला आधार ऑथेंटिकेशन हिस्टरीवर क्लिक करा. मग तुमचा आधार क्रमांक आणि स्क्रीनवरील कोड एंटर करून सेंड ओटीपीवर क्लिक करा. ओटीपी एंटर करून सबमिट करा. यानंतर थोडीफार माहिती भरून वेरिफाय ओटीपीवर क्लिक केल्यावर आधारचा गेल्या सहा महिन्यातला डाटा दिसेल.

## ॲप वर्ल्ड

### एकमेवद्वितीय 'फोटोमॅथ'



गुगल विद्यार्थ्यांसाठी कमालीचे ॲप घेऊन आले आहे. या ॲपचे नाव फोटोमॅथ असं आहे. हे ॲप झटपट गणित सोडविण्यात एकदम माहीर आहे. फोनच्या कॅमेऱ्याआधारे तुम्ही तुमच्या गृहपाठाच्या वहीतील गणित अवघ्या काही मिनिटात सोडवू शकता. तुमच्या वहीतील गणितावर मोबाईलचा कॅमेरा सुरु करायचा, त्यानंतर फोटोमॅथ ॲप, एआय डिटेल एक्सप्लेनेशनच्या मदतीने स्क्रीवरील प्रश्नाचे उत्तर देईल. विद्यार्थ्यांसाठी हे ॲप, गृहपाठ करण्यासाठीचा मित्र तर होईलच पण त्यांना शिकण्यासाठी पण मदत करेल. हे केवळ प्रश्नाचं उत्तरच दाखवतं असे नाही तर प्रश्नाचं उत्तर कसं आले, त्यासाठीचे सूत्र पण सांगतं.

## नवतंत्रज्ञान

### ए.आय. एअर हॉस्टेस!




कतार देशाने आपल्या सरकारी कतार एअरवेजमध्ये विमान कंपनीमध्ये एअर होस्टेस म्हणून एआयचा समावेश केला आहे. Sama २.० असे या एअर होस्टेसचे नाव आहे. Sama २.० ही ए.आय. एअर होस्टेस कोणत्याही प्रकारे मानवी केबिन क्रूची जागा घेणार नाही. उलट ती अतिरिक्त वैशिष्ट्य म्हणून समाविष्ट केली गेली आहे असे कंपनीने सांगितले. कतारने एअरलाइन्समध्ये डिजिटल मानवाची ओळख करून देऊन एआयचा हा एक नवीन प्रकार सादर केला आहे. त्यामुळे कतार एअरवेज ही एआय एअर होस्ट्सचा समावेश करणारी जगातील पहिली एअरलाइन बनली आहे.

# कॅलरी खर्च करणारे व्यायामप्रकार

**फिटनेस फंडा**

म हिनोंमहिने व्यायाम करूनही अनेकांच्या वजनाचा काटा खाली सरकत नाही. जीममध्ये घाम गाळून, वजनं उचलून, ट्रेडमीलवर धावूनही अपेक्षित निकाल मिळत नाही. मात्र यामुळे निराश होऊ नका. जास्त कॅलरी खर्च करणारा, तीव्र स्वरूपाचा व्यायाम सुरू करा. अशाच काही व्यायामप्रकारांविषयी...

✼ बहुसंख्य ॲथलिट्स दोरीच्या उड्या मारतात. या व्यायामामुळे त्यांच्या पायांना बळ मिळतं तसंच हृदयगती वाढते. कमी वेळात भरपूर कॅलरी जाळायच्या असतील तर दोरीच्या उड्या मारा. दोरीच्या उड्या मारल्याने तासाला जवळपास १०७४ कॅलरी खर्च होतात.



✼ पोहणं हा सुद्धा खूप चांगला व्यायाम आहे. व्यायाम म्हणून पोहल्याने तासाला साधारण ८९० कॅलरी खर्च होतात.

✼ जवळपास एखादी पायऱ्या असणारी टेकडी असेल तर या पायऱ्यांवरून धावा. यामुळे हृदय बळकट होतं. या व्यायामाने तासाला साधारणपणे ८०० कॅलरी खर्च होतात.

✼ वजनं उचलण्याचा आणि ट्रेडमीलवर धावण्याचा कंटाळा येत असेल तर टेनिसची रॅकेट हातात घ्या. फावल्या वेळात टेनिस खेळा. टेनिसमध्ये जलद हालचाली कराव्या लागतात. तासभर टेनिस खेळल्याने जवळपास ७०० कॅलरी खर्च होतात.



✼ बास्केटबॉल आवडत असेल तर यापेक्षा उत्तम दुसरा कोणताही व्यायाम नाही. जलद हाचचालींमुळे तुम्ही बऱ्याच कॅलरी खर्च करता.

✼ एअरोबिक्स व्यायामप्रकार करा. एअरोबिक्सचे क्लासेसही असतात. एका तासाच्या व्यायामाने ४९० कॅलरी खर्च होतात.

✼ जॉगिंग हा सुद्धा कुठेही करता येण्यासारखा व्यायाम आहे. चालण्यापेक्षा जॉगिंग करा. यामुळे भरपूर कॅलरी खर्च होतात. फार जोरात न धावताही तुम्ही सहज वजन कमी करू शकता. यामुळे तासाला ७५५ कॅलरी खर्च होतील.

# रोप वेचा भन्नाट अनुभव

**भटकंती**

भ टकंतीचा अनुभव भन्नाट असायला हवा. प्रत्येक वेळी काहीतरी वेगळं करायला हवं. नेहमीच्या, मळक्या वाटा सोडून भटकंतीची नवी वाट निवडणाऱ्यांसाठी असंख्य पर्याय उपलब्ध आहेत. अंगात थोडं धाडस असेल तर तुम्ही बरंच काही करू शकता. खूप उंचीवरून निसर्गाची अनुभूती घ्यायची असेल तर रोप वे किंवा केबल कार राईडचा पर्याय आहे. भारतात अनेक ठिकाणी रोप वेचा आनंद लुटता येईल. अशाच काही ठिकाणांविषयी...

✼ काश्मीर हे भारताचं नंदनवन. काश्मीरला गेल्यावर गुलमर्गला जायलाच हवं. या ठिकाणी रोप वेचा भन्नाट अनुभव घेता येतो. इथे रोप वेचे दोन टप्पे आहेत. पहिल्या टप्प्यात स्काय रिसॉर्ट ते कुंगडोरी खोऱ्याची सैर करता येते तर दुसऱ्या टप्प्यात कुंगडोरी ते अप्परवाथ माथ्यापर्यंत जाता येतं. अशा पद्धतीने तुम्ही अडीच किलोमीटर अंतर पार करू शकता.

✼ उत्तराखंडमधल्या औलीमध्ये रोप वेची सोय आहे. इथे रोप वेने चार किलोमीटर अंतर कापता येतं. जोशीमठ ते औली असा हा रोप वे असून या माध्यमातून हिमालयाचं सौंदर्य न्याहाळता येईल.

✼ सिक्किमची राजधानी गंगटोकमध्ये रोप वे आहे. हा रोप वे इथल्या देवराली बाजारपासून नाम्नांगमार्गे तशीलिंगपर्यंत जातो.

✼ महाराष्ट्रात रायगडमध्ये रोप वेची मजा लुटता येईल. स्वराज्याची राजधानी रायगडाची सैर केल्यानंतर रोप वेने सह्याद्री पर्वतरांगांचं विहंगम दृश्य न्याहाळता येईल.





## ‘काळी टॅक्सी’ इंग्लंडच्या आर्चरवर वर्णद्वेषी टिप्पणी

आयपीएल सुरू होऊन अवघे दोन दिवस झाले असतानाच स्पर्धेदरम्यान मोठा वाद निर्माण झाला आहे. भारताचा माजी फिरकीपटू हरभजन सिंग आपल्या समालोचनामुळे चाहत्यांच्या निशाण्यावर आला आहे. खरं तर, सोशल मीडियावर हरभजन सिंग यांचा एक व्हिडिओ जोरदार व्हायरल होत आहे. हा व्हिडिओ राजस्थान रॉयल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळल्या गेलेल्या सामन्याचा आहे, ज्यामध्ये त्याने एक अशी टिप्पणी केली आहे, ज्यामुळे खळबळ उडाली आहे. चाहते त्यांच्यावर वर्णद्वेषी टिप्पणी केल्याचा आरोप करत आहेत. रविवारी आयपीएलमध्ये सनरायझर्स हैदराबादने राजस्थान रॉयल्सचा 44 धावांनी पराभव केला. या सामन्यादरम्यान वांशिक टिप्पणी केल्याबद्दल माजी भारतीय क्रिकेटपटू हरभजन सिंगवर टीका होत आहे. खरंतर, हे प्रकरण इंग्लंडच्या वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चरशी संबंधित आहे, ज्याला हरभजनने ‘काळी टॅक्सी’ असे संबोधले होते.

# आदिल, सागरला सुवर्णवेध

## राजश्री राठोड, पॉवरलिफ्टिंगमध्ये कोल्हापूरच्या शुक्ला बीडकर, सोनम पाटीलला रौप्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खेलो इंडिया पॅरा गेम्समध्ये सलग तिसरा दिवस महाराष्ट्रासाठी सुवर्णमय ठरला. आर्चरीत आदिल अन्सारी, नेमबाजीत सागर कातळेने अव्वल यश संपादून गोल्डन संडे साजरा केला. आर्चरीत राजश्री राठोडने, पॉवरलिफ्टिंगमध्ये शुक्ला बीडकर, सोनम पाटीलने रौप्य पदके जिंकून दिवस गाजविला.

जवाहरलाल नेहरू स्टेडियम परिसरात सुरू असलेल्या आर्चरीत स्पर्धेत अपेक्षेप्रमाणे मुंबईच्या आदिल अन्सारीने सुवर्ण पदकाला गवसणी घातली. पुरूषाच्या डब्ल्यू 1 प्रकारात सलग दुसऱ्या स्पर्धेत आदिलने सोनेरी यशाचा वेध घेतला. अंतिम फेरीत हरियाणाच्या नवीन दलालविरूध्द आदिलची सुरूवात खराब झाली होती. पहिल्या दोन फेऱ्यात पिछाडीवर असताना अंतिम फेरीत अचुक नेमबाजी करीत आदिलने सुवर्ण पदक खेचून आणले.



123 गुणांसह अवघा दोन गुणांनी आदिलने अव्वल यश संपादले. हरियाणाच्या दलाल यांना 121 गुणांसह रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.

महिलांच्या रिकर्व्ह प्रकारात यवतमाळच्या राजश्री राठोडला सुवर्णयशाने हुलकावणी दिली. प्रथमच खेलो इंडिया स्पर्धेची अंतिम फेरीत धडक मारणाऱ्या राजश्रीला आंतरराष्ट्रीय खेळाडू पूजाने 6-4 फरकाने नमवले. 3 वर्षाची असताना राजश्रीचा उजवा पाय गुडघ्यापासून अंधू झाला होता. 11 वी शिकत असलेल्या राजश्री ही शेतमजूरांची मुलगी असून प्रशिक्षक सुरेंद्र राठोड यांचे मार्गदर्शन दिला मिळत आहे.

डॉ. कर्णीसिंग शूटिंग रेंजवर सलग दुसऱ्या दिवशी जय महाराष्ट्राचा जल्लोष दुमदुमला. लातूरच्या सागर कातळेने मिश्र 10 मीटर एअर रायफल प्रोन एसएच 1 प्रकारात सुवर्णपदकाचा वेध घेतला. 251.3 गुणांची कमाई करीत प्रथमच खेलो इंडिया स्पर्धेच्या सुवर्ण यशावर सागरने नाव कोरले. लातूरमधील शेतकऱ्याचा मुलगा असणाऱ्या सागर जन्मापासून दोन्ही पायांची अधू आहे. 2022 पासून त्याने नेमबाजी खेळायला सुरूवात केली. पुण्यातील बालेवाडीमधील शूटिंग रेंजवर तो सराव करीत असतो. दिल्लीतील स्पर्धेत प्रवासामुळे पाठ दुखत असतानाही सागरने एकाग्रतेने नेमबाजीत करीत अव्वल यश संपादन केले आहे.

पॉवरलिफ्टिंगमध्ये महिलांच्या 41 किलो गटात महाराष्ट्राच्या शुक्ला बीडकर, सोनम पाटीलने रूपेरी यशाचे वजन पेलले. कोल्हापूरच्या 35 वर्षीय शुक्ला बीडकरने 50 किलो वजन उचलून सलग दुसऱ्या स्पर्धेत रौप्य पदक पटकावले. गुजरातची नयना राबरी 51 किलो वजन उचलून सुवर्ण पदकाची मानकरी ठरली. महिलांच्या 45 किलो गटात कोल्हापूरच्या सोनम पाटीलने 59 किलो वजन उचलण्याची कामगिरी करीत रौप्यपदकाची कमाई केली. शुक्ला बीडकर व सोनम पाटील कोल्हापूरात बिभीषण पाटील यांच्या व्यायामशाळेत सारिका सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली कसून सराव करतात.

## अन् सामना आमच्या हातातून निसटला”


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चेन्नई :** आयपीएल २०२५ च्या सुरूवातीलाच स्पर्धेतील एल क्लासिको सामना मुंबई इंडियन्स वि. चेन्नई सुपर किंग्स यांच्यात खेळवला गेला. या सामन्यात चेन्नईने मुंबई इंडियन्सचा पराभव करत विजयासह आपलं खात उघडलं आहे.

यासह मुंबई इंडियन्सने आय़पीएलमध्ये सलग १३व्यांदा पहिला सामना गमावला आहे. पहिल्या सामन्यासाठी मुंबई संघाचे कर्णधारपद सूर्यकुमार यादवकडे होते. या सामन्यानंतर कर्णधार सूर्याने मुंबईने सामना कुठे गमावला याचं उत्तर दिलं आहे.

रचिन रवींद्रच्या ६५ धावा, ऋतुराज गायकवाडचे झटपट अर्धशतक आणि नूर अहमदच्या ४ विकेट्सच्या जोरावर चेन्नई सुपर किंग्जने मुंबई इंडियन्सवर शानदार विजय मिळवला. चेन्नईने आपल्या घरच्या मैदानावर विजयाने मोसमाची सुरुवात केली आहे. शेवटी एमएस धोनीही फलंदाजीला आला पण २ चेंडूत एकही धाव काढू शकला नाही आणि रचिन रवींद्रने षटकार लगावत सामना जिंकला.

## रितीशा, प्रग्या, अक्षय धोटे, रियान पाटील यांचे सनसनाटी विजय





**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे व केपीआयटी व सोलींको प्रायोजित 8,10वर्षाखालील मुले व मुलींच्या गटातील पीएमडीटीए मानांकन आयटीए करंडक टेनिस अकादमी ब्रॉन्झ सिरिज 2025 स्पर्धेत रितीशा नेहे, प्रग्या जैन, अक्षय धोटे, रियान पाटील यांनी मानांकित खेळाडूंवर विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. इंटेंसिटी टेनिस अकादमी, कपिला रिसॉर्ट, खराडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत 10 वर्षाखालील मुलांच्या गटात सातव्या मानांकित रियान पाटील याने चौथ्या मानांकित अहान नारगोलकरचा 5-2 असा पराभव केला. याच मुलींच्या गटात बिगर मानांकित रितीशा नेहे हिने सातव्या मानांकित आराध्या पवारचे आव्हान 5-1 असे मोडीत काढले. आठव्या मानांकित प्रग्या जैनने दुसऱ्या मानांकित कायरा गोहिलचा 5-3 असा कडवा प्रतिकार केला. 8 वर्षाखालील मुलांच्या गटात अव्वल मानांकित शौर्य कलवागट्टीने आयुष मदनीकरला 5-2 असे पराभुत केले. तेजवीर भोईटेने तनिष भातखंडेचा 5-1 असा सहज पराभव केला. बिगर मानांकित अक्षय धोटे याने तिसऱ्या मानांकित क्रीदय चांडकवर 5-0 असा एकतर्फी विजय मिळवला.

## टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत विष्णू पांडे, मायरा शेख यांना विजेतेपद



**पुणे :** अनिकेत वाकणकर टेनिस अकादमी यांच्या वतीने व शेपिंग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे यांच्या सहकार्याने आयोजित एमएसएलटीए अनिकेत वाकणकर टेनिस अकादमी पीएमडीटीए अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज 12 वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत एकेरीत मुलांच्या गटात विष्णू पांडे याने तर, मुलींच्या गटात मायरा शेख यांनी विजेतेपद संपादन केले. तर,दुहेरीत हर्ष नागवानी व अनय सुमंत यांनी, तर आस्मि पित्रे व शौर्या पाटील यांनी विजेतेपद पटकावले. एनसीएल टेनिस सेंटर आणि सीपीआर टेनिस कोर्ट, पाषाण येथे पार पडलेल्या या स्पर्धेत एकेरीत मुख्य ड्रॉ मध्ये अंतिम फेरीत महाराष्ट्राच्या विष्णू पांडेने अव्वल मानांकित हर्ष नागवानीचा 6-4, 3-6, 6-0 असा तीन सेटमध्ये पराभव करून विजेतेपद पटकावले. विष्णू हा केंद्रीय विद्यालय सदर्न कमांड सहावी इयत्तेत शिकत असून डेक्कन जिमखाना टेनिस अकादमी येथे प्रशिक्षक संदीप किर्तने यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. मुलींच्या गटात अंतिम लढतीत अव्वल मानांकित महाराष्ट्राच्या मायरा शेख हिने दुसऱ्या मानांकित शौर्या पाटीलचा 6-2, 6-4 असा पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला. 11 वर्षीय मायरा डीपीएस शाळेत सहावी इयत्तेत शिकत असून विशाल टेनिस येथे प्रशिक्षक विशाल डमरे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. दुहेरीत मुलांच्या गटात हर्ष नागवानी व अनय सुमंत या अव्वल मानांकित अर्जित बावस्कर व स्वराज भोसले यांचा 6-4, 6-3 असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

## पुणे ग्रामीणसह मुंबई शहर उपांत्यपूर्व फेरीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** गत विजेत्या पुणे ग्रामीणसह मुंबई शहर पश्चिम, पुणे शहर यांनी महिला विभागात, तर पुणे ग्रामीण, मुंबई उपनगर पूर्व, कोल्हापूर यांनी पुरुषांमध्ये राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरी गाठली. महिलांच्या उपउपांत्यपूर्व सामन्यात पुणे ग्रामीणने सांगलीला ५४-१६ असे पराभूत करीत उपांत्यपूर्व फेरी गाठली.

आक्रमक सुरुवात करीत पुण्याने पूर्वार्धात तीन लोण देत ३५-१० अशी भक्कम आघाडी घेतली. उत्तरार्धात आणखी एक लोण देत गुणांचे अर्धशतक पार केले. निकिता पडवळचा अष्टपैलू खेळ तिला मंदिरा कोमकर, सलोनी गजमलची चढाईची तर कोमल आवळे मिळालेली पकडीची साथ त्यामुळे पुण्याला हे शक्य झाले. महिलांच्या दुसऱ्या सामन्यात मुंबई



शहर पश्चिमने गत उपविजेत्या रत्नागिरीचे आव्हान ३८-२६ असे संपुष्टात आणले. दोन लोण देत मुंबई शहरने मध्यंतराला २४-१२ अशी आघाडी घेतली.

नंतर मात्र रत्नागिरीने आपला खेळ उंचावत एका लोणची परतफेड करीत ही आघाडी कमी केली. पूजा यादव, सोनाली शिंगटे, श्रद्धा कदम यांच्या चतुरस्त्र व संयमी खेळाने मुंबई शहरने ही किमया साधली. रत्नागिरीच्या समरीन व तसलीम या बुरोंडकर भगिनींनी कडवी लढत दिली.

## नेमबाजीत महाराष्ट्राला सुवर्णासह रौप्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेल्या नेमबाजीतील लढतीत महाराष्ट्राच्या स्वरूप उन्हाळकरने एक दशांश गुणाने सुवर्णपदकावर नाव कोरले. 10 मीटर रायफल नेमबाजीतील एस एच 1 प्रकारात स्वरूपसोबत कविन केगनाळकरने रूपेरी यश संपादन केले.

डॉ. कर्णीसिंग शूटिंग रेंजवर सुरू असलेल्या नेमबाजीत स्पर्धेतील पहिल्याच अंतिम फेरीत महाराष्ट्राच्या डबल धमाका पहाण्यास मिळाला. 10 मीटर रायफल नेमबाजीतील एस एच 1 प्रकारात पात्रता फेरीत कोल्हापूरचा स्वरूप उन्हाळकर चौथा स्थानावर होता. अंतिम लढतीत अनुभव संपन्न स्वरूपने 16 व्या फेरीपर्यंत प्रथम स्थानावर आघाडी घेतली होती. 17 व्या फेरीत 9.1 गुणांमुळे तो चौथा स्थानावर फेकला गेला. तर अनपेक्षितपणे चौथ्या स्थानावर असणारा 15 वर्षीय कविन केगनाळकरने पहिल्या स्थानी मुसंडी मारली.





पदक निश्चित करणाऱ्या 20 व्या फेरीत स्वरूपने आपल्या लौकिकला साजेसा खेळ करीत पुन्हा आघाडी घेत दुसरे स्थान प्राप्त केले. शेवटच्या 23 व 24 फेरीत सुवर्णपदकासाठी महाराष्ट्राच्या स्वरूप उन्हाळकर व कविन केगनाळकरमध्ये कमालीची झुंज दिसून आली. 224.2 गुणांसह कविन आघाडीवर तर पाईंट 1 गुणांनी स्वरूप दुसऱ्या स्थानावर होता. 23 व्या फेरीत गुणांची बरोबरी करीत अखेरच्या 24 व्या फेरीत 10.7 गुणांचा अचूक वेध घेत अवघ्या एका गुणांनी स्परूपने बाजी मारली.

कोल्हापूरचा स्वरूप उन्हाळकरने सलग दुसऱ्यांदा खेलो इंडिया स्पर्धेत सुवर्णपदकाचा करिश्मा घडविला. पॅरीस ऑलिम्पिकपटू असणाऱ्या स्वरूप हा स्पर्धेतील प्रमुख दावेदार होता. पुण्यातील बालेवाडी स्टेडियममधील कसून सरावामुळे पुन्हा यश हाती आले असे सांगून स्वरूप पुढे म्हणाले की, पॅरीसमधील अपयश मागे टाकून या पदकापासून नवी सुरूवात झाली आहे. आशियाई स्पर्धा आणि ऑलिम्पिक पदक हेच माझे स्वप्न आहे. नुकतीच दहावीची परीक्षा दिलेला सोलापूरच्या कविन केगनाळकरने रौप्यपदकाची लक्षवेधी कामगिरी केली. डावा पाया गुडघ्यापासून नसलेल्या कविनने कृत्रिम पायावर उभा राहत पदकाचा पराक्रम केला.

## तमिम इक्बालला सामन्यादरम्यान हृदयविकाराचा झटका




**नवी दिल्ली :** बांगलादेश क्रिकेट संघाचा माजी कर्णधार तमिम इक्बालला ढाका प्रीमियर डिव्हिजन क्रिकेट लीगदरम्यान हृदयविकाराचा झटका आला आहे. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. त्याची प्रकृती सध्या चिंताजनक असल्याची माहिती आहे. मोहम्मदन स्पोर्टिंग क्लब आणि शाइनपुकुर क्रिकेट क्लब यांच्यातील सामन्यादरम्यान ही घटना घडली. जमुना टीव्हीने दिलेल्या वृत्तानुसार, तमिमला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यासाठी हेलिकॉप्टरची व्यवस्था करण्यात आली होती, परंतु ते उड्डाण करू शकले नाही. त्यामुळे त्याला रुग्णवाहिकेतून फझिलातुन्नेसा रुग्णालयात दाखल करण्यात आलं. दरम्यान, तमिमची प्रकृती अत्यंत गंभीर असून त्याला लाईफ सपोर्ट सिस्टीमवर ठेवण्यात आलं आहे. तसेच त्याला ढाका येथे हलवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, परंतु त्याची प्रकृती बघता त्याला लगेच शिफ्ट करणं धोकादायक असल्याचं डॉक्टरांनी सांगितलं आहे. बांगलादेश क्रिकेट मंडळाचे मुख्य चिकित्सक डॉ. देबाशीष चौधरी यांनीही तमिमला हृदयविकाराचा झटका आल्याची पुष्टी केली आहे. तमिम इक्बालने जुलै २०२३ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे.

## ‘एसए अजिंक्यपद करंडक’ १४ वर्षाखालील आंतरक्लब टी-२० क्रिकेट २०२५ स्पर्धेचे २५ मार्चपासून आयोजन !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एसए स्पोटर्स मॅनेजमेंट तर्फे ‘एसए अजिंक्यपद करंडक’ १४ वर्षाखालील आंतरक्लब टी-२० क्रिकेट २०२५ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा २५ मार्च ते २० एप्रिल २०२५ या कालावधीत होणार असून स्पर्धेत पुण्यातील आणि जिल्ह्यातील एकूण २० संघांनी भाग घेतला आहे.

या स्पर्धेबाबत अधिक माहिती देताना एसए स्पोटर्स मॅनेजमेंटचे शराफत अली यांनी सांगितले की, या स्पर्धेत पुण्यातील विविध क्लब आणि ॲकॅडमीचे एकूण २० संघ सहभागी होणार आहेत. १४ वर्षाखालील



मुलांना स्पर्धात्मक आणि प्रोफेशनल धर्तीवर खेळण्याचा अनुभव मिळावा आणि त्यांच्यातील गुणवत्तेला संधी मिळावी, या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित केली गेली आहे. लाल चेंडूवर होणाऱ्या या स्पर्धेत साखळी आणि बाद फेरी मिळून एकूण ५० सामने होणार आहेत. स्पर्धेत एकूण १ लाख रूपयांची रोख पारितोषिके देण्यात येणार आहेत.

विजय क्रिकेट ॲकॅडमी, अष्टपैलु स्पोटर्स, धीरज जाधव क्रिकेट ॲकॅडमी, क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमी, क्रिक९ ॲकॅडमी, व्हिडीआर, एके स्पोटर्स, योगेश इलेव्हन, प्रशांत क्रिकेट झोन, मॅव्हरीक्स् ॲकॅडमी, अजित वाडेकर ॲकॅडमी, प्रसाद ठाकूर ॲकॅडमी, छत्रपती ॲकॅडमी, महाराष्ट्रीय मंडळ ॲकॅडमी, पुणे क्रिकेट क्लब, सिल्व्हर क्रिकेट ॲकॅडमी, लिजंड्स स्पोटर्स क्लब, एसएआरके ॲकॅडमी, कोंद्रे फार्म्स ॲकॅडमी या संघांमध्ये विजेतेपदाची चुरस पहावयास मिळणार आहे.


विजेत्या संघाला करंडक आणि ४५ हजार रूपये तर, उपविजेत्या संघाला करंडक आणि ३० हजार रूपये मिळणार आहे. याशिवाय सर्वोत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक, यष्टीरक्षक तसेच उदयोन्मुख खेळाडू यांना दिड हजार रूपये आणि करंडक याबरोबरच मालिकेचा सर्वोत्कृष्ट खेळाडू याला दोन हजार रूपये आणि करंडक तसेच प्रत्येक सामन्यासाठी सामनावीर आणि फायटर ऑफ मॅच अशी पारितोषिके देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## मोरया क्रिकेट व पुनित बालन केदार जाधव क्रिकेट अकादमी यांच्यात अंतिम लढत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** चॅम्प्स स्पोर्टस फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित चॅम्प्स करंडक 12 वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत आराध्य घोडे(3-12) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर पुनित बालन केदार जाधव क्रिकेट अकादमी संघाने सहारा क्रिकेट अकादमी संघाचा 1 गडी राखून पराभव करत विजय मिळवला.

धायरी येथील सहारा क्रिकेट अकादमी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत अखेरच्या साखळी फेरीत ओजस शेंद्रे (51धावा व 2-3) याने केलेल्या अष्टपैलू कामगिरीच्या



जोरावर सहारा क्रिकेट अकादमी संघाने एके स्पोर्टस क्लब संघाचा 10 गडी राखून पराभव करत दुसरा विजय मिळवला. सामनावीर पुरस्कार आराध्य घोडे व ओजस शेंद्रे ने जिंकला.

## ‘अमोनोरा-फ्लेक्स्एनफ्लो करंडक’ स्नुकर अजिंक्यपद स्पर्धेचे २५ मार्च पासून आयोजन !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्हा बिलीयडर्स आणि स्नुकर संघटना (पीडीबीएसए) यांच्या मान्यतेनी आणि फ्लेक्स् एन फ्लो फिटनेस स्टुडिआ यांच्या तर्फे ‘अमोनेरा फ्लेक्स्एनफ्लो करंडक’ स्नुकर अजिंक्यपद निमंत्रित स्पर्धेचे २५ मार्च २०२५ पासून आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा हडपसर येथील अमोनेरा फर्न क्लब येथे होणार असून स्पर्धेत एकूण १ लाख रूपयांची पारितोषिके देण्यात येणार आहे.

या स्पर्धेबाबत अधिक माहिती देताना स्पर्धेचे संचालक आणि पीडीबीएसएचे समर खंडेलवाल आणि फ्लेक्स् एन फ्लोचे फिटनेस



स्टुडिओचे संचालक सचिन संचेती म्हणाल की, या १५-रेड स्नुकर स्पर्धेत पुण्यातील अव्वल आणि मानांकित असे निमंत्रित १६ खेळाडू सहभागी होणार आहेत. स्पर्धेतील विजेत्या खेळाडूला करंडक आणि ५० हजार रूपयांचे पारितोषिक मिळणार आहे. साखळी आणि बाद फेरीमध्ये होणार असून स्पर्धेचा अंतिम सामना २८ मार्च २०२५ रोजी होणार आहे.

स्पर्धेत सोनु मातंग, अमरदीप घोडके, आरव संचेती, समर खंडेलवाल, साद सय्यद, विग्नेश संघवी, सुरज राठी, निमिश कुलकर्णी, तहा खान, हिसान सय्यद, गौरव देशमुख, रोहीत रावत, अभिषेक बोरा, कैवल्य जाधव, अभिजीत रानडे आणि पिनाक अनाप हे १६ खेळाडू सहभागी झाले आहेत.

चार खेळाडूंचा एक गट तयार करण्यात आला असून प्रत्येक गटातील अव्वल दोन खेळाडू बाद फेरीसाठी पात्र होणार आहे. त्यानंतर उपांत्यपुर्व, उपांत्य आणि अंतिम फेरीचे सामने होणार आहेत.

## ‘लायन्स् प्रौढ करंडक’ (४० वर्षावरील) टी-२० क्रिकेट स्पर्धा

# दिक्षीत रॉयल्स्, रायगड वॉरीयर्स संघ विजयी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्पोटर्सफिल्ड मॅनेजमेंट आणि पुणे लायन्स् तर्फे आयोजित लायन शंतनु सिद्धा स्मृतीप्रित्यर्थ दुसऱ्या ‘लायन्स् प्रौढ करंडक’ (४० वर्षावरील) टी-२० क्रिकेट स्पर्धेत दिक्षीत रॉयल्स् आणि रायगड वॉरीयर्स या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून अनुक्रमे सलग दुसरा आणि तिसरा विजय नोंदविला.

येवलेवाडी येथील ब्रिलीयंट्स स्पोटर्स ॲकॅडमी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत सचिन कापडे याने केलेल्या अचूक





गोलंदाजी आणि इतर गोलंदाजांची साथ यामुळे दिक्षीत रॉयल्स् संघाने एलिट क्रिकेट क्लबचा सात गडी राखून सहज पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या एलिट क्रिकेट क्लबचा डाव दिक्षीत रॉयल्स् संघाच्या गोलंदाजांनी ५९ धावांवर गुंडाळला. सचिन कापडे या मध्यमगती गोलंदाजाने केवळ एक धाव देत, दोन षटके निर्धाव टाकून ४ गडी बाद केले. सचिनला सुरेश जैस्वाल याने तीन गडी तर, पराग चितळे याने दोन गडी बाद करून उत्तम साथ दिली. हे माफक लक्ष्य दिक्षीत रॉयल्स्ने ६.२ षटकात पूर्ण केले. विवेक देशमुख याने २० धावा करून संघाला सहज विजय मिळवून दिला.

पंकज पाटील आणि सिकंदर पाटील या दोघांच्या अर्धशतकी खेळीमुळे रायगड वॉरीयर्स संघाने जेडब्ल्युडी मॅगीशियन्स्चा ४४ धावांनी पराभव करून विजयांची हॅट्रीक नोंदवली. पहिल्यांदा फलंदाजी करताना रायगड वॉरीयर्सने १६६ धावांचे लक्ष्य उभे केले. यामध्ये पंकज पाटील याने ५३ धावांची तर, सिकंदर पाटील याने नाबाद ५७ धावांची खेळी केली. या दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी ६३ चेंडूत ८८ धावांची भागिदारी रचून संघाला मोठी धावसंख्या उभी करण्यास मदत केली. या लक्ष्याचा पाठलाग करताना जेडब्ल्युडी मॅगीशियन्स्चा डाव १२२ धावांवर मर्यादित राहीला.

#रा